# महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित









## वार्षिक अहवाल

## २०१०-२०११

### वीज निर्मिती - पिढ्यान् पिढ्यांसाठी

महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## वार्षिक अहवाल

## २०१०-२०११

**This page has been put purposely blank**

# वार्षिक अहवाल २०१०-२०११

## अनुक्रमणिका


| तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| संचालक मंडळ (वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपर्यंत) | ०१ |
| सूचना (वार्षिक सर्वसाधारण सभा) | ०२ |
| संचालक मडंळाचा अहवाल | ०४ |
| महानियंत्रक व महालेखा परिक्षक यांचे भाष्य | ४६ |
| महानियंत्रक व महालेखा परिक्षकांच्या अहवालाला उत्तर | ४८ |
| लेखा परिक्षकांचा अहवाल | ५० |
| आर्थिक ताळेबंद | ५८ |
| नफा-तोटा विवरण | ५९ |
| ताळेबंद अंतर्गत येणाऱ्या अनुसूची | ६० |
| हिशेब तक्त्यावरील टीपा | ६९ |
| रोकड प्रवाह विवरण | १०२ |
| कंपनी कायदा १९५६ उपविभाग २१२ (३) प्रमाणे विवरण | १०७ |
| प्रकल्प वैशिष्ट्ये | १०८ |

This page has been put purposely blank

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## संचालक मंडळ

**(१-०४-२०१० पासून वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपर्यत)**

| | |
|---|---|
| अध्यक्ष | **श्री. पी. अब्रहम** (१७/०५/२०१० पर्यंत) |
| अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक | **श्री. सुब्रत रथो** (१७-०५-२०१० पासून आजपर्यंत) |
| संचालक | **श्री. व्ही. के. कानडे** (१८.११.११ पासून आजपर्यत) |
| | **श्री. एस. जे. कुंटे** (२५.८.११ पासून १८.११.११ पर्यत) |
| | **श्री. पी. व्ही. पागे** (०१-१२-०८ पासून आजपर्यंत) |
| संचालक (वित्त) | **श्री. जी. जे. गिरासे** (०१-०६-०७ पासून आजपर्यंत) |
| संचालक (प्रकल्प) | **श्री. सी. एस्. थोटवे** (३१-०८-०९ पासून आजपर्यंत) |
| संचालक (संचलन) | **श्री. एम्. आर. शेलार** (२६-११-१० पर्यत) |
| | **श्री. एम. जी. वाघमोडे** (११-०३-११ पासून आजपर्यंत) |

# सूचना

या पत्रकाद्वारे जाहिर सूचना देण्यात येत आहे की महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित या संस्थेच्या भागधारकांची सहावी वार्षिक सर्वसाधारण सभा १६ सप्टेंबर २०११ रोजी सायंकाळी ५.०० वाजता एचएसबीसी बँक बिल्डिंग, फोर्ट,मुंबई /- ४०० ००१ या ठिकाणी आयोजित केलेली असून त्यात खालील विषयांवर चर्चा होईल.

## व्यवहारातील सर्वसाधारण विषय

१) कंपनीचे परिक्षित ताळेबंद ३१/०३/२०११ तसेच या वर्षाअखेरीचा नफा तोटा परिपत्रक या बाबींचे सादरीकरण व त्यावर चर्चा करून ते स्वीकृत होणे आणि संचालकांचा अहवाल व लेखा परिक्षकांचा अहवाल सादर करणे. *

२) खालील ठराव विचारार्थ मांडला जाऊन तो योग्य वाटल्यास ह्यात काही आवश्यक बदल करुन अथवा तसाच्या तसा सर्वसाधारण ठराव म्हणून पारित करणे,

ठराव करण्यात येत आहे की, आस्थापनाचे आर्थिक वर्ष १ एप्रिल २०११ ते ३१ मार्च २०१२ साठी कंपनी कायदा १९५६ च्या कलम २२४ (८) (अअ) चे कलम ६१९ (२) सहित वाचायचे आहेत व कंपनी कायदा १९५६ च्या इतर लागू तरतुदीनुसार भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांनी कंपनी कायदा १९५६ चे कलम ६१९ (२) खाली नेमणूक केलेल्या आपल्या सांविधिक हिशेब तपासनीसांना देण्यात येणारी पारिश्रमिक रक्कम तसेच वरकड खर्चा प्रीत्यर्थ अतिरिक्त रक्कम ठरवण्याचे काम संचालक मंडळ करेल.

या व्यतिरीक्त आणखी असाही ठराव पारित करण्यात येतो आहे की कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक या ठरावाद्वारे सर्व कामकाज / कार्यवाही व आवश्यक ते सर्व नियम अमलात आणण्यासाठी सर्वाधिकार ग्रहण करतील.

## व्यवहारातील खास विषय

१) खालील विचारार्थ मांडला जाऊन तो योग्य वाटल्यास ह्यात काही आवश्यक बदल करून अथवा तसाच्या तसा सर्वसाधारण ठराव म्हणून पारित करणे.

ठराव करण्यात येत आहे की, श्री.एस.जे.कुंटे यांची २५ ऑगस्ट, २०११ पासून कंपनी अनुच्छेदानुसार मंडळाने कंपनी कायदा १९५६ च्या कलम २६०, संस्थापन नियमावली ८२ च्या तरतुदीनुसार संचालक

म्हणून नियुक्ती केली होती व त्यांचा कार्यालयीन कारभार या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या दिवशी संपत होता, त्यांना कंपनीचे संचालक म्हणून नियुक्त केले जात आहे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार

**राहुल दुबे**

**कंपनी सचिव**

ठिकाण : मुंबई

दिनांक : १६ सप्टेंबर २०११

* ०९/०१/२०१२ च्या स्थगित वार्षिक सर्वसाधारण सभेत अहवाल स्वीकारण्यात आला.

## टीपा

१) मतदानाचा हक्क असलेला सभासद हा (फक्त) मतदानासाठी आपला प्रतिपत्री (प्रॉक्सी) नेमू शकतो. असा प्रतिपत्री सभेला हजर राहून कंपनीच्या सभासदाच्या वतीने मतदान करु शकतो पण असा प्रतिपत्री कधीही कंपनीचा सभासद असू नये.

२) १९५६ च्या कंपनी कायदा अनुच्छेद ६१९(२) नुसार सरकारी मालकीची कंपनी आपले सांविधिक हिशेब तपासनीस हे भारताचे नियंत्रक व महालेखाकार मार्फतच केवळ नेमू शकेल आणि सांविधिक हिशेब तपासनीस मंडळाचा मेहनताना हे प्रत्येक कंपनीच्या सर्वसाधारण सभेत कंपनी सभासदांकडून मंजूर केले जाईल.

कंपनी कायदा १९५६ च्या विभाग २२४ (८)(अअ) व कलम ६१९ (२) च्या अनुरोधाने सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांनी संचालक मंडळाला आर्थिक वर्ष १ एप्रिल २०११ ते ३१ मार्च २०१२ या कालवधी करिता संविधानिक हिशेब तपासनीसांच्या मेहनतानाची व वरकड खर्चाची रक्कम ठरविण्याचे अधिकार द्यावेत.

३) या सूचना परिपत्रकात उल्लेख झालेल्या बाबीसंबंधीची सर्व कागदपत्रे, पुस्तके, दफ्तरे तपासणीसाठी सभासदांना या सभेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहतील.

# संचालक अहवाल

प्रिय सभासद

आपल्या कंपनीचा सहावा वार्षिक अहवाल आणि दिनांक ३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या वर्षाचे लेखापरिक्षण केलेले अहवाल आपणास सादर करताना आनंद होत आहे.

## वित्तीय निष्कर्ष

(₹ लाखांमध्ये)

| तपशील | २०१०-११ (₹) | २००९-१० (₹) |
|---|---|---|
| **उत्पन्न** | | |
| वीज विक्रीतून मिळालेले उत्पन्न | १२,११,६४८.८७ | ११,०८,३२५.०६ |
| इतर उत्पन्न | १०,३७०.१४ | १०,३२८.८९ |
| **एकूण उत्पन्न** | **१२,२२,०१९.०१** | **११,१८,६५३.९५** |
| **खर्च** | | |
| इंधन खर्च | ८,२८,१७३.१६ | ८,३१,३०२.०८ |
| निर्मिती, प्रशासन व इतर खर्च | १,२२,३३७.७७ | १,१३,२४१.३९ |
| कर्मचारी खर्च | ८७,०५५.९९ | ५५,६६८.६८ |
| घसारा/कर्जफेडीची तरतूद | ३९,८१२.६६ | ३०,०९४.२० |
| व्याज आणि वित्तिय आकार | ६५,७४३.३१ | ४६,९८८.१३ |
| **निव्वळ नफा - कर, तरतूद व पूर्वकालिन समायोजन या पूर्वीचा** | ७८,८९६.१२ | ४१,३५९.४७ |
| कर | **४९,०५६.४८** | **१९,१०३.७५** |
| **करोत्तर परंतु पूर्वकालिन समायोजन करण्याआधीचा नफा** | २९,८३९.६४ | २२,२५५.७२ |
| वजा - पूर्वकालिन समायोजन | १,१०६.०४ | १,९१५.८८ |
| **निव्वळ नफा करोत्तर** | **३०,९४५.६८** | **२०,३३९.८४** |

## वित्तीय कामगिरी

यावर्षी कंपनीचे एकूण उत्पन्न ९.२४ टक्क्यांनी वाढले. गतवर्षी एकूण उत्पन्न ₹१११८६५३.९५ लाख इतके होते. यावर्षी ते ₹१२२२०१९.०१ लाख इतके झाले. करोत्तर परंतु पूर्वकालिन समायोजन वजा करण्या आधीचा नफा ₹२२२५५.७२ लाखावरून ₹२९८३९.६४ लाख असा उंचावला आहे. करोत्तर निव्वळ नफा गेल्या वर्षापेक्षा ५२ टक्क्यांनी वाढला आहे. निव्वळ नफा गतवर्षी ₹२०३३९.८४ लाख होता. तो यावर्षी ₹३०९४५.६८ लाख इतका वाढला आहे.

## नियामक सोबतचे प्रश्न

महानिर्मिती कंपनीच्या वर्ष २००५-०६ मधील स्थापने पासूनच, कंपनीला महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाने अलवचिक व असाध्य असे नियामक प्रमाणक दिले आहेत कंपनीची जुनी झालेली वीज निर्मिती केंद्रे वस्तुस्थिती तसेच कोळशाची गुणवत्ता व एकूण उपलब्धता यासारख्या प्रत्यक्ष समस्याचा विचार न करताच नियामकांनी अतीशय उच्च स्तरांवरील प्रमाणके निश्चित करुन टाकली. प्रत्यक्ष अडचणींची दखलही न घेता कंपनीची बाजू नाकारली गेली. त्यामुळे महानिर्मिती कंपनीला आयोगाच्या दर आदेशांमुळे निर्माण झालेल्या समस्यांवर दाद मागण्यासाठी अपील न्यायाधिकरणाकडे जावे लागले.

अपील न्यायाधिकरणाने महानिर्मित कंपनीच्या दाव्याचा सुज्ञपणे विचार केला व कंपनीच्या वीज निर्मिती केंद्राच्या कामगिरीचा अभ्यास करण्यासाठी केंद्रीय वीज संशोधन संस्थेची नियुक्ती केली. महानिर्मितीने चिकाटीने आपली बाजू सातत्याने मांडल्यामुळे कंपनीची वित्तीय स्थिती किती खराब आहे हे निदर्शनास आणले व त्यामुळे अपील न्यायाधिकरणाने त्यानंतर कार्यवाहीचे आदेश वित्तीय वर्ष संपण्यापूर्वी दिले. महानिर्मित्तीच्या अशा निर्णयामध्ये ₹२०००/- कोटीचे दावे गुंतले होते. त्यापैकी वित्तीय वर्ष २०११ मध्ये ₹११७० कोटीच्या दाव्यांवर विचार झाला. महानिर्मितीने जर वेळेवर असे दावे केले नसते तर मागील वर्षाप्रमाणे आपली नफ्याची वित्तीय स्थिती संपादन करणे अवघड झाले असते.

सध्या कंपनीने केंद्रीय वीज संशोधन संस्थेच्या शिफारसींची अमलबजावणी सुरु केली आहे. व कामगिरी सुधारण्याचा प्रगतीपथ निश्चित केला आहे आणि त्यासाठी आवश्यक त्या भांडवली खर्चाची योजना केली आहे. मात्र प्रत्यक्ष कामगिरीकडे बघण्याचा नियामकांचा दृष्टीकोन पूर्वीसारखाच राहिला आहे. म्हणून भांडवली खर्च करुन आमच्या कामगिरी सुधारण्यात प्रत्यक्ष काय अडचणी येतात याबद्दळ आयोगाची खात्री पटविणे हे मोठे आव्हान महानिर्मिती पुढे आहे. असे मनपरिवर्तन झाले नाही तर कंपनीला असेच नकार मिळत राहतील व कंपनीची नफा कमविण्यात अडथळे येऊन काही जुनी युनिट बंद करावी लागतील या युनीटमुळे जरी जास्त तोटा होत असला तरी ती महावितरण कंपनीला बाजारात उपलब्ध असलेल्या दरापेक्षा कमी किंमतीमध्ये वीज देऊ शकतात.

## लाभांश

राज्यातील वीज टंचाईवर मात करण्यासाठी, आपल्या कंपनीने क्षमता वाढ करण्यासाठी विविध उपाय योजना हाती घेतल्या असल्यामुळे भविष्यातील वीज निर्मिती केंद्राच्या उभारणीसाठी खूप मोठ्या प्रमाणात निधी आवश्यक आहे. यामुळे यावर्षी कमवलेले आधिक्य पुनः या कामासाठी गुंतविण्याचा निर्णय आपल्या संचालकांनी घेतला आहे. म्हणून आढावा वर्षासाठी लाभांशाची शिफारस करण्यात आलेली नाही.

## कार्य प्रवर्तनातील कामगिरी

आपल्या महानिर्मिती कंपनीची एकूण स्थापत्य क्षमता दि. ३१ मार्च २०११ रोजी १००१७ मे.गा.वॅट आणि घटीत

क्षमता ९९८७ मे.वॅ. अशी होती. या वर्षात परळी-७ (२५० मे.वॅ.) हे केंद्र दि.३१.०७.२०१० रोजी कार्यान्वित झाले. तर पारस -४ (२५० मे.वॅ.) हे केंद्र दि.३१/०८/२०१० रोजी कार्यान्वित झाले. उरण युनिट २ ते ४ (३ × ६० मे.वॅ.) भुसावळ युनीट - १ (६२.५/५० मे.वॅ.) पारस युनीट २ (६२.५/५५ मे.वॅ.) आणि परळी १ व २ (२×३०/२×२० मे.वॅ.) ही केंद्र जुनी झाल्याने अनुक्रमे दिनांक १६.११.२०१०, १५.१२.२०१०, १६.११.२०१०, १५.१२.२०१० व ११.१२.२०१० रोजी निवृत्त/बंद केली. घाटघर युनीट-२ (१२५ मे. वॅ.) हे केंद्र दि. ३/१/२०११ रोजी महानिर्मितीस हस्तांतरीत करण्यात आले. कोराडी युनीट १ ते ४ (४×१२० / ४ ×१०५ मे.वॅ.) हे केंद्र दिनांक ७/१/११ रोजी बंद करण्यात आले. याशिवाय वीर (९ मे.वॅ.) हे केंद्र दि.०१.०६.२०१० रोजी महाराष्ट्र शासनास हस्तांतरीत करण्यात आले.

या वर्ष २०१०-११ मधे कोळसा आधारीत औष्णिक केंद्राचा सरासरी उपलब्धता अंक गतवर्षाच्या ८८.४० टक्क्यावरून ८१.६४ टक्के असा झाला. सयंत्र भार अंक (पीएलएफ) ६१.२३ टक्के होता. वर्ष १०-११ मधे १७ युनीटचे संधारण (ओवरहॉलींग) करण्यात आले. त्यापूर्वीच्या वर्षी म्हणजे वर्ष ०९-१० मधे १८ युनीटचे संधारण करण्यात आले होते. यावर्षी नियोजित बंदीचा अंक ५.४१ टक्के आणि सक्तीची बंदीचा अंक ५.०७ टक्के होता. गतवर्षी हे दोन्ही अंक अनुक्रमे ५.८२ टक्के व ५.७८ टक्के होते. वायू आधारीत वीज निर्मिती केंद्रांची सरासरी उपलब्धता ९७.१६ टक्के आणि संयत्र भार अंक ८०.०६ टक्के होता.

इतर प्रवर्तनाच्या कामगिरीचे कारणीभूत गोष्टी खालीलप्रमाणे-

कोळशाचे वास्तविकरण सन २०१०-११ मध्ये ८६.०० टक्के असुन गतवर्षी ते ८९.४९ टक्के होते. विशिष्ट कोळशाचा वापर सन २०१०-११ मध्ये ०.८५२ कि.किलोवॅट असुन गतवर्षी तो ०.८२६ कि. किलोवॅट इतका होता. सन २०१०-११ मधे बॉयलर नलीका गळतीची टक्केवारी २.५५ टक्के इतकी असून गतवर्षी ती ३.०२ टक्के इतकी होती. विशिष्ट तेल वापराचा दर सन २०१०-११ यावर्षी ५.७५ मिली/किलोवॅट इतका असून गतवर्षी तो ३.५६ मिली/किलोवॅट इतका होता.सहायक वीज वापर १०.६३ टक्के इतका असून गतवर्षी तो ९.९३ एवढा होता. सरासरी एकुण कोळसा ज्वलनाची कॅलरीमध्ये मुल्य या वर्षी ३२४५ किलो कॅलरी / किलो वॅट इतकी असून गतवर्षी ३५३३ किलो कॅलरी / किलो वॅट इतके होते. सन २०१०-११ या वर्षी उष्णतेचा दर २८१७ किलो कॅलरी / किलो वॅट इतका होता. पारेषण हानी सन २०१०-११ या वर्षी ०.५ टक्के इतकी असून गतवर्षी ती १.९९ टक्के होती.

## क्षमता वाढीचे कार्यक्रम

महाराष्ट्र राज्यातील विजेच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी महानिर्मिती कंपनी विविध औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राची उभारणी अंमलात आणत आहे. त्याचा तपशील असा -

## अ) कार्यान्वित केलेले औष्णिक वीज प्रकल्प एकूण क्षमता ५०० मे.वॅ.

### १) परळी औ.वि.केंद्रातील युनीट क्र.७ (क्षमता २५० मे.वॅ.)

मुख्य कारखान्याच्या यंत्रसामग्रीचा आदेश मेसर्स बी.एच.इ.एल (मेसर्स भेल) या कंपनीस

दि.३१.०८.२००६ रोजी (ही शून्य तारीख) देण्यात आला. या वर्षात सदर यूनीट संबधीत पुढील महत्त्वाचा टप्पा पूर्ण करण्यात आला.

| अनु. | महत्वाचा टप्पा | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १) | प्रायोगिक कार्य | ३०.०७.२०१० |

सदर युनीट दि. ३१.०७.२०१० रोजी कार्यान्वित झाले व सध्या ते कार्यरत आहे.

### २) पारस औ.वि.केंद्र युनीट ४ (२५० मे.वॅ.)

या युनीटच्या मुख्य यंत्रसामुग्री पुरविण्याचा आदेश मेसर्स भेल (बी.एच.इ.एल) या कंपनीस दि.३१.०८.२००६ रोजी (शून्य तारीख) देण्यात आला. यावर्षात सदर युनीटसंबंधीत पूढील महत्त्वाचा टप्पा पूर्ण करण्यात आला.

| अनु. | महत्वाचा टप्पा | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १) | प्रायोगिक कार्य | ०६.०८.२०१० |

सदर युनीट दि.३१.०८.२०१० रोजी कार्यान्वित झाले व सध्या ते कार्यरत आहे.

महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र.वि.नि.के. २००५/प्र.क्र.२०४४ ऊर्जा - ४ दि.१२.०५.२००६ अन्वये या प्रकल्पांना (युनीट्स) मान्यता दिली आहे.

## ब) वीजनिर्मितीसाठी तयार होणारे प्रकल्प : एकूण क्षमता ४७३० मे.वॅ.

### ३) खापरखेडा औ.वि.केंद्र युनीट ५ (५०० मे.वॅ)

या युनीटच्या मुख्य साधनसामग्री पुरविण्याची मागणी आदेश मेसर्स भेल (बी.एच.इ.एल.) यांना दि.२३.०१.२००७ रोजी (शून्य तारीख) दिली. कारखान्याच्या अन्य कामांसाठी दि.०३.०७.०७ रोजी मेसर्स बी.जी.आर. एनर्जी सिस्टीम्स लि. यांना आदेश देण्यात आला. आतापर्यंत खालील महत्त्वाचे टप्पे पूर्ण करण्यात आले.

| अनु. | महत्वाचे टप्पे | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १) | हायड्रॉलिक टेस्ट - नॉन ड्रेनेबल (जल चाचणी न गळण्याजोगी) | १२.०९.२०१० |
| २) | बॉयलर लाईट अप (बॉयलर प्रज्वलन) | २७.१०.२०१० |

| | | |
|---|---|---|
| ३) | स्टीम ब्लोईंग (बाष्प सोडणे) | ०६.०२.२०११ |
| ४) | युनीट सिक्रोनायझेशन (युनीटचे संकलन) | ३१.०३.२०११ |
| ५) | कोल फायरींग (कोळसा ज्वलन) | ३१.०३.२०११ |

सदर प्रकल्पाची / युनीटची पूढील कामे प्रगतीपथावर आहेत. हे युनीट पूर्ण भार क्षमतेने जुलै २०११ अखेरीस कार्यास तयार करयाचे दृष्टीसमोर ठेवले आहे.

**२) भुसावळ औ.वि.केंद्र युनीट ४ व ५ (२×५०० मे.वॅ.)**

मुख्य प्रकल्प सामग्री पुरविण्याची मागणी मेसर्स बी.एच.इ.एल. (भेल) यांना २३.०१.२००७ (शून्य तारीख) रोजी देण्यात आली. कारखान्याच्या उर्वरित साधनांसाठी मेसर्स टाटा प्रोजेक्ट्स लि. यांना दि.०५.११.२००७ रोजी आदेश देण्यात आला. यावर्षात खालील महत्त्वाचे टप्पे पूर्ण करण्यात आले.

| अनु. | युनीट - ४ चे महत्त्वाचे टप्पे | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १) | स्टेटर लिफ्टींग | २६.०७.२०१० |
| २) | बॉयलर लाईट अप (बॉयलर प्रज्वलन) | ०५.०३.२०११ |
| ३) | स्टीम ब्लोईंग (बाष्प सोडणे) | १९.०४.२०११ |
| ४) | युनीट सिक्रोनायझेशन (युनीटचे संकलन) | ११.०५.२०११ |

| अनु. | युनीट - ५ चे महत्त्वाचे टप्पे | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १) | हायड्रॉलिक टेस्ट - ड्रेनेबल (जल चाचणी गळण्याजोगी) | २९.०६.२०१० |
| २) | स्टेटर लिफ्टींग | २५.०३.२०११ |

या प्रकल्पाची कामे प्रगतीपथावर आहेत. युनीट क्र.४ चे पूर्ण भाराने कार्य ऑगस्ट २०११ पर्यंत सुरू करायचे आणि युनिट ५ चे पूर्ण भाराने कार्य जानेवारी २०१२ पर्यंत पूर्ण करण्याचे दृष्टीसमोर ठेवण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाने वरील प्रकल्पांना शासन निर्णय क्र.वि.नि.के.२००५/प्र.क्र.२०४/ऊर्जा-४ दि.१२.०५.२००६ अन्वये मान्यता दिली आहे.

## ३. चंद्रपूर औ.वि.केंद्र युनीट ८ व ९ (२ × ५०० मे.वॅ.)

मुख्य यंत्रसामग्रीसाठी मेसर्स भेल यांचेकडे मागणी दि. २५.०७.२००८ रोजी नोंदविली. शून्य तारीख-०९.०२.२००९ कारखान्याच्या उर्वरित सामग्रीसाठी मेसर्स बी.जी.आर. एनर्जी सिस्टीम्स, चेन्नई यांचेकडे दि.१२.०६.२००९ रोजी मागणी नोंदविली. या वर्षात कामाचे पूढील महत्त्वाचे टप्पे पूर्ण करण्यात आले.

| अनु. | युनीट - ८ चे महत्त्वाचे टप्पे | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १) | बॉयलर उभारणीचा प्रारंभ | ०१.०६.२०१० |
| २) | बॉयलर ड्रम लिफ्टींग | २९.०३.२०११ |

| अनु. | युनीट - ९ चे महत्त्वाचे टप्पे | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १) | बॉयलर उभारणीचा प्रारंभ | ०५.०१.२०११ |

या प्रकल्पाची कामे प्रगतीपथावर आहेत. युनीट क्र.८ चे पूर्ण भाराने कार्य नोव्हेंबर २०१२ मधे पूर्ण करण्याचे दृष्टीपूढे ठेवण्यात आले आहे. त्यानंतर युनीट क्र.९ चे काम एप्रिल २०१३ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

महाराष्ट्र शासनाने या प्रकल्पास मान्यता शासन निर्णय क्रमांक प्रकल्प - २००७/प्र.क्र.११०६/ ऊर्जा-४ दि. ०५.०३.२००८ नुसार दिली आहे.

## ४. परळी औ.वि.केंद्रातील युनीट क्र. ८ (२५० मे.वॅ.)

मुख्य यंत्रसामग्रीची मागणी मेसर्स भेल यांचेकडे दि.२०.०१.२००९ रोजी (शून्य तारीख) नोंदली आहे. नॅचरल ड्राफ्ट कूलींग टॉवर (एन.डी.सी.टी.) यांस व्याप्तीतून वगळून उर्वरित सामग्रीसाठी मेसर्स सुनील हाय-टेक इंजिनियर्स लि. यांचेकडे आदेश दि.०१.०१.२०१० रोजी देण्यात आला.

एन.डी.सी.टी. (या उपरोक्त मनोरा) 'फिल्म फिल्स' सह देण्याकरिता मेसर्स गॅमन इंडीया लि. यांचेकडे दि.०५.०१.२०१० रोजी मागणी देण्यात आली. या वर्षात सदर प्रकल्पात पुढील महत्त्वाचे टप्पे पूर्ण करण्यात आले.

| अनु. | युनीट - ८ चे महत्त्वाचे टप्पे | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १) | बॉयलर उभारणीचा प्रारंभ | २०.०८.२०१० |
| २) | बॉयलर ड्रम लिफ्टींग | १०.०४.२०११ |

प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत. युनीट नं.८ चे पूर्ण भार कार्य मार्च २०१३ पर्यंत पूर्ण करण्याचे दृष्टीसमोर आहे.

महाराष्ट्र शासनाने वरील प्रकल्पास शासन निर्णय क्र. प्रकल्प - २००८/प्र.क्र.१४९/ऊर्जा-४ दि.२६.०५.२००९ अन्वये मान्यता दिली आहे.

**५. कोराडी औ.वि.केंद्राचे युनीट क्र. ८,९ आणि १० (३×६६० मे.वॅ.)**

बॉयलर आणि टर्बो जनरेटर पॅकेज याची मागणी आदेश मे.एल. ॲण्ड टी. कडे दि.२३.०९.२००९ रोजी देण्यात आला. वर्ष २०१०-११ मध्ये उर्वरित कारखाना यासाठी मागणी आदेश मे. लॅनको इन्फ्राटेक लिमिटेड, हरियाणा यांचेकडे दि.२७.०७.२०१० रोजी देण्यात आला.

पुढील महत्त्वाचे टप्पे यावर्षात पूर्ण करण्यात आले.

| अनु. | युनीट क्र.- ८ चे महत्त्वाचे टप्पे | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १) | टी.जी.बिल्डींग फाउंडेशनच्या कामास प्रारंभ | २१.०६.२०१० |
| २) | बॉयलर फाउंडेशनच्या कामास प्रारंभ | २९.०६.२०१० |
| ३) | टी.जी.फाउंडेशन व डेक या कामास प्रारंभ | ०४.१०.२०१० |
| ४) | टी.जी.बिल्डींगच्या रचनेच्या उभारणीच्या कामास प्रारंभ | २१.१२.२०१० |
| ५) | बॉयलर उभारणीस प्रारंभ | २४.०३.२०११ |

| अनु. | युनीट क्र. - ९ चे महत्त्वाचे टप्पे | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १) | बॉयलर फाउंडेशनच्या कामास प्रारंभ | १०.१०.२०१० |
| २) | टी.जी.बिल्डींगच्या फाउंडेशनच्या कामास प्रारंभ | २६.१०.२०१० |
| ३) | टी.जी.फाउंडेशन व डेक याच्या कामास प्रारंभ | २९.१०.२०१० |

| अनु. | युनीट क्र. - १० चे महत्त्वाचे टप्पे | पूर्ण केल्याची तारीख |
|---|---|---|
| १) | बॉयलर फाउंडेशनच्या कामास प्रारंभ | ०७.०१.२०११ |

प्रकल्पाची पुढील कामे प्रगती पथावर आहेत.

युनीट क्र.८ चे कार्यान्वयन डिसेंबर २०१३ मधे करण्याचे वेळापत्रक आहे. त्यानंतर युनीट क्र.९ जून २०१४ मधे आणि युनीट क्र.१० डिसेंबर २०१४ मधे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

महाराष्ट्र शासनाने सदर प्रकल्पास शासन निर्णय क्र.प्रकल्प-२००८/प्र.क्र./११८९/ऊर्जा-४ दि.१४.१०.२००८ नुसार मान्यता दिली आहे.

## ब) भविष्यातील प्रकल्प (१३९४० मे.वॅ.)

### १) उरण वायू आधारीत संमीश्र चक्र वीज निर्मिती प्रकल्प (सी.सी.पी.पी) (१२२० मे.वॅ.) गट-१ : ४०६ मे.वॅ. गट-२ : ८१४ मे.वॅ.

या १२२० मे.वॅ. क्षमतेच्या वायू आधारीत संमीश्र चक्र वीज निर्मितीच्या प्रगत वर्गातील (अॅडव्हान्स क्लास) प्रकल्पाची स्थापना करण्याचा सर्वंकष कंत्राट देण्यासाठी दि.२८.०१.२०११ रोजी निविदा मागविण्यात आल्या. दि.०९.०२.२०११ ते २४.०२.२०११ दरम्यान निविदा विक्री झाली. दि.०८.०७.२०११ रोजी बोली प्राप्त झाल्या. त्यातील पाकीट क्र.१ त्याच दिवशी उघडण्यात आले. यापैकी मार्च २०१४ मधे ब्लॉक १ चे पत्र/काम देणे पूर्ण होईल. त्यानंतर ब्लॉक २ ची (८१४ मे.वॅ.) जून २०१४ पर्यंत कार्यवाही होईल अशी अपेक्षा आहे.

याबाबत जमीन, पाणी व अन्य सांविधानीक मंजुरी मिळाल्या आहेत. वायू संबंधी कार्यवाही चालू आहे.

महाराष्ट्र शासनाने उरण येथील १२२० मे.वॅ. संमीश्र चक्र वीज निर्मिती प्रकल्पास मान्यता शासन निर्णय क्रमांक प्रकल्प ०८/प्र.क्र.१२४६/ऊर्जा-४ दि.०२.०३.२०१० नुसार दिली आहे.

### २) भुसावळ औ.वि.केंद्र युनीट ६ (१×६६० मे.वॅ.)

प्रकल्पासाठी जमीनीचे संपादन झाले आहे. रेल्वे सायडींगसाठी जमीन संपादनाचे काम प्रगतीपथावर आहे. सदर प्रकल्पाच्या मुख्य कारखान्याचे कामाची मागणी आदेश मे २०१२ पर्यंत देण्याचे उद्दिष्ट आहे व या मर्यादेत ऑक्टोबर-२०१६ मधे प्रकल्प कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट आहे.

महाराष्ट्र शासनाने या प्रकल्पास शासकीय निर्णय क्र. प्रकल्प - २०१०/प्र.क्र.३/ऊर्जा-४ दि.०५.१०.२०१०नुसार मान्यता दिली आहे.

### ३) नाशिक औ.वि.केंद्र युनीट क्र. ६ (१×६६० मे.वॅ.)

नाशिक औ.वि.केंद्राच्या जागेत एक महाशक्तीसाठी कोळशावर चालणारे, ६६० मे.वॅ. क्षमतेचे कांतिक (क्रिटिकल) युनीट स्थापन करण्याची योजना आहे.

**४) पारस औ.वि.केंद्र युनीट क्र. ५ (१×६६० मे.वॅ.)**

सदर प्रकल्पाचे योजना आखण्याचे काम चालू आहे.

**५) लातूर कोळसा आधारित युनीट क्र. १ व २ (२×६६० मे.वॅ.) किंवा वायू आधारीत सी. सी.पी.पी. ब्लॉक १ व २ (२×७५० मे.वॅ.)**

महानिर्मिती कंपनीने लातूर येथे २×६६० मे.वॅ. क्षमतेचा कांतिक वीज निर्मिती प्रकल्प किंवा १५०० मे.वॅ. क्षमतेचा वायू आधारीत संमिश्र चक्र पद्धतीचा वीज निर्मिती प्रकल्प स्थापित करावा या हेतूने एक संयुक्त साहस कंपनीची रचना करण्यासाठी मेसर्स भेल सोबत सांमजस्याचा करार दि.१२.०८.२००९ रोजी केला.

सदर संयुक्त साहस कंपनीच्या मेसर्स भेल सोबतच्या करारावर दि.११.११.२०१० रोजी सह्या झाल्या. 'लातूर पॉवर कंपनी लिमिटेड' गठीत झाल्याचे प्रमाणपत्र कंपनी निबंधक मुंबई यांनी कंपनी अधिनियमानुसार दि.०६.०४.२०११ रोजी दिले आहे. त्यानंतर संयुक्त साहस कंपनीच्या रचनेचे काम प्रगतीपथावर आहे.

या प्रकल्पासाठी जमीन संपादन करण्याचे काम चालू आहे. जमीन संपादनासाठीच्या दरांना विभागीय आयुक्त यांनी मान्यता दिली आहे. इंधन जोडणीसाठी वाणिज्य व पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय या सोबत काम चालू आहे.

या प्रकल्पाच्या मुख्य कारखान्याच्या यंत्रसामुग्रीसाठीचा मागणी आदेशाचे पत्र एप्रिल २०१२ मधे पाठविण्याचे उद्दिष्ट आहे.

त्यानुसार या प्रकल्पाचे कार्यान्वयन पुढील प्रमाणे अपेक्षित आहे.

(१) कोळसा आधारीत :- युनीट क्र. १ एप्रिल २०१६ मधे आणि
युनीट क्र. २ सप्टेंबर २०१६ मधे.

(२) वायु आधारीत :- गट १ एप्रिल २०१५ मधे व गट २ जुन २०१५ मधे

महाराष्ट्र शासनाने सदर २×६६० मे.वॅ. कोळशाचा किंवा १५०० मे.वॅ.चा वायूचा प्रकल्प लातूर येथे किंवा महाराष्ट्रात कोणत्याही योग्य जागी सुरू करण्यास तत्वतः मान्यता पत्र क्र. प्रकल्प-०६१०/प्र.क्र.१९४/ऊर्जा-४ दि.२५.१०.२०१० नुसार दिली आहे.

कोळसा किंवा वायू यावर अंतीम निर्णय झाल्यावर महानिर्मिती कंपनी महाराष्ट्र शासनास या प्रकल्पाचा प्रस्ताव मंजूरीसाठी सादर करील. प्रकल्पाचा प्रकार व क्षमता याचा निर्णय लातूर पॉवर कंपनी करील.

**६) धोपावे औ.वि.केंद्र प्रकल्प युनीट क्र. १ ते ३ (३×६६० मे.वॅ.)**

धोपावे येथे संयुक्त साहस उपक्रम उभारून ६६० मे.वॅ. क्षमतेची ३ युनीटस् उभारण्याचा प्रस्ताव

महानिर्मिती कंपनीने सादर केला आहे. त्यासाठी जमीन संपादनाचे काम चालू आहे.

पाणी - या प्रकल्पास लागणारे एकूण ८० दशलक्ष घन मीटर (रिदलयू मीटर्स) कोयना प्रकल्पाच्या अंतीम टोकातून उपलब्ध होईल.

इंधन - या प्रकल्पास लागणारा कोळसा मच्छकाटा कोळसा खाणीतून उपलब्ध होईल.

सदर प्रकल्पास महाराष्ट्र शासनाची तत्त्वत: मान्यता मिळावा यासाठी शासनास प्रस्ताव दि.१३.१०.२०१० रोजी पाठविण्यात आलेला आहे. महाराष्ट्र शासनाने सुचीत केले आहे की, हा उपक्रम संयुक्त साहस पद्धतीने राबवावा. संयुक्त साहस भागीदाराची निवड करण्यासाठी सहायक म्हणून सल्लागार नेमण्यात आला आहे. डीपीआर बनविण्याचे काम चालू आहे.

**७) दोडांयचा औ.वि.केंद्र प्रकल्प युनीट क्र. १,२,३,४ व ५ (५×६६० मे.वॅ.)**

या प्रकल्पासाठी जमीन संपादनाचे कार्य चालू आहे.

**पाणी -** या प्रकल्पास लागणाऱ्या पाण्यासाठी जल संसाधन विभागाने तापी नदीच्या ४० दशलक्ष घन मीटर निम्न तापी प्रकल्पाद्वारे २×६६० मे.वॅ. (पहिल्या टप्प्यासाठी) देण्यास (सामान्यतः) मान्यता दिली आहे. तसेच तापी पाटबंधारे विकास महामंडळाने (टिआयडीसी) यांनी आणखी ४५ दशलक्ष घन मीटर पाणी ३×६६० मे.वॅ. च्या (दुसऱ्या टप्प्यास) मिश्र तापी प्रकल्पातून उपलब्ध होऊ शकेल असे कळविले आहे.

**इंधन -** युनीट क्र. १ व २ (टप्पा पहिला) यासाठी चेंदीपाडा कोळसा साठा, ओरीसा येथून उपलब्ध होईल. चेंदीपाडा साठी उत्तरप्रदेश - छत्तीसगड - महाराष्ट्र या संयुक्त साहस कंपनीने खाण विकासासाठी अधिकारी (एमडीओ) नियुक्त केला आहे. युनीट क्र.३,४ व ५ (टप्पा-२) यासाठी मच्छकाटा, ओरीसा येथून कोळसा मिळेल. मात्र जर धोपावे येथील ३×६६० मे.वॅ. क्षमतेच्या प्रकल्पास महाराष्ट्र शासनाने मंजुरी दिली तर हा कोळसा धोपावे कडे कळविण्यात येईल आणि दोंडायचा टप्पा-२ प्रकल्पास लागणारा कोळसा महानदी कोळसा खाण, ओरीसा येथून मिळविण्यात येईल. जर त्यास विलंब झाला तर अन्य मार्गे कोळसा मिळविण्यात येईल.

**पर्यावरण व वन खात्यांची परवानगी :** पर्यावरण व वन मंत्रालयाच्या औष्णिक वीज केंद्रे व कोळसा खाणी प्रकल्प या संबधीचे मूल्यांकन करणाऱ्या तज्ञ समिती सोबत संदर्भातील शर्ती (टिओआर) निश्चित करण्यासाठी दि.०५.०४.२०११ रोजी बैठक झाली.

सदर प्रकल्पाच्या मान्यतेसाठी महाराष्ट्र शासनाकडे प्रकरण सादर केले आहे. महाराष्ट्र शासनाने सुचीत केले आहे की, हा उपक्रम संयुक्त साहस पद्धतीने राबवावा. संयुक्त साहस भागीदाराची निवड करण्यासाठी सहायक म्हणून सल्लागार नेमण्यात आला आहे. डीपीआर बनविण्याचे काम चालू आहे.

**८) कंपा (ता.नागभिड, जि.चंद्रपूर) नजीक कोळसा आधारीत औ.वि.केंद्र प्रकल्प (२×६६०मे.वॅ.)**

कंपा नजीक कोळसा आधारीत वीज निर्मिती प्रकल्प संयुक्त साहस कंपनीची रचना करून सुरू करावा असा प्रस्ताव महानिर्मिती कंपनीने सादर केला आहे. या प्रकल्पाचा आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे. तसेच जमीन संपदानाचे प्रारंभिक कामे ही चालू आहेत. प्रकल्पास ४० दशलक्ष घन मीटर पाण्याची गरज असून त्याबाबत जल संसाधन विभागाशी संपर्क साधला आहे. प्रकल्पासाठी दीर्घ काळ कोळसा पुरवावा याबाबत कोळसा मंत्रालय व केंद्रीय वीज प्राधिकरण यांचे सोबत पाठपूरावा करण्यात येत आहे.

**९) मनोरा (ता.तिरोडा, जि.गोंदिया) नजीक कोळसा आधारीत प्रकल्प (२×६६० मे.वॅ.)**

हा प्रकल्प सध्या आराखडा करण्याच्या टप्प्यावर आहे. प्रारंभिक जमीन संपादनाची कामे सुरू आहेत. प्रकल्पास ४० दशलक्ष घनमीटर पाण्याची गरज आहे. ते मेंढरी (खैरी) येथील वैनगंगा नदीच्या बंधाऱ्यातून उपलब्ध करुन देण्यास जल संसाधन विभागाने असमर्थता दर्शविला आहे. दीर्घ मुदतीत कोळसा पुरवठ्यासाठी कोळसा मंत्रालय, केंद्रीय ऊर्जा प्राधिकरण यांच्याशी चर्चा चालू आहे.

**१०) मेंडकी (ता.ब्रह्मपूरी, जि.चंद्रपूर) येथील कोळसा आधारीत औ.वि.केंद्र (२×६६० मे.वॅ.)**

महानिर्मिती कंपनीने मेंडकी येथे २×६६० मे.वॅ. क्षमतेची युनीटसाठी संयुक्त साहस कंपनी सुरू करण्याचा प्रस्ताव दिला आहे. या प्रकल्पाचा आराखडा तयार करणे चालू आहे. जमीन संपादनाचे प्रारंभिक काम चालू आहे. या प्रकल्पासाठी ४० दशलक्ष घनमीटर पाणी लागेल त्यासाठी जल संसाधन विभाग आणि दीर्घ मुदतीच्या कोळशासाठी कोळसा मंत्रालय/केंद्रीय विकास प्राधिकरण यांच्याशी संपर्क साधला आहे.

## उपकंपन्या व संयुक्त साहस कंपन्या

**महागुज कॉलरीज लि.:** ही संस्था आपली कंपनी आणि गुजरात राज्य विद्युत कंपनी लि. या दोघांनी असून मच्छकाटा येथे साठ्यासाठी खाण खोदण्यासाठी एक संयुक्त साहस कंपनी आहे. सदर कंपनीने या प्रकल्पाचा कार्यवाहीसाठी एक खाण विकासक व चालक नियुक्त केला आहे. महत्वाची प्रारंभिक कार्ये म्हणजे जमीन संपादन करणे, विविध शासकीय विभागांची मंजूरी मिळविणे इ. सुरू झालेली आहेत. ओरीसा राज्य सरकारने प्रकल्पासाठी जमीन संपादनास मंजुरी दिली आहे. खाण विकासक व चालक म्हणजे मेसर्स अदानी एंटरप्रायझेस लि. आणि महागूज कोलायरीज लि. यांच्यात ३० एम.टी.पी.ए. कोळशासाठी एका करारावर ६ मे २०१० रोजी स्वाक्षऱ्या झाल्या.

मच्छकाटा येथील कोळसा साठ्याच्या उपलब्धतेचा विचार करून कोळसा मंत्रालयाने खाणीची क्षमता ३० एम.टी.पी.ए. वरून ५० एम.टी.पी.ए. अशी वाढविण्यासाठी आदेश दिला. त्याप्रमाणे महागूज कॉलरीजच्या मंडळाने खाणीची क्षमता ३० एम.टी.पी.ए. वरून ५० एम.टी.पी.ए. वाढविण्यास मंजुरी दिली.

**धुळे औष्णिक वीज कं. लि.:** भारत सरकारच्या, वीज मंत्रालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे

प्रकरण-२ अंतर्गत विविध हरीत क्षेत्र प्रकल्प कार्यान्वित करायचे आहेत. त्यानुसार सदर कंपनीची रचना करण्यात आली आहे. यावर्षी या कंपनीसंबंधी कार्य नव्हते.

**युसीएम कोल कंपनी लि.:** ही कंपनी म्हणजे आपली कंपनी व उत्तरप्रदेश राज्य विद्युत उत्पादन (युपीआरव्हीयुएनएल) निगम लि. आणि छत्तीसगड मिनरल डेव्हलपमेंट कार्पोरेशन (सीएमडीसी) यांची संयुक्त कंपनी असुन ती चेंदीपाडा व चेंदीपाडा क्र.२ येथील कोळशाचे उत्पादन करून त्याचे वाटप आपसात करणे यासाठी आहे.

## अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतासाठी उपक्रम (सौर उर्जा आधारीत वीज निर्मिती केंद्रे)

**चंद्रपूर १ मे वॅ. सौर पीव्ही वीज प्रकल्प:** नवीन व पूनर्वापर योग्य ऊर्जा मंत्रालय (एमएनआरई), भारत सरकार यांच्या जानेवारी २००८ च्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे महानिर्मिती कंपनीने १ मे.वॅ.क्षमतेचा सोलर पी.व्ही. वीज निर्मिती प्रकल्प चंद्रपूर महाऔष्णिक केंद्राच्या परिसरात उभारला. हा प्रकल्प दि. ९ एप्रिल २०१० रोजी कार्यान्वित झाला व त्यातून निर्मिलेल्या विजेचे पारेषण वीज जाळ्यात केले जाते. या प्रकल्पासाठी महानिर्मिती कं. ला निर्मिती आधारीत प्रोत्साहक संबंधीत मंत्रालयाकडून मिळते अशा प्रकारचा हा महाराष्ट्रातील पहिला व देशातील दुसरा प्रकल्प आहे.

### चंद्रपूर ४ मे.वॅ. प्रकल्प (२ मे.वॅ.क्रिस्ट लाईन + २ मे.वॅ. थीन फिल्म तंत्रज्ञान):

महानिर्मिती कंपनीच्या संचालक मंडळाने सोलार फोटो व्होल्टीक (एस.पी.व्ही.) अर्थात सूर्य प्रकाशापासून वीज निर्मिती करणारा एक ४ मे.वॅ.क्षमतेचा (२ मे.वॅ. क्रिस्टलाईन + २ मे.वॅ. थीन फिल्म तंत्रज्ञानाचा) प्रकल्प चंद्रपूर महाऔष्णिक केंद्राच्या परिसरात उभारण्यास मंजुरी दिली आहे.

- यासंबंधी मे. इस्टेट एनर्जी प्रा.लि. मुंबई यांना चंद्रपूर येथे २ मे.वॅ. (क्रिस्टलाईन तंत्रज्ञान) क्षमतेचा प्रकल्प उभारण्यासाठी पत्र देण्यात आले व त्यानुसार दि.२४.१२.२०१० रोजी करार करण्यात आला. तसेच मे. मेघा इंजिनिअरीज अॅड इन्फ्रास्ट्रक्चर लि. हैद्राबाद यांना २०.१०.२०१० रोजी २ एम.डब्ल्यू. पी. क्षमतेचा थीन फिल्म तंत्रज्ञानाचा वीज निर्मिती प्रकल्प चंद्रपूर येथे उभारण्यासंबंधी पत्र देण्यात आले.

- या प्रकल्पांना रा.औ.वि. महामंडळाने विद्युत व्यापार निगम (एन.व्ही.व्ही.एन.) यांनी जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय सौर ऊर्जा मिशन अंतर्गत स्थलांतर योजनेनुसार मंजूरी देण्यात आली.

- वरील महामंडळ व निगम यांनी महानिर्मिती सोबत वीज खरेदी करार दि.१५.१०.२०१० रोजी केला.

- इंडीयन रिन्यूएबल एनर्जी डेव्हलमेंट अॅथॉरीटी या संस्थेने या प्रकल्पांसाठी ₹३९.३९ कोटीचे कर्ज मंजूर केले आहे.

- हा प्रकल्प सप्टेंबर २०११ रोजी कार्यान्वित होईल.

## १२५ मे.वॅ. (५×२५ मे.वॅ.पी.) सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प शिवाजीनगर ता.साक्री, जिल्हा धुळे:

- महानिर्मिती कं.च्या संचालक मंडळाने शिवाजीनगर ता.साक्री जि.धुळे येथे वीज जाळ्याशी संलग्न असा १२५ मे.वॅ.पी. (५×२५ मे.वॅ.) वीज निर्मिती प्रकल्प उभारणीस मान्यता दिली.
- सदर १२५ एम.डब्ल्यू.पी. (५×१२५ मे.वॅ.) स्थापन करण्यासाठी आंतरराष्ट्रीय बोली मागविण्यात आल्या.
- के.एफ.डब्ल्यू. या जर्मनीच्या वित्तीय संस्थेने या प्रकल्पास कर्ज साह्य करण्यास प्रस्ताव दिला आहे.
- या प्रकल्पात ७५ मे.वॅ.क्षमता क्रिस्टलाईन अर्थात स्फटीक तंत्रज्ञानावर असेल आणि ५० मे.वॅ. क्षमता अतितलम पापूडा (थीन फिल्म) तंज्ञानावर राहणार आहे.
- अशा प्रकारचा सर्वात मोठा प्रकल्प जगात प्रथमच होणार आहे.
- किस्टलाईन तंत्रज्ञानाचे इ.पी.सी. कंत्राट मेसर्स लॅनको सोलर एनर्जी गुरगांव या संस्थेस व थील फिल्म तंत्रज्ञानाचे कंत्राट मेसर्स मेघा इंडस्ट्रीज हैद्राबाद यांना देण्यात आले आहे.

### भविष्यातील प्रकल्प:

- महानिर्मिती मंडळाने धोरोळा, ता.कळंब, जि.उस्मानाबाद येथे सौर वीजनिर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी ८७.५४ हेक्टर सरकारी जमीन संपादन करण्यास मंजुरी दिली आहे.
- महानिर्मिती मंडळाने गंगाखेड, ता.परभणी येथे सौर औष्णिक वीज प्रकल्प उभारण्यासाठी जमीन संपादन करण्यास मंजुरी दिली आहे.
- महानिर्मिती कंपनीची महाराष्ट्र राज्यात उस्मानाबाद, गंगाखेड, यवतमाळ, भुसावळ आणि चंद्रपूर येथे सौर ऊर्जा संचय केंद्रे उभारण्याची योजना आहे. के.एफ.डब्ल्यू यासाठी जर्मन सरकारची मंजुरी योजनेनुसार तांत्रिक साह्य पुरविणार आहे.

### नव्या प्रकल्पांसाठी निधी:

वीज निर्मिती क्षमता वाढीच्या सर्व कार्यक्रमासाठी कर्ज व समभाग यांचे ८०:२० या गुणोत्तरानुसार निधी उभारला जाईल. आपली कंपनी विस्तार प्रकल्पाच्या समभागाच्या वाट्याचा भागासाठी महसूल संसाधने उपयोगात आणील. एकूण प्रकल्प खर्चापैकी ८० टक्के निधी वित्तीय संस्था व बॅकांमार्फत मिळेल. २० टक्के समभाग महाराष्ट्र शासनाकडून घेतले जातील.

### पतदारीचा दर्जा (क्रेडीट रेटींग):

कंपनीच्या दीर्घ व अल्प मुदतीच्या निधी उभारणीच्या पतीचा दर्जा निश्चित करण्याचे काम मेसर्स क्रेडीट ॲनालिसिस ॲड रिसर्च लि. (केअर) या संस्थेकडे दिले आहे. कंपनीच्या दीर्घ मुदतीच्या निधीसाठी 'ए' - असा

पतदर्जा मिळाला आहे. म्हणजे **कमी जोखीम आहे**. तर अल्प मुदतीसाठी 'पी.आर.वन.' दर्जा मिळाला आहे. त्याचा अर्थ अल्प मुदतीच्या बंधनाचा **भरणा वेळेवर करण्याची कंपनीची क्षमता 'भक्कम' आहे म्हणून त्यानूसार जोखीम अगदी कमी आहे.**

**इंधन उपलब्धता :**

**१) महानिर्मितीची कोळशाची गरज:**

महानिर्मिती कंपनीची वार्षिक कोळशाची गरज ३८.९५ दशलक्ष मेट्रीक टन प्रती वर्ष इतकी आहे. कंपनी देशातंर्गत तसेच इ लिलाव व आयात करुन कोळसा मिळविते.

देशांतर्गत कोळसा : ३५.६० एम.एम.टी (दशलक्ष मेट्रीक टन) (यामध्ये इ. लिलावामार्फत २ एम.एम.टी समाविष्ट)

आयात कोळसा ०३.३५ एम.एम.टी

देशांतर्गत कोळशाची खराब होणारी जी.सी.व्ही आणि मोठया संख्येने असलेल्या बॉयलरची रचना विचारात घेऊन हिशेब केल्यास असे लक्षात येईल की आयात केलेला कोळासाचा वापर ३.३५ एम.एम.टी इतका ठेवला तर महानिर्मीतीचा संयत्र भार अंक (पी.एल.एफ) हा फक्त ६५ टक्के एवढाच साध्य होईल.

अधिक उच्च संयत्र भार अंक साध्य करण्यासाठी अधिक चांगल्या दर्जाचा कोळसा आयात करावा लागेल जर म.वि.नि. आयोगाने अधिक वास्तववादी स्टेशन हिट रेट नॉर्म्स निश्चित केले नाही तर महानिर्मिती कंपनीस जास्त तोटा होईल.

**२) इंधन पुरवठा करार:**

महानिर्मितीने कोळसा कंपनीसोबत वार्षिक करारानुसार योग्य संख्येने कोळसा मिळविण्यासाठी खालील प्रमाणे करार केले आहेत.

| कोळसा कंपनीचे नांव | वार्षिक कोळसा एम.एम.टी.पी.ए मध्ये | कराराचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| डब्ल्यू सी एल | २२.७०१ | २१.११.२००९ | दि. ०१.०४.०९ पासून अमलबजावणी २० वर्षासाठी कार्यरत, दर पाच वर्षानी वार्षिक कोळसा संख्या व इतर तरतुदी यांचा आढावा घेण्यात येईल. |
| एस.इ.सी.एल | ०६.०२७ | २६.०६.२००९ | |
| एम.सी.एल | ०६.१७२ | २६.०६.२००९ | |
| एस.सी.सी.एल | ०२.२६० | ०५.०३.२००९ | |

| | | | |
|---|---|---|---|
| एम.सी.एल | ०२.६३८ | - | पारस -४ परळी ७ व के.पी. के. डी. ५ साठी सामंजस्य करार |
| आयात कोळसा | ०३.३५ | - | २० सप्टे.२०११ रोजी कंत्राटावर सहया झाल्या. |
| **एकूण** | **४३.१४** | | **-** |

**३) इ-लिलावा मार्फत कोळसा:**

महानिर्मिती कंपनीने मे. एस.सी.सी. एल सोबत वित्तय वर्ष - २०११- १२ मध्ये वरील वार्षिक कोळसा व्यतिरिक्त इ-लिलावामार्फत परळी व चंद्रपूर वीज केंद्रासाठी जादा १.२ एम.एम.टी कोळसा घेण्यासाठी सामजस्याचे करार केले आहेत. मात्र मे. एस.सी.सी.एल यांनी त्यांच्या विद्यमान इंधन पुरवठा करार धारकांच्या बंधनांच्या पूर्तता करावयाची असल्याने त्यांनी चंद्रपूर महाऔष्णिक केंद्र व परळी याना इ. लिलावाद्वारे आवश्यक संख्येत कोळसा पुरविण्यास असमर्थता व्यक्त केली आहे.

**४) आयात कोळसा:**

महानिर्मिती कंपनीने वीज मंत्रालयाने वित्तीय वर्ष २०११-१२ साठी (ऑक्टोबर-११ ते जून १२) दरम्यान ३.३५ एम.एमटी या उदिष्टाप्रमाणे ३.३५ एम.एम.टी कोळसा आयात करण्याचे कंत्राट दिले आहे.

**५)** या पूर्वीच्या इंधन पुरवठा करारातील वार्षिक कोळसा तेवढया संख्येच्या प्रत्यक्षात ९० टक्के मिळाल्यास मे.एम.सी.एल.च्या वार्षिक कोळसा करारातील ५० टक्के प्रमाणात कोळसा मिळाल्यास एकूण उपलब्धता ३८.८४ एम.एम.टी होईल वित्तीय वर्ष -२०११-१२ मध्ये जुनी वीज केंद्र बंद होण्याची शक्यता गृहीत धरुन म.वि.नि. आयोगाने दिली वीज निर्मितीची लक्ष्ये विचारात घेतल्यास गरजेपेक्षा जास्त कोळसा उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

**सी.आय.एल / एम.सी.एल संबधित कोळसा पुरवठयाच्या समस्या:**

सी.आय.एल च्या उत्पादन क्षमतेवर काही मर्यादा असल्याने सदर कंपनी १ एप्रिल २००९ नंतर कार्यान्वित झालेल्या नव्या वीज निमित्ती प्रकल्पांना वार्षिक कराराच्या ५० टक्कापेक्षा जास्त पुरवठा करण्याची बांधिलकी स्वीकारण्याचा स्थितीत नाही. त्यामुळे महानिर्मितीच्या प्रकल्पांना ४.६७२ एमटीपीए या प्रमाणे कोळशाची टंचाई भासू शकेल.

एल.टी/ एल.ओ.ए यातील संख्येतील ५० टक्के (म्हणजे ४.६७२ एम.टी.पी.ए) आणि आयात कोळशात जादा १५ टक्के (म्हणजे १.४०१ एमटीपीए ही कच्चा कोळशाच्या दुप्पट म्हणजे २.८०३ एम.टी. पी.ए) घट झाल्यास, महानिर्मिती कंपनी उर्वरित कोळसा (म्हणजे १.८६८ एम.टी.पी.ए) इ. लिलावा मार्फत बोला लावून खरेदी करील.

कोळसा, त्याच्या विविध स्त्रोतांकडून मागणी व पुरवठा यात पडणारे अंतर यातील शक्यता विचारात घेऊन इंधन व्यवस्थापन कक्षाने (एफ.एम.सी) कोळसा टंचाईवर मात करण्यासाठी व वीजकेद्रांना इंधन सुरक्षिततेची चालू व भविष्यात खात्री देण्यासाठी खालील पर्याय तयार केले आहेत.

**अ) पर्याय- १:**

महानिर्मिती कंपनीने कोराडी, भुसावळ, नाशिक व परळी वीज कंद्रातील जुने युनीटस बंद केले आहेत. या युनीटला लागणारा कोळसा ४.७ एम.एम.टी (दराने) म्हणून एकूण ४.७ एम.टी कोळशाची उपलब्ध होईल. गेल्या ३ वर्षातील प्रत्यक्ष ८५ टक्के सरासरीच्या विचारात घेतली तर महानिर्मिती कंपनीला ३.९९५ एम.टी. कोळसा मिळेल.

गेल्या ३-४ महिन्यात एम.सी.एल ची फक्त ३० टक्के तरतुद मिळाली. तसेच महानिर्मितीला प्रामुख्याने डब्ल्यू सी.एल.चे धुलाई करार संपल्यानंतर धुलाईकरिता मिळणारा कच्चा कोळसा मिळत नाही. जुन्या युनीट्सची अतिरिक्त उपलब्धता ही चालू युनीट्सची गरज पूर्ण करण्या इतकी पुरेशी नाही.

चंद्रपूर ८ व ९ आणि कोराडी ८ या युनीटस्ची वर्ष २०१३-१४ ची गरज ५.४९ एम.एम.टी व वर्ष २०१४-१५ ची गरज ९.६६ एम.एम.टी आहे. (९५ टक्के संयम भार अंक विचारात घेतल्यास)

या केंद्राची गरज, आयात कोळशांमार्फत आणि विद्यमान युनीटस मधील कच्चा कोळसा तिकडे वळवून व त्याचा मिश्रणासाठी वापर करुन भागवता येईल चंद्रपूर व कोराडी प्रकल्पाच्या वार्षिक गरजेपैकी ६० टक्के कोळसा म्हणजे वर्ष २०१३-१४ साठी ३.२९४ एम.एम.टी वर्ष २०१४-१५ साठी ५.७९६ एम.एम.टी वळविल्यास वर्ष २०१३-१४ मध्ये २.१९६ एम.टी.पी.ए चा आणि वर्ष २०१४-१५ मध्ये ३.८६४ एम.टी.पी.ए चा तुटवडा पडेल. तो तुटवडा वर्ष २०१३-१४ मध्ये १.१ एम.एम.टी आणि वर्ष २०१४-१५ साठी १.९ एम.एम.टी कोळसा आयात करुन भागविता येईल.

सध्या वीजनिर्मिती करीत असलेल्या केंद्राचा कच्चा कोळसा चंद्रपूर व कोराडी प्रकल्पाला वळविल्यामुळे या निर्मिती केंद्राना कोळशाचा तुटवडा पडेल. तो तुटवडा वर्ष २०१३-१४ मध्ये १.६५ एमएमटी व वर्ष २०१४-१५ मध्ये २.८९ एमएमटी कोळसा आयात करून भागविता येईल.

महानिर्मिती ला वर्ष २०१३-१४ मध्ये जादा २.६५ एम.एम.टी आणि वर्ष २०१४-१५ साठी जास्त ४.७५ एम.एम.टी कोळसा आयात करावा लागणार आहे.

**ब) पर्याय- २:**

१) जर इंधन पुरवठा करारातील तरतुदीप्रमाणे बंद केलेल्या युनीट्सचा पुरवठा कोळसा मंत्रालयाने दिला नाही तर महानिर्मितीला जुनी युनीटस् बंद करावी लागतील. ज्या युनीट्सचे त्यांच्या स्थापना दिनापासून कारखान्याचे वय २५ वर्षपेक्षा जास्त झाले आहे. त्याची यादी अशी :

| जुन्या युनीटचे नांव | स्थापना वर्ष | क्षमता (मे.न) | सध्या लागणारा कोळसा |
|---|---|---|---|
| कोराडी यू ५ | १५.७.१९७८ | २०० | १.२ |
| भुसावळ यू २ | ३०.०८.१९७९ | २१० | १.२ |
| नाशिक यू ३ | २६.०४.१९७९ | २१० | १.२ |
| परळी यू ३ | १०.१०.१९८० | २१० | १.२ |
| नाशिक यू ४ | १०.०७.१९८० | २१० | १.२ |
| नाशिक यू ५ | ३०.०१.१९८१ | २१० | १.२ |
| **एकूण** | | -- | **७.२** |

२) अशा प्रकारे एकूण ७.२ एम.टी याप्रमाणे कोळसा उपलब्ध होऊ शकेल गेल्या ३ वर्षात महानिर्मितीची प्रत्यक्ष सरासरी ८५ टक्के होती, ती विचारात घेतल्यास महानिर्मितीला ६.१२ एम.टी या प्रमाणात कोळसा मिळू शकेल.

३) या जुन्या युनीट्सकडे जाणारा कोळसा नव्याने उभ्या रहात असलेल्या चंद्रपूर (२×५०० मेवॅ) आणि कोराडी (३×६६० मे.वॅ) या युनीट्स कडे कळविल्यास, त्यांच्या वार्षिक गरज १५.५४ एम.टी.पी.एस (९५ टक्के - भार संयम अंक, विचारात घेतल्यास) राहील. त्यात ९.४२ एम.टी.ची तूट पडेल ती ४.७१ एम.एम.टी कोळसा आयात करुन भागविता येईल. (म्हणजे ३० टक्के दराने)

४) केंद्रिय वीज प्राधिकरणाने ३० टक्के आयात कोळसा वापरण्याचे बंधन कारक केले असल्याने, महानिर्मितीला आयात कोळसा वापरण्यासाठी तांत्रिक क्षमता वाढवावी लागेल.

५) मे. वेस्टर्न कोलफिल्डस् लि. ने देऊ केलेला कोळसा ऑनलाईन इ-लिलाव बोली पध्दतीने मिळविता येईल. डब्यू सी.एल ने त्यांच्या वेबसाईटवर एप्रील २०१० ते नोव्हे.२०१० साठी कोळशाची आकडेवारी व किमती दर्शविल्या आहेत. सरासरी अधिसूचित किंमत ₹१४१२.६२/- आहे. सरासरी राखीव किंमत ₹१८३६.३७/- आहे आता सरासरी बोली किंमत ₹२५९७.३७/- प्रती टन **(म्हणजे राखीव किंमती पेक्षा ४१.४४ टक्के जास्त व अधिसूचित किमती पेक्षा ८३.८६ टक्के जास्त)**

**क) इतर कोळसा स्त्रोत्रांचे पर्याय:**

महानिर्मितीला विजेची कमतरता भरुन काढण्यासाठी खालील पर्यायांचा शक्यता अजमावी लागेल.

१. डब्ल्यू सी.एल. चे बहूसंख्य कॉस्ट प्लस प्रकल्प हे महानिर्मितीच्या वीज निर्मिती केंद्राच्या जवळ आहेत महानिर्मिती कोळसा पुरवठयाचे करार करुन या कॉस्ट प्लस खाणीतील कोळशाद्वारे इंधन सुरक्षेची हमी मिळवू शकेल.

२. परळी, पारस, खापरखेडा व भुसावळ प्रकल्पासाठी आयात केलेल्या १५ टक्के आयात कोळसा (म्हणजेच १.४० एमटीपीए) व सध्याचा विचारात घेऊन महानिर्मिती एकूण ५० टक्के कोळसा दीर्घ मुदतीच्या कराराने आयात करील व उर्वरित ५० टक्के जागतीक वार्षिक निविदा मार्फत मिळविल.

३. महानिर्मिती इंडोनेशिया, दक्षिण आफ्रिका व ऑस्ट्रेलिया येथील कोळसा साठे / ऊर्जा मत्ता संपादन करील किंवा तेथील खाण मालकांसोबत दीर्घ मुदतीचे पुरवठा करार करील.

४. सध्या कोल इंडिया लि. यांनी ऑनलाईन इ-लिलाव बोली मार्फत देऊ केलेला कोळसा ८/१० दिवस आधी जाहीर होतो. कोल इंडियाने त्यांच्या विविध खात्यातील इ-लिलावाचा कार्यक्रम वर्षाच्या प्रारंभी उपलब्ध कोळशाचा दर्जा व संख्या यासह जाहीर करावा अशी विनंती कोल इंडियाला करण्यात येईल.

५. गारे पाल्मा सेक्टर -१ : कोळसा साठा येथील उपलब्धी:

कोळसा मंत्रालयाचे गारे पालमा सेक्टर २ येथील कोळसासाठी तामीळनाडू राज्य विद्युत मंडळ आणि मे. महाराष्ट्र राज्य खाणकाम महामंडळ (एम.एस.एम.सी.एल) यांना संयुक्तपणे दिला आहे. वाटप पत्रानुसार महाराष्ट्र राज्य खाणकाम मंडळाचा कोळसाचा वाटा १७५ एम.टी. आहे यातील १२०-१४० दशलक्ष टनाचा खनीकर्म उपलब्धता आणि ३० वर्षाचे आयुष्य याचा विचार केल्यास ४-४.५ एम.टी.पी.ए एवढा कोळसा (दरवर्षी) मिळू शकेल.

एम.एस.एम.सी यांनी महानिर्मितीला गारे पाल्मा सेक्टर २ येथील कोळसासाठा खर्च अधिक तत्वावर (कॉस्ट प्लस बेसीस) खरेदी करु देण्याची तयारी दर्शविली आहे.

महानिर्मिती कंपनीने आपली पत्रे दि. १९.१२.२००९ व ११.०१.२०११ नुसार एम.एस.एम.सी. च्या वाटयाचा कोळसा आपल्या वीज निर्मितीच्या साठी अंतीम टप्पात वापरण्याची तयारी दर्शविली आहे. तसेच महानिर्मितीला दि. ०७.०५.२०११ रोजी प्रधान सचिव (उद्योग), महाराष्ट्र शासन यानी पत्र लिहून आपली मान्यता कळविली आहे. एम.एस.एम.सी. च्या प्रतिसादाची प्रतिक्षा आहे.

६. राज्य शासनाने नोंदोरी, कोंडा, हरदोली, वणी-आळेसूर, येकोना-१व२, महाडोली - येवती येथील कोळसा साठयांचे (एकूण कोळसा साठा २३३ एम.एम.टीदराने) आरक्षणाचा प्रस्ताव मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. आणि हे साठे महानिर्मिती कंपनीला सूपूर्त करण्यात येतील. महानिर्मितीच्या प्रकल्पाची कोळशाची गरज व इंधन सुरक्षा यासाठी हे साठे महानिर्मिती कंपनीला मिळावेत यासाठी कोळसा मंत्रालयाकडे पाठपूरावा करण्यात येत आहे.

कोल इंडीयाचा कोळसा, मच्छकाटा, चेंदीपाडा आणि महानदी येथील कोळसा साठयांचे उत्पादन, इंधन सुरक्षेसाठी इ-लिलावातील कोळसा, जुन्या युनीटचा विद्यमान कोळसा आणि आयात कोळसा या सर्वाचा विचार केल्यास आणि जर सर्व कामे वेळेवर झाली व महानिर्मितीला कोल इंडीया व कोळसा मंत्रालय यांचेकडून आवश्यक पाठिंबा मिळाला तर महानिर्मितीला आपले विद्यमान चालू प्रकल्प, उभारणी होत असलेले प्रकल्प आणि भविष्यातील योजना याचेसाठी पूरेसा कोळसा उपलब्ध होईल.

७. **वायू (आर.एल.एन.जी/एन.जी): जीटीपीएस, महानिर्मितीसाठी:** महानिर्मितीच्या जीटीपीएस उरण येथील स्थापित क्षमता ८५२ मे.वॅ. आहे. केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने आपले पत्र दि.२९.११.२०१० नुसार तेथील प्रत्येकी ६० मे.वॅ.क्षमतेच्या युनीट कं. १ ते ४ यांना निवृत्त करण्यास मान्यता दिली आहे. आता उरण येथील विद्यमान वीज निर्मिती केंद्राची घटीत क्षमता ६७२ मे.वॅ. आहे. सध्या यासाठी ३.५ एम. एम.एस.सी.एम.डी या प्रमाणे वायू लागतो. त्यासाठी महानिर्मितीने मेसर्स गेल सोबत ३.५ एम.एम.एस. सी.एम.डी. वायू पुरवठा करण्यासाठी वायू पुरवठा व खरेदी करार केलेला आहे. मे. गेल सरासरी २.३ एम.एम.एस.सी.एम.डी. वायू पुरविते. वायू वितरणासाठी अधिकार असलेल्या मंत्र्याच्या गटाने जीटीपीएस उरण साठी १.०० एम.एम.एस.सी.एम.डी. एवढा नैसर्गिक वायूचा वाटा दिला आहे.

महानिर्मितीने मे. रिलायन्स इंडस्ट्रीज लि. (आरआयएल) सोबत त्यांच्या कृष्णा गोदावरी (केजी) खोऱ्यातील क्षेत्रातून डॉलर ४.२०५ प्रती एम.एम.बी.टी.यू दराने वायूचा पुरवठा काकीनाडा (आंध्रप्रदेश) येथून करण्यासाठी एक वायू पुरवठा व खरेदी करार (जीएसपीए) केला आहे. महानिर्मितीने मे.आरआयएल व मे. एन आय के ओ यांचे सोबत २१.०४.२००९ रोजी जी एस पी ए केला त्यानुसार जी.टी.पी.एस उरण च्या (विद्यमान) वापरासाठी पाच वर्षापर्यंत (म्हणजे २२.०४.२००९ ते २१.०४.२०१४) १.०० एम.एम.एस.सी.एम.डी.आर.एल.एन.जी. असा वायू पुरविला जाईल.

याशिवाय महानिर्मितीने मेसर्स रिलायन्स गॅस ट्रान्समिशन इन्फास्ट्रक्चर लि. (आर.जी.टी.आय.एल) सोबत दि.२१.०४.२००९ रोजी वायू पारेषणाचा करार केला. यानुसार काकीनाडा ते जी.टी.पी.एस. उरण येथ पर्यंत पूर्व -पश्चिम पाईप लाईनने मसकल मार्गे तेथील इ डब्ल्यू पी एल (आर जी टी आय एल) आणि डी यू पी एल (गेल) या जोडणी केंद्रापासून पुढील पाच वर्षासाठी म्हणजे ३१.०३.२०१४ पर्यंत पाईपलाईनने वायू संक्रमित केला जाईल.

पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाने उरण प्रकल्पासाठी कायम तत्वावर आणखी ०.४ एम.एम.एस.सी एम.डी. इतका वायू मंजूर केला आहे. या जादा ०.४ एम.एम एस.सी.एम.डी वायूच्या पुरवठयासाठी महानिर्मिती कंपनीने दि. १०.०४.२०१० रोजी आर.आय.एल आणि एन.आय.के.ओ. सोबत दुरुस्त आदेशावर सहया केल्या महानिर्मितीने वायू वाहतूक कराराच्या बाजूने एका पत्रावर ४५००१ एम एम बी टी यू (१.४० एम.एम.एस.सी.एम.डी.) वायूचा कायम तत्वानुसार वाहतुकीसाठी २१.०४.२०१० रोजी सह्या केल्या.

जी. टी. पी. एस उरण येथील वीज निर्मितीच्या वेळापत्रकाचा आढावा घेतल्यावर महानिर्मितीने मे आर. आय.एल यांना विनंती केली की, त्यांनी त्यांची कायम डी.सी.क्यू यामध्ये ४५००१ एम. एम. बी. टी. यू (१.४० एम.एम.एस.सी.एम.डी या दराने) ऐवजी ३८५७२ एम.एम.बी.टी.यू (१.२० एम.एम.एस.सी. एम.डी) अशी कपात करावी. मे आर.एल.आय यांनी त्यांचे पत्र दि.१३.११.२०१० नुसार कायम डी. सी.क्यू. ४५००१ एम. एम बी. टी. यू वरुन ३८५७२ एम.एम.बी.टी.यू अशी सुधारणा दि. १.११.२०१० पासून केल आहे.

**कोळसा / इंधन पुरवठयाचे करार (सी.एस.ए / एफ.एस.ए):**

**अ) मे. डब्ल्यू सी.एल. सोबत कोळसा पुरवठा करार:** नवीन कोळसा वितरण धोरणानुसार डब्ल्यू सी.एल सोबत २१ नोव्हें.२००९ रोजी इंधन पुरवठा करार करण्यात आला. त्यानुसार ०१.०४.२००९ पासून २० वर्ष मुदतीसाठी २२.७०१ दशलक्ष एम.टी. या प्रमाणे वार्षिक कोळसा मिळण्यासाठी करार (एसीक्यु) केला. त्याचा पाच वर्षानी आढावा घेण्यात येईल.

**ब) एस.ई.सी.एल सोबत कोळसा पुरवठयाचा करार:** महानिर्मिती कंपनीने नवीन कोळसा वितरण धोरणानुसार २६ जून २००९ रोजी एस.इ.सी.एल सोबत २० वर्षासाठी दरवर्षी ६.०२७ दशलक्ष एम. टी. याप्रमाणे कोळसा पुरवठयाचा करार केला. पाच वर्षांनी त्याचा आढावा घेण्यात येईल.

**क) एम.सी.एल. सोबत कोळसा पुरवठा करार:** महानिर्मिती कंपनीने नवीन कोळसा वितरण धोरणानुसार २६ जून २००९ रोजी २० वर्षासाठी दरवर्षी ६.१७२ दशलक्ष एम.टी. कोळसा मिळविण्याचा करार केला. त्याचा पाच वर्षाचा आढावा घेण्यात येईल.

**ड) एस.सी.सी एल सोबत कोळसा पुरवठा करार:** महानिर्मितीने नवीन कोळसा वितरण धोरणानुसार दि. ०५ मार्च २००९ रोजी एक सुधारीत नवीन इंधन पुरवठा करार केला. त्यानुसारदि.०१.०४.२००९ पासून पाचवर्षासाठी दरवष २.२६ दशलक्ष एम.टी. कोळसा मिळेल. तीन वर्षानी त्याचा आढावा घेतला जाईल.

**एम.सी.एफ सोबत इंधन पुरवठा करारासंबंधी वाद**

कोळसा मंत्रालय, भारत सरकार यांनी महानिर्मिती कंपनीच्या नव्या प्रकल्पासाठी महानदी कोलफिल्डस् लिमिटेड (एमसीएल) सोबत दीर्घ मुदतीचा कोळसा जोडणी ('एफ' श्रेणी) मंजूर केला आहे. कोल इंडीया लि. यांच्या आदेशानुसार महानिर्मितीने परळी-७, पारस-४ व खापरखेडा-५ युनीट्साठी कोळशा पुरवठ्यासाठी एक सामंजस्याचा करार केला.

मेसर्स एम.सी.एल. सोबत कोल इंडिया लि. यांनी प्रमाणित केलेल्या मसुद्यानुसार परळी-७ (२५० मे.वॅ.)

पारस-४ (२५० मे.वॅ.), खापरखेडा युनीट-५ (५०० मे.वॅ.) आणि भुसावळ युनीट क्र.४ व ५ (२×५०० मे.वॅ.) प्रकल्पांकरिता दीर्घ मुदतीचा कोळसा जोडणीसाठीचा इंधन पुरवठा करार करण्याचा महानिर्मिती कंपनीचा हेतू आहे. महानिर्मिती मे.एम.सी.एल. सोबत कोल इंडिया लि. यांनी दिलेल्या कोळसा पुरवठ्याच्या संख्येनुसार इंधन पुरवठा करार करण्याची आपली तयारी कळविली आहे.

याबाबत मे.एम.सी.एल. यांनी असा आग्रह धरला आहे की एक वेगळा सामंजस्याचा करार करून त्यासोबत इंधन पुरवठा करारावर सह्या करण्यात याव्यात.मात्र संबंधित सामंजस्याच्या कराराच्या मसुद्यातील करारातील काही कलमांमधे असंगती आहे. जी कोल इंडीया लि. यांनी मंजूर केलेल्या इंधन पुरवठा कराराच्या (एफएसए) मसुद्याच्या विरोधात आहे. सामंजस्य कराराच्या (एमओयु) कलम क्र.६ (viii) नुसार पुरवठ्यातील तुटवडा किंवा कमी उपसा (लिफ्ट) झाल्यास त्यामुळे उद्‌वणाऱ्या भरपाईचा हिशेब करण्यासाठी, सदर करारपत्रातील एसीक्यु (सरासरी कोळसा प्रमाण) हे ५० टक्क्यांने कमी झाल्याचे समजण्यात येईल. वेगळ्या शब्दात सांगायचे म्हणजे जर पुरवठा / उपसा हा इंधन पुरवठा करार (एफएसए) यात दिलेला एसीक्यु म्हणजे सरासरी कोळसा प्रमाण यापेक्षा २५ टक्क्यापेक्षा कमी झाला तर भरपाई देय असेल. मात्र कोल इंडीया मंजूर केलेल्या एफ.एस.ए.च्या मसुद्यातील कलम ३.६.१ नुसार जर पुरवठा/उपसा एफ.एस.ए. मधे दिलेल्या ए.सी.क्यु. च्या ५० टक्क्यांपेक्षा कमी असेल तरच भरपाई देय असेल.

उपरोक्त बाबीनुसार इंधन पुरवठा करारावर लवकर सह्या करण्याकरिता मे.एम.सी.एल. यांनी सुधारणा केलेल्या सामंजस्याचा करार लागू करावा व त्यात यापूर्वीची आयात केलेल्या कोळशाचा पुरवठा करण्याची विक्रेत्यांसाठी असलेली अट समाविष्ट करावी यासाठी त्यांचे मन वळविणे गरजेचे आहे.

धुलाई केंद्र (वॉशरी सर्क्यूट) येथील दिलेल्या कोळशाच्या पुरवठ्याबाबत महानिर्मितीने डब्ल्यू.सी.एल. यांना कळविले आहे की, संपूर्ण कच्चा कोळसा (रॉ कोल) फक्त रेल्वे मार्गानेच पाठविण्यात यावा. मात्र डब्ल्यू.सी. एल. यांनी महानिर्मितीची विनंती फेटाळून लावली. यासाठी पायाभूत सुविधा व वाहतूक व्यवस्था नसल्याची सबब सांगितली. धुलाई केंद्राकडे कोळसा पाठविणे दि. १ जुलै २०११ पासून आजपावेतो संपूर्णपणे थांबले आहे. महानिर्मितीने मा.जिल्हा न्यायालयास नागपूर यांना विनंती केली आहे की, त्यांनी संपूर्ण कच्चा कोळसा रेल्वे मार्गानेच पाठवावा असा आदेश डब्ल्यू.सी.एल. यांना द्यावा.

एम.सी.एल. सोबतच्या करारतील समस्या व डब्ल्यू.सी.एल. यांच्या कोळशाच्या दर्जाचा प्रश्न ही प्रकरणे लवकरच स्पर्धा आयोग यांचेकडे नेण्याचा महानिर्मितीचा विचार आहे.

**मानव संसाधन व्यवस्थापन**

कुठल्याही संघटनेची सर्वात मौल्यवान मत्ता म्हणजे तिचे कर्मचारी आहेत. कर्मचाऱ्यांमध्ये सर्जकता, नवीन संशोधन वृत्ती व कार्यक्षमता सर्वोत्कृष्ट रितीने वाढावी यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे जरूरी आहे. आपल्या

कंपनीने कर्मचाऱ्यांची गुणवत्ता व क्षमता वाढावी, ते विकसित, प्रशिक्षित आणि भविष्यातील आव्हाने पेलण्यासाठी विविध शाखांत पारंगत होऊन मानवी भांडवल असे तयार व्हावेत यावर कंपनीने लक्ष केंद्रीत केले आहे.

सर्वोत्कृष्ट संस्था होण्यासाठी मानवी संसाधनाचा विकास केला पाहिजे. यावर कंपनीचा ठाम विश्वास आहे. म्हणून कर्मचाऱ्यांच्या संभाव्य गुणवत्तेचा उपयोग आपल्या व्यावसायिक योजनेत करण्यासाठी ''लोकांना अग्रक्रम'' देण्यात येते.

**औद्योगिक संबंध**

वर्षभरात कंपनीचे आपल्या कर्मचाऱ्यांसोबतचे संबध स्नेहाचे व सलोख्याचे होते. कर्मचाऱ्याना त्यांच्या कामाची स्थिती व त्यांचे कल्याण अश्या क्षेत्रात सहभागी होण्यास प्रोत्साहन देण्यात आले. प्रकल्पातील कर्मचाऱ्यांच्या प्रतिनिधींसाठी सर्व थरावर कार्यशाळा घेण्यात आल्या. त्यात त्यांना कंपनीपुढे असलेले बदलते औद्योगिक वातावरण, संधी, धोके, आव्हाने याची माहिती देण्यात आली. एकूण औद्योगिक संबधाचे चित्र शांततामय होते. सुज्ञता व परस्पर विश्वास यामुळे कामे सुरळीतपणे पार पडली. व्यवस्थापन व कामगार संघटना यांच्यात नवीन वेतन सुधारणांचा करार झाला. त्याची कार्यवाही एप्रिल २००८ पासून लागू झाली.

वर्षभरात कंपनीच्या कोणत्याही कर्मचाऱ्यास वार्षिक ₹६०,००,०००/- किंवा जास्त किंवा दरमहा ₹५,००,०००/- यापेक्षा, जास्त वेतन नव्हते कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २१७ (२ए), ज्याचे सहवाचन कंपनी (कर्मचारी तपशील) नियमावली १९७५ यासोबत केले जाते. यानुसार ही माहिती देणे आवश्यक आहे.

**अनुसूचित जाती, जमाति व इतर मागास वर्गासाठी राखीव जागा**

आपली कंपनी महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी दिली जाणारी कर्मचारी भरती व पदोन्नती करताना या अनुसूचित जाती, जमाति व इतर मागास वर्ग यांच्यासाठी सेवेत असलेल्या आरक्षणा संबधीच्या आदेशाचे पालन करीत आहे.

**प्रशिक्षण आणि विकास**

आपली कंपनी देशातील वीज निर्मिती कंपन्यामधील सर्वोत्तम व कार्यक्षम कंपनी म्हणून नावाजलेली आहे. त्या कंपनीच्या प्रतिमेला अनुसरून कंपनीतील लोकांच्या सर्वांगिण विकासासाठी सर्वोतपरी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. कंपनीचे स्वत:चे दोन प्रशिक्षण केंद्रे आहेत. कोराडी व नाशिक येथील प्रशिक्षण केंद्रात कंपनी सेवेत पदार्पणाच्या स्तरांवरील व अन्य प्रकारची प्रशिक्षणे तसेच कार्याचा विकास करणारे कार्यक्रम आयोजिले जातात. याशिवाय कंपनी गरजेनुसार प्रशिक्षण केंद्रे अन्य संस्थेत म्हणजे यशदा, पुणे, इ.एस.सी.आय., हैद्राबाद, विविध आय.आय.टी. संस्था, भेल, जागतीक बँक, एन.पी.टी.आय. यांच्या सहकार्याने आयोजित करते. त्यात सं. व सू. एम.डी.पी. औद्योगिक सूरक्षा, प्रकल्प व्यवस्थापन आणि वर्तणूक शास्त्र अश्या विषयांचा समावेश केला जातो.

**मराठी भाषेचा वापर**

कंपनीने आपल्या दैनंदिन कामकाजात तसेच सर्व सरकारी पत्र व्यवहारात मराठी भाषेचा वापर करण्यासाठी जोरात प्रयत्न केले. कंपनीचा वार्षिक व सांवधिक अहवाल मराठी भाषेत तयार केले जातात.

**पर्यावरण**

महानिर्मिती कंपनीने पर्यावरण रक्षणासाठी ही खूप परिश्रम घेतले आहेत. त्यातील काही उपक्रम खालीलप्रमाणे आहेत :

- **वृक्षारोपण व हरीत पट्टा विकास**

  महानिर्मिती कंपनीच्या विविध औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रात वृक्ष लागवडीच्या योजना हाती घेण्यात आल्या आहेत. या वृक्षांच्या वाढीसाठी सर्वोतपरी काळजी घेतली जाते. ३१ मार्च २०११ पर्यंत सर्व औ.वि.केंद्रात एकूण २८.५ लाख झाडांची लागवड करण्यात आली. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रभाषकांनुसार सर्व औ.वि.केंद्रात हरित पट्टे विकसित करण्यात आले.

- **उत्सर्जन नियंत्रण**

  महानिर्मिती कंपनीने लक्ष्य निश्चित करून सर्व औ.वि.केंद्रातील कापणी उत्सर्जन नियंत्रणाची कृती कार्यक्रम अमलात आणला ते खालीलप्रमाणे :

  १६ जुन्या युनीटसाठी एस.पी.एम. नियम पालनासाठी इ.एस.पी. मधे वाढ करण्यात आली.

  उरलेल्या ९ जुन्या युनीट्स मधे एस.पी.एम. नियमाचे पालन करण्यासाठी तेथे अमोनिया इंजेक्शन युक्त फ्लयू गॅस कंडीशनींग सिस्टीमची स्थापना करण्याचे ठरविले आहे. यानुसार कोराडी युनीट ७, चंद्रपूर युनीट १ व २ येथे ही ए.एफ.जी.सी. सिस्टीम कार्यान्वित करून ती निरिक्षणाखाली आहे. कोराडी, चंद्रपूर येथील कामगिरीच्या निरिक्षणानंतर परळी युनीट ३, भुसावळ युनीट २ नाशिक युनीट ४ व ५, पी.टी.पी.एस. ४, खापरखेडा युनीट २ येथेही ही सिस्टीम स्थापन करण्यात येईल.

  महाराष्ट्र नियंत्रण मंडळ यांनी निश्चित केलेल्या ५० एम.जी./एन.एम.$^3$ या प्रमाणकानुसार उत्सर्जन व्हावे यासाठी २१० मे.वॅ.चे ५ युनीटस्‌ची इ.एस.पी. वाढीची मागणी भेलला दिली आहे.

  के.टी.पी.एस. यु-६, सी.एस.टी.पी.एस., यु-१ व यु-२, पी.टी.पी.एस.यू.-३, बी.टी.पी.एस. यु-२, एन.टी.पी.एस. यु-३ यांचे नुतनीकरण व आधुनिकीकरणाची कामे चालू आहेत.

- **परिसरातील हवेची गुणवत्ता**

  औ.वि. केंद्रातील हवेची गुणवत्ता नेहेमी तपासून ती म.प्र.नि.मंडळाच्या मर्यादेत ठेवण्यात येते. सर्व औ.

वि. केंद्राच्या परिसरातील हवेचे सतत गुणवत्ता अनुबोधन करणारी केंद्रे स्थापन करण्यात येत आहेत. यापैकी चंद्रपूर, कोराडी व भुसावळ औ.वि. केंद्रात अशी केंद्रे स्थापन झाली आहे.

- **पर्यावरण, आरोग्य व सुरक्षा लेखापरिक्षण**

पर्यावरण, आरोग्य व सुरक्षा यांचे बाह्य परिक्षण (ऑडिट) केंद्रीय श्रम संस्था, मुंबई (भारत सरकार) या संस्थेने वर्ष २००४-०५ मधे सर्व औ.वि.केंद्रात केले होते व त्यांच्या शिफारसीवर कार्यवाही चालू आहे.

तसेच वर्ष २०११-१२ मधे कोराडी औ.वि.केंद्रातील पर्यावरण, आरोग्य व सुरक्षेचे बाह्य परिक्षण करण्याची प्रक्रीया चालू आहे व ते यशस्वी झाल्यावर उर्वरित केंद्रातही केले जाईल.

पर्यावरण, आरोग्य व सुरक्षा याबाबत कंपनीचे धोरण राष्ट्रीय सुरक्षा परिषदेने वर्ष २०११-१२ मध्ये तयार केले.

- **राखेचा वापर**

१) महानिर्मिती कंपनीने उडणारी राख (फ्लाय ॲश) तसेच तळ्यातील साठवलेली राख याचा सिमेंट विटा, ॲस्बेस्टॉस, खते व रस्त्यांचे कठडे या क्षेत्रात उपयोग वाढावा म्हणून प्रयत्न चालू ठेवला आहेत.

| वर्ष | राख वापर टक्केवारी |
|---|---|
| २००६-०७ | २७.०० |
| २००७-०८ | ३०.६० |
| २००८-०९ | ४३.२३ |
| २००९-१० | ४९.७२ |
| २०१०-११ | ४७.२५ |

२) विटा उत्पादनात तळ्यातील राखेचा वापर वाढावा म्हणून नाशिक औ.वि.केंद्रात १८.०५.२०१० ते १९.०५.२०१० असा दोन दिवसांचे चर्चासत्र आयोजिले केले होते.

३) विद्या प्रतिष्ठान या संस्थेने बारामती, जि.पुणे येथे २७ ते २९ जानेवारी २०११ दरम्यान विज्ञान जत्रा २०११ आयोजली होती.

- **औष्णिक विद्युत केंद्रातील राख वापरास प्रोत्साहन देण्यासाठी संशोधन प्रकल्प**

**खाण भरणी**

दुर्गापूर येथील भूमीगत खाणीत सुमारे १०००० एम$^3$ (घनमिटर) राख भरण्याचे काम टि.आय.एफ.ए.सी. व

डब्ल्यु.सी.एल. आणि सी.एस.टी.एस.पी. यांच्या सहकार्याने प्रायोगिक तत्त्वावर करण्यात आले. याशिवाय खाणी भरणे, पाण्याचे बंधारे व रस्ते यांच्या बांधकामात उडणाऱ्या राखेचा वापर करावा म्हणून योग्य त्या प्राधिकाऱ्याकडे प्रयत्न चालू आहेत.

**निस्सारण प्रक्रीया प्रकल्प**

महानिर्मिती कंपनीने विविध औ.वि.केंद्रात निर्माण होणाऱ्या, वाहून जाणाऱ्या गाळाच्या प्रक्रीयासाठी निस्सारण प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित केले आहेत. यात पूनर्वापरासाठी प्रक्रिया करयात येते. त्याची वार्षिक टक्केवारी खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | भुसावळ | ५०.६४% |
| २. | चंद्रपुर | ९०.७८% |
| ३. | कोराडी | २७.८२% |
| ४. | खापरखेडा | ९०.११% |
| ५. | नाशिक | ११०.०६% |
| ६. | परळी | ८५.६०% |
| ७. | पारस | १००.४८% |

**धोक्याच्या कचऱ्याची विल्हेवाट**

कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी महानिर्मित कंपनीने म.प्र.नि. मंडळाच्या अधिकृत संस्थासोबत करार केले आहे.

**सी.डी.एम. प्रकल्प**

भविष्यात होणारे प्रकल्प सूपर क्रिटीकल टेक्नॉलॅजीवर आधारलेले असतील. त्यात कमी कोळसा वापराला जाईल व त्यामुळे ग्रीन हाऊस गॅसेसेचे उत्सर्जन कमी होईल.

१. www.unfccc.com येथे पी.डी.डी. वेब होस्टींग केले आहे. कोराडी येथील ४×१२० मे.वॅ. प्रकल्प बदलून तेथील १×६६० मे.वॅ. प्रकल्पाची सी.डी.एम. लाभासाठी नोंदणी केली आहे.

२. नाशिक युनीट ३, (२१० मे.वॅ.) आणि कोराडी युनीट ६ (२१० मे.वॅ.) यांच्या नुतनीकरण व आधुनिकीकरणासाठी सी.डी.एम. सल्लागार मिळवित म्हणून निविदा प्रसारीत केल्या.

३. उरण १२२० मे.वॅ. (जी.टी.पी.एस.) आणि कोराडी २×६६९ मे.वॅ. या प्रकल्पाच्या विस्तारासाठी जाहिर बैठक जुलै २०११ मध्ये प्रस्तापित केली होती.

**संचालक**

यावर्षी श्री.एम.पी.वाघमोडे यांची कंपनीचे संचालक (प्रवर्तन) या पदावर दि.११.३.२०११ पासून श्री.एम.आर. शेलार यांचे जागी नियुक्ती करण्यात आली. श्री. शेलार आता कंपनीचे संचालक नाहीत.

श्री.एस.जे.कुंटे प्रधान सचिव (ऊ) महाराष्ट्र शासन यांची कंपनीचे संचालक म्हणून श्री.सूब्रत रथो यांचे जागी २५.८.२०११ पासून नियुक्ती करण्यात आली श्री.रथो यांचेकडे प्रधान सचिव (ऊ) महाराष्ट्र शासन या पदाचा अतिरिक्त भार होता. श्री.डी.के.कानडे प्रधान सचिव (ऊ) यांची कंपनीचे संचालक पदी दिनांक १८.११.२०११ पासुन श्री.एस.जे.कुंटे हे संचालक पदी न राहील्याने नियुक्ती झाली.

श्री.एम.आर.शेलार, श्री.एस.जे.कुंटे यांनी कंपनीला दिलेल्या अमूल्य सेवेचा संचालक मंडळ गौरव अहवालत नोंदवित आहे. तसेच सर्व नव नियुक्तांचे स्वागत करीत आहे.

**लेखा परिक्षण समिती**

महानिर्मिती कंपनीने एक लेखापरिक्षण समिती गठीत केली आहे. या समितीचे सदस्य असे श्री.पी.व्ही.पागे, अध्यक्ष, श्री.जी.जे.गिरासे, संचालक (वित्त) श्री.एम.जी.वाघमोडे संचालक (कार्ये). वर्षभरात या लेखापरिक्षण समितीच्या ६ बैठका झाल्या.

**संचालकांच्या जबाबदारीचे विवरण पत्र**

कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २१७ (२एए) याच्या आवश्यकतेनुसार संचालकांच्या जबाबदारीचे विवरणपत्र येथे निश्चित करण्यात येते की,

१) वार्षिक लेखे तयार करताना लागू असणारी लेखांच्या मानकांचे अनुसरण करण्यात आले आहे व जर काही प्रत्यक्ष विचलन झाले असेल तर तेथे योग्य ते स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

२) निवडलेला लेखा धोरणे सातत्याने लावण्यात आली आहेत. तसेच निर्णय व अंदाज योग्यतेने व सुज्ञतेने घेण्यात आलेले आहेत त्यामुळे दि. ३१ मार्च २०११ रोजी कंपनीच्या व्यवहाराचे योग्य दर्शन दिसेल व अहवाल वर्षातील कंपनीचा नफा दिसून येईल.

३) कंपनीच्या मत्ताचे संरक्षण करणे व कोणतीही लबाडी व अनियमितता यांना आळा घालणे व त्या शोधून काढणे यासाठी संचालकांना कंपनी अधिनियम १९५६ मधील तरतूदीशी सुसंगत पद्धतीने लेखांचे दस्त ऐवज तयार करण्यासाठी योग्य व पूरेशी काळजी घेतली आहे.

४) ३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाचे वार्षिक लेखा चलीत संस्था पद्धतीच्या आधारे तयार करण्यात आलेले आहेत.

**उर्जा संवर्धन, तंत्रज्ञानाचे समावेशन व परकीय चलनातील मिळकत व खर्च**

कंपनीच्या अधिनियम १९५६ च्या कलम २१७ (१)(इ) ज्याचे सहवाचन कंपनी (संचालक मंडळाच्या अहवालात द्यावयाच्या तपशीलाचे प्रकरण) नियमावली १९८८ यासोबत केले जाते, यातील आवश्यकतेनुसार ऊर्जा संवर्धन, तांत्रिक समावेशन आणि परकीय चलनातील मिळकत व खर्च या संबंधीची माहिती या अहवालाचा भाग असलेल्या जोडपत्र 'अ' यामधे दिलेला आहे.

**सांविधिक लेखा परिक्षक यांची निरिक्षणे / अभिप्राय यांना उत्तरे**

सांविधिक लेखा परिक्षक यांनी त्यांच्या लेखापरिक्षण अहवालात नोंदलेली निरिक्षणे व अभिप्राय यांना कंपनीची उत्तरे जोडपत्र 'ब' यात दिली आहेत.

**मुदतीच्या ठेवी**

अहवाल वर्षात कंपनीने जनतेकडून कोणत्याही मुदतीच्या ठेवी मागविल्या नाहीत / मिळालेल्या नाहीत.

**खर्च लेखा परिक्षक**

कंपनीने ३१.३.२०११ रोजी संपलेल्या वर्षासाठी कंपनी व्यवहार मंत्रालय, भारत सरकार यांच्या मंजुरीच्या अधिन राहून मेसर्स एन.आय.मेहता ॲन्ड कंपनी आणि मेसर्स एस.आर.भार्गवे ॲन्ड कंपनी, (कॉस्ट अकाऊटंटस्) यांची सह-खर्च लेखापरिक्षक (जॉईन्ट कॉस्ट ऑडीटर्स) या पदावर नियुक्ती केली.

**लेखा परिक्षक**

भारताचे लेखापाल व महालेखापरिक्षक यांनी मेसर्स जी.एम.कापाडीया ॲन्ड कंपनी, मुंबई, मेसर्स सी.व्ही.के. ॲन्ड असोसिएटस्, मुंबई आणि मेसर्स के.एस.अय्यर ॲन्ड कंपनी, मुंबई यांची २०१०-११ या वित्तीय वर्षासाठी कंपनीचे संयुक्त सांविधिक लेखा परिक्षक म्हणून नियूक्ती केली.

**धन्यवाद**

या वित्तीय वर्षात सहकार्य व मदत करणारे केंद्र व राज्य शासनाचे विभाग / संस्था, वित्तीय संस्था व बँका, सांविधिक लेखापरिक्षक, खर्च लेखापरिक्षक, भारताचे लेखापाल व महालेखापरिक्षक, अपील न्यायाधिकरणे आणि कंपनीचे भागधारक या सर्वांची सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो. तसेच कंपनीच्या सर्व कर्मचाऱ्यांनी तळमळीने व त्यागी वृत्तीने आपले काम पार पाडले याबद्दल संचालक मंडळ त्यांची प्रशंसापूर्ण नोंद अहवालात करीत आहे.

संचालक मंडळाच्या वतीने

सुब्रत रथो
**अध्यक्ष व व्यवस्थापकिय संचालक**

स्थळ : मुंबई
दिनांक : ०९/०१/२०१२

# संचालकच्या अहवालाचे पूरकपत्र अ

## कंपनी (संचालक मंडळाच्या अहवालात तपशीलाचे प्रकटन) नियमावली १९८८ नुसार आवश्यक तपशील

### अ) ऊर्जा संवर्धन

वर्ष २०१०-११ मधे ऊर्जा बचतीसाठी खालील कार्ये करण्यात आली.

- कंपनी गृहअंतर्गत ऊर्जा वापर क्षेत्रे म्हणजे कॉम्प्रेस्ड एअर, फीड वॉटर, कुलींग वॉटर सिस्टीम, नुटर्स यांचे ऊर्जा अंकेक्षण / तपासणी केली.
- वीज केंद्रात कर्मचाऱ्यांची सतर्कता वाढावी कार्यक्रम/प्रशिक्षण घेण्यात आले.
- ऊर्जा संवंधनावर भिंती पत्रके / निबंध स्पर्धा इ. घेऊन जागरूकता निर्माण केली.
- सयंत्राच्या दैनंदीन कामकाजात त्यांच्या ज्ञानाचा उपयोग होणारे ऊर्जा अंकेक्षण / परिक्षण करण्यास पात्र असलेले अभियंता महानिर्मितीच्या ताफ्यात आहेत.

### विजेचा सहकार

- विजेच्या सहवापराचे अचूक मूल्यांकन करण्यासाठी ०.२ श्रेणीचे ऊर्जा मिटर्स वापरण्यात आले.
- दिवसा सूर्यप्रकाशाचा कमाल वापर केला.
- यंत्रे/साधने यांचा अयोग्य वापर टाळण्यात आला.
- कॉम्प्रेस्ड एअर, स्टीम फाईलींग, कुलींग वॉटर सिस्टिम व विज प्रणाली यातील गळती रोखण्यात आली.
- डी.एम. वॉटर फ्लो मिटर्सची स्थापना केली.
- जी.टी.युनीट, उरण येथे नैसर्गिक शितकरणाची व्यवस्था स्थितीवर लक्ष ठेवले.
- सहवापराच्या प्रतिबंधक देखभालीच्या वेळापत्रकांची वेळेवर अंमलबजावणी केली.

### प्रकाश योजना

- एच.पी.एम.व्ही. दिव्यांऐवजी एच.पी.एस.व्ही. दिवे वापरण्यात आले.
- इलेक्ट्रॉनिक बलास्ट व सी.एफ.एल. प्रकाशयोजनेचा वापर.
- सेवेच्या इमारतीचे जिने व टर्बाइन बेसमेंट एरीआ येथे शक्य तेवढे व्यक्तिगत चालू / बंद होणारे प्रकाशाची बटणे (स्वीचेस) लावण्यात आली.

## उष्णता ऊर्जा

- ऑन लाईन कंडेसर ट्यूब क्लिनींग सिस्टीमवर योग्य लक्ष
- ऊष्णता रोधकांची वेळेवर तपासणी
- शक्य तेवढे एअर - प्री हीटर्स व भट्ट्या यांची स्वच्छता केली
- बॉयलरची जादा हवा पर्याप्त ठेवण्याकडे लक्ष दिले
- उष्णतेच्या दराची अ.अ./महाव्यवस्थापक/मुख्य अभियंता या स्तरावरून साप्ताहिक/पंधरवड्याला/महिन्याला नियमीत पहाणी.

## वंगण

- सर्व वीज केंद्रात शून्य गळतीची संकल्पना सुरू केली
- गळतीतील इंधन तेल पून: मिळविण्यासाठी ऑईल स्कीमर्सची रचना विकसित केली.
- भुसावळ व नाशिक केंद्रात टर्बाईन आणि बी.एफ.आर. ऑईल केंद्रवर्ती पद्धतीने गाळून घेतले.

## डीएम वॉटर

- डीएम वॉटर, फीड लाईन व स्टीम याची गळती रोखण्यास प्राधान्य दिले.
- खापरखेडा औष्णिक वीज केंद्रात सोनिक बॉयलर ट्यूब डिटेक्शन सिस्टीम लावण्यात आली.

## संकीर्ण पाणी

- कोराडी, नाशिक, खापरखेडा, चंद्रपूर केंद्रात राखेच्या पाण्याचा पूनर्वापराची यंत्रणा.
- आग प्रतिबंधक पाण्याचे नळ भूमिगत होते त्यांची गळती थांबविण्यासाठी ते जमिनीवर स्थापन करण्यात आले.

## ब) तंत्रज्ञानाचे समावेशन

अ) फॉर्म ‘बी’ नुसार, तंत्रज्ञानाचा समावेश करण्यासाठी प्रयत्न केले.

# नमुना ब

**समावेशना संबधीच्या तपशीलाच्या प्रकरणाची माहिती**

- अमोनिया इंजेक्शन फ्लू गॅस कंडीशनींग सिस्टीमची स्थापना
- परळी यूनीट ३ येथील कार्यपद्धतीचा दर्जा उंचावला.
- महानिर्मिती कं मुख्यालय व वीजनिर्मिती केंद्रे येथे 'इ' निविदा संकल्पना अंमलात आली.

## संशोधन व विकास

१) **कंपनीने संशोधन व विकासासाठी चालू केलेली निश्चित क्षेत्रे:** कुलींग वॉटरचे ओझनायझेशन, ए.एफ. जी.सी. सिस्टम, उरण येथे आयलँडीग व ब्लॅक स्टार्ट सुविधा, एअर टिटर्स येथे निरॉफॉन ॲकॉस्टिक क्लिनिंग सिस्टीम, ट्यूब लिकेज शोधाणारी प्रणाली, कोळसा गिरणीत एम.पी.एस.एम. सिस्टीमचा वापर, तेलाचा पूनः वापर करण्यासाठी तेल गाळणी व ऑईल स्किंपर्सचा यंत्राचा वापर आणि सांडलेले तेल पूनः मिळविण्याचे प्रयत्न.

२) **वरील संशोधन व विकासामुळे मिळविलेले लाभ**

**ओझोनायझेशन :** पारंपारिक पद्धतीपेक्षा प्रवर्तनाचा खर्च कमी होतो. धातूंची झीज कमी होते, वापरण्यास सुरक्षित तसेच पाण्याच्या शीतकरणातील लिजीयनेला जंतूची पातळी नाहीसी होते.

**ए.एफ.जी.सी.:** प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रमाणकानुसार औ.वि.केंद्रातील एस.पी.एम.ची पातळी १५० एम.जी. / एन.एम.$^{३}$ यापेक्षा खाली ठेवली जाते.

**आयलंड सिस्टीम (अलगीकरण पद्धत) :** वीज जाळ्यात व्यत्यय/खंड झाल्यास अलग करण्याची योजना कार्यान्वित होते व जी.टी.पी.एस. स्थानिक व क्षेत्र वीज जाळ्यातून अलग होते.

**ब्लॅक स्टार्ट फॅसिलीटी :** जर वीज जाळ्याला धक्का बसला व त्यामुळे अलग करणारी यंत्रणाही अपयशी ठरली तर ब्लॅक स्टार्ट सुविधेमुळे युनीट्स पूनः पूर्वस्थितीत आणता येते व त्या क्षेत्रातील पूरवठा कमी वेळेत पूर्ववत करता येतो.

३) **भविष्यातील कृती योजना**

- आणखी काही औष्णिक विद्युत केंद्रात ए.एफ.जी.सी. यंत्रणा
- ऑनलाइन एनर्जी मॅनेजमेंट स्थापन करणार.

४) **संशोधन व विकासावर खर्च**

निरंक

## तंत्रज्ञान समावेशन, अंगीकार व नवीन संशोधन

१. तांत्रिक समावेशन, अंगीकार व नवीन संशोधन करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची संक्षिप्त माहिती.

२. वरील प्रयत्नांमुळे झालेले लाभ

कंपनीने कोणतेही आयात तंत्रज्ञान वापरलेले नाही.

## क) परकीय चलनातील मिळकत व खर्च

अ) निर्याती संबधी कार्य तसेच निर्यात वाढीसाठी नवे कार्य, उत्पादनात व सेवेस नवीन निर्यात बाजारपेठा विकसित करणे व निर्यात योजना.

ब) वापरलेले व मिळवलेले परकीय चलन

| वापरलेले / मिळविलेले एकूण परकीय चलन | ₹. |
|---|---|
| १. परकीय चलनातील खर्च | |
| अ) सी.आय.एफ तत्त्वावर गणना केलेल्या भांडवली मालाचे मुल घटक व सुटे भाग | |
| ब) खर्च | |
| प्रवास खर्च | निरंक |
| २. कमवलेले परकीय चलन | निरंक |

# पूरकपत्र ब १
# महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित लेखा परिक्षकांनी ०१.०४.२०१० ते ३१.०३. २०११ या कालावधीसाठी च्या अहवालास कंपनीची उत्तरे

| अनु. | लेखापरिक्षकांचा परिछेद | महानिर्मिती कंपनीचा खुलासा |
|---|---|---|
| १) | आम्ही, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कं. लि. ची दि. ३१ मार्च २०११ रोजी असलेला ताळेबंद, तसेच त्यादिवशी संपलेल्या वर्षाचा नफा-तोटा लेखा आणि सदर वर्षाच्या तेथे नमूद केलेल्या विस्तारीत तारखेपर्यंतचे रोकडता प्रवाह विवरण पत्र ही लेखा परिक्षण केलेली कागदपत्रे सोबत जोडली आहेत. ही वित्तीय विवरणपत्रे सादर करणे कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. या विवरणपत्रांचे आम्ही केलेल्या लेखापरिक्षणाच्या आधारे आमचे अभिप्राय व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे. | वस्तुस्थिती |
| २) | आम्ही आमचे लेखापरीक्षण भारतात सर्वसाधारणपणे स्विकारलेल्या लेखा परिक्षणांच्या मानकांप्रमाणे केले. आम्ही आमच्या लेखापरिक्षणाचा आराखडा तयार करणे व त्यानुसार लेखापरिक्षण करून ही वित्तीय लेखापरिक्षणे कोणत्याही प्रत्यक्ष गैर विवरणांपासून मुक्त असल्याचे समंजसपणे आश्वासन मिळविणे ही या मानकाची गरज आहे. लेखापरिक्षणात प्रायोगिक तत्त्वावर परिक्षण करणे, आणि वित्तिय विवरणपत्रातील रकमा व त्यांचे प्रकटीकरण यांना पुष्टी देणारे पुरावे दाखविणे यांचा समावेश होतो. तसेच लेखांमध्ये वापर केलेल्या लेखातत्त्वांचे व व्यवस्थापनाने केलेल्या महत्त्वांच्या अंदाजांचे मूल्यांकन करणे तसेच सर्वकंश वित्तिय सादरीकरणाचे मूल्यमापन करणे या कार्यवाहीचा अंतर्भाव लेखापरिक्षणात करण्यात येतो. आमच्या लेखापरिक्षणास आम्ही व्यक्त केलेल्या अभिप्रायांस सूज्ञ व संमजस आधार पुरविला आहे असा आमचा विश्वास आहे. | वस्तुस्थिती |
| ३) | भारताच्या केंद्र सरकारने कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २२७ च्या उपकलम (४ए) यातील शर्तीनुसार वितरीत केलेल्या कंपनीचे (लेखापरिक्षण अहवाल आदेश २००३ कंपनीज (ऑडीटर्स रिपोर्ट) (ॲमेंडमेंट) ऑर्डर २००४) यानुसार आम्ही सदर आदेशाच्या परिच्छेद ४ व ५ यात विनिर्देशित केलेल्या विषयांसंबंधी विवरण पत्र जोडत आहोत. | वस्तुस्थिती |

| | | |
|---|---|---|
| ४) | वरील जोडपत्रातील आमच्या अभिप्रायासह आम्ही अहवाल देतो की :<br>१. आमच्या लेखा परिक्षणासाठीच्या उद्दिष्टांसाठी आमचे सर्वोत्तम ज्ञान व विश्वास यानुसार आवश्यक वाटणारी सर्व माहिती व स्पष्टीकरणे आम्ही मिळविली आहेत. | वस्तुस्थिती |
| | २. आमच्या मते, सदर कंपनीने लेखांसाठी कायद्यांप्रमाणे आवश्यक असणारी सर्व लेखा नोंद पुस्तके योग्यप्रकारे तयार केली आहेत व आम्ही त्या पुस्ताकांचे परिक्षण केले, त्याप्रमाणे ती योग्य प्रकारे ठेवली आहेत. | वस्तुस्थिती |
| | ३. या अहवालांशी संबंधित असलेला ताळेबंद, नफा व तोटा पत्रक आणि रोकडता प्रवाह विवरण पत्र या लेखा पुस्तकांशी सहमत आहोत. | वस्तुस्थिती |
| | ४. अधिसुचना क्र. जी.एस.आर.८२९ (इ) दि. २१-१०-२००३, यानुसार शासकीय कंपन्यांना कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २७४ (१) (जी) यातील तरतूदींतून सूट दिली आहे. | वस्तुस्थिती |
| | ५. *कंपनीची (लेखा मानके) नियमावली २००६ अंतर्गत 'लेखा मानके १९ भाडेपट्टी करार' अन्वये भाडे कराराबाबत प्रगटन करणे गरजेचे आहे तथापी विविध जल विद्युत निर्मिती केंद्राबाबत महाराष्ट्र शासनाला केलेल्या भाडेपट्टीच्या कराराची अमंलबजावणी प्रलंबित आहे. प्रलंबित असलेले सदर प्रगटन केलेले नाही. याबाबत अनुसुची १५ मधील टिप क्र. २१ (डी) कडे लक्ष वेधण्यात येते.* | महानिर्मिती कंपनीने, म.वि.नि.आयोगाने दिलेल्या महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या जलविद्युत केंद्राचा भाडेपट्टीचा दर निश्चित करणे या संबधी दिलेल्या आदेशाच्या आधारे भाडेपट्टी दराचा लेखा केला. |
| | ६. आमच्या मते या अहवालासंबंधीचे सदर ताळेबंद, नफा व तोटा यांचा लेखा आणि रोकडता प्रवाह ही विवरण पत्रे कंपनी अधिनियम १९५६ यातील कलम २११ च्या उपकलम (३सी) यात संदर्भ दिलेल्या लेखा मानकांच्या आवश्यकता पूर्ण करतात. | वस्तुस्थिती |

| | | |
|---|---|---|
| | ७. *कंपनीची दि. ०६ जून २००५ रोजीची मत्ता व दायित्त्वे यातील शिल्लक महाराष्ट्र विद्युत सुधारणा योजना २००५ अन्वये हस्तांतरीत करण्यात आलेल्या आहेत. आम्हाला देण्यात आलेल्या माहितीप्रमाणे या शिल्लकी म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनी लिमिटेड या कंपनीने स्वीकारल्या असून त्या सदर कंपनीस अद्याप स्वाधीन करावयाच्या आहेत. तसेच अहवाल अधिक माहिती देण्यात आली की, अद्याप अंतीम हस्तांतरण योजना महाराष्ट्र शासनाकडून अधिसूचित व्हायची आहे. जर अशा शिल्लकीमध्ये काही फरक असेल तर त्याचा प्रभाव कंपनीच्या वित्तीय विवरणपत्रांवर होऊ शकेल. तसेच आम्ही अनुसूची १५ मधील टिपा क्र.२ याकडे लक्ष वेधतो. त्यात महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. कडील यापूर्वीच्या वर्षांचे कर्जाचे दायित्त्व त्यावरील व्याज याबाबतच्या योजनेतील अंशतः सुधारणा म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनी लि. ने मान्यता दिल्याप्रमाणे आहे.* | अंतिम हस्तांतरण योजना महाराष्ट्र शासनाच्या कृतीशील विचाराधीन आहे. सदर अंतिमीकरण वर्ष २०११-२०१२ मध्ये पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. शासनाच्या अधीसूचनेनंतर आरंभीच्या शिल्लकीवर होऊ शकणाऱ्या बदलाचा प्रभाव त्याप्रमाणे नोंदी मंजूर करुन लेखा पुस्तकात केला जाईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| | ८. | *अनुसूची १५ मधील टिपा १६ (ए) यात नमूद केल्याप्रमाणे, किरकोळ ऋणको कडील शिल्लक, कर्ज व अग्रीमे, ठेवी, उपकंत्राटदार यांचेकडील साहित्य, किरकोळ पतदार - यामधे ठेवून घेतलेला पैसा, साहित्याच्या पुरवठ्यांचे दायित्त्व, आंतर गट कंपन्यांच्या शिल्लकी ही समाविष्ट आहेत. तसेच ग्राहकांकडील अग्रीम आणि कोळसा कंपन्यांनी दिलेले अग्रीम व त्याच्या तरतुदी या सर्व बाबी संबंधित संस्था यांच्याकडून जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे कायम होण्याच्या किंवा उपकंपन्याच्या अहवालांशी मेळ घालण्याच्या अधीन असेल असे कायम करणे व मेळ घालण्याचे काम पूर्ण करणे प्रलंबित असल्यामुळे त्याचे परिणामरूप समायोजन करता येणे शक्य नव्हते. या कारणामुळे कंपनीच्या शिल्लकीच्या स्थितीवर आणि फायद्यावर जर काही परिणामरूप प्रभाव पडणार असेल तर, त्याबाबत कोणताही अभिप्राय देण्यास आम्ही असमर्थ आहोत.* | पुढील विषयांचे उप-लेजर्स करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. किरकोळ ऋणको, कर्जे व अग्रीमे, जमा अनामती, उपकंत्राटदाराकडील साहीत्य, किरकोळ धनको व त्यांचेकडील ठेवलेले पैसे, यासह, साहीत्य पुरवठ्याची दायित्वे, आंतरगट कंपनीच्या शिल्लकी, ग्राहकांकडील अग्रीमे आणि कोळसा कंपन्यांना दिलेली अग्रीमे यापैकी काही लेखांच्या घटकांमध्ये शिल्लक निश्चिती करण्याबाबत पत्रे संबंधीतांना दिली आहेत. सर्वोतोपरी प्रयत्न केल्या नंतरही जेथे काही अतिशय जुन्या शिल्लकीच्या रकमांची जोडणी होत नसल्याने अशा प्रकरणी निर्लेखन करणे/पुनर्लेखन करणे यासंबंधी योग्य कारवाई करण्यात येईल म्हणजे वरील संबंधी स्पष्ट शिल्लक मांडता येईल. |
| | ९. | *अनुसूची १५ च्या टिपा क्र.१६ (बी) यात म्हटल्याप्रमाणे, कोळसा पुरवठादारांना दिलेल्या ₹२७९३.०६ कोटी एवढ्या अग्रीम रकमेचा समावेश 'कर्ज व अग्रीमे' यात करण्यात आलेला आहे. सदर अग्रीमांमुळे, कंपनीने कोळश्याच्या पुरवठ्यासाठी ₹२६५९.०५ कोटी एवढ्या रकमेच्या दायित्वासाठी तरतूद केली आहे. देयकांची अंतीम मंजुरी प्रलंबित असल्यामुळे कंपनीने सदर दिलेल्या अग्रीमासाठीचे दायित्त्वापोटी ₹२६५९.०५ कोटी इतक्या रकमेची तरतूद कोळशाच्या पुरवठ्यासाठी केली आहे. यामुळे कंपनीची संबंधित मत्ता व दायित्व याचे अतिरिक्त विवरण झाले आहे. या अतिरिक्त विवरणाचा कंपनीच्या नफ्यावर पडणाऱ्या प्रभावाची निश्चिती करण्यात आलेली नाही.* | कोळसा कंपन्यांना अग्रीमे देणे व त्यांच्याकडून त्याचा निपटारा करणे ही एक नित्याची बाब आहे. मागील वर्षी शिल्लक असलेल्या कोळशाच्या अग्रीमा व दायित्व यांच्या रकमा जास्त दिसत होत्या. कारण कोळशाच्या साठयाच्या पावत्यांचा टिपण्यांचा निपटारा झालेला नव्हता. मात्र वित्तीय वर्ष २०१०-११ मध्ये कोळसा साठा पावत्या दिल्या यांचा निपटारा करण्याच्या कामावर जास्त लक्ष देण्यात आले आहे. त्यामुळे कोळशाची अग्रीमे व दायित्वे चुकती करण्यात येऊन त्याची पातळी ₹५५०० कोटी वरुन ₹२७०० कोटी इतकी खाली आणण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | *१०. ही कंपनी सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योजक विकास अधिनियम २००६ यातील तरतूदीनुसार पुरवठादारांचा शोध करून घेण्याच्या प्रक्रीयेमध्ये आहे. म्हणून त्यानुसार आवश्यक ती प्रकटने केलेली नाहीत.* | |
| | ११. उपरिनिर्विष्ट परिच्छेद ४ ((६) ते (१०)) यातील आमच्या अभिप्रयांच्या अधीन राहून, आम्ही मत देतो की, आमच्या सर्वोत्तम माहितीनुसार आणि आम्हास दिलेल्या स्पष्टीकरणांनुसार, सदर अहवाल, त्यावर दिलेल्या टिपांसोबत सहवाचन केल्याप्रमाणे, कंपनी अधिनियम १९५६ याच्या आवश्यकतेनुसार, त्यासाठी हव्या असलेल्या स्वरूपाप्रमाणे माहिती देतात आणि भारतात स्वीकारल्या जाणाऱ्या लेखाच्या तत्त्वांनुसार सत्य व योग्य दृश्य सादर करतात. | वस्तुस्थिती |
| | अ. **ताळेबंदासंबंधी** - कंपनीच्या व्यवहाराच्या दि. ३१ मार्च २०११ रोजी असणाऱ्या स्थितीनुसार आहे. | |
| | ब. **नफा व तोटा यांच्या लेखासंबंधी** - सदर दिनांकास संपलेल्या दिवशी असणारा नफा दर्शवितात. | |
| | क. **रोकडता प्रवाह विवरण पत्रा संबंधी** - सदर दिनांकास संपलेल्या वर्षासाठीचे रोकडता प्रवाह दर्शवितात. | |

# जोडपत्र ब - २

## दिनांक ०१.०४.२०१० ते ३१.०३.२०११ या कालावधीसाठी लेखा परिक्षक यांच्या अहवालाच्या जोडपत्रास उत्तरे

| अ.क्र. | लेखा परिक्षकांचा अहवाल | | महानिर्मिती कंपनीचे उत्तर |
|---|---|---|---|
| | लेखा परिक्षकांच्या अहवालास जोडपत्र | | |
| १) | अ) | या कंपनीच्या स्थिर मत्तेचा प्रत्यक्ष पडताळणी या वर्षात व्यवस्थापनाने एका बाह्य सनदी लेखापालांच्या संस्थेच्या मदतीने करुन घेतली. त्याच्या अहवालाच्या आधारे आवश्यक ते समायोजन मुख्यालय येथील लेखांच्या पुस्तकात करण्यात आले. *मात्र स्थीरमत्ताच्या संबंधित जागी असलेल्या नोंदीचे अद्यावत करणे प्रगती पथावर आहे.* | मेसर्स सी.एन.के. यांनी सादर केलेल्या स्थिर मत्तांच्या पडताळणी अहवालाचे परिणामावर कार्यवाहीच्या लेखा नोंदी मुख्यालयात क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या वतीने करण्यात आल्या कारण त्यांचे लेखा बंद झाले होते. लेखांवरील परिणामांच्या नोंदी पूर्ण केले आहे. लेखा नोंदीच्या आधारे स्थिर मत्तांच्या जागेवर ठेवलेल्या त्यांच्या नोंदवहीचे अद्यावतीकरण करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. हे काम ऑक्टोबर २०११ अखेरीस पूर्ण करण्यात येईल. |
| | ब) | आम्हाला देण्यात आलेल्या माहितीनुसार कंपनीचे स्थीरमत्तेची प्रत्यक्ष पडताळणी तीन वर्षांनी एकदा करण्याचे धोरण आहे. आमच्या मते हे व्यवहार्य असून कंपनीचे आकारमान आणि व्यवसायाचे स्वरूप याच्याशी सुसंगत आहे. उपरोक्त परिच्छेद १ अ मध्ये नमूद केल्यानुसार कंपनीने यावर्षी स्थीरमत्तेची प्रत्यक्ष पडताळणीचे काम पार पाडले. | वस्तुस्थिती |
| | क) | लेखा परिक्षणाच्या वर्षात कंपनीने स्थीर मत्तेच्या मोठ्या भागांची विक्री किंवा विल्हेवाट लावली नाही. | वस्तुस्थिती |
| २) | अ) | व्यवस्थपनाने वस्तू सूचींची प्रत्यक्ष पडताळणी योग्य काळाच्या अंतराने केलेली आहे. | वस्तुस्थिती |

| | | | |
|---|---|---|---|
| | ब) | आमच्या मते आणि आम्हाला दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावरून व्यवस्थापनाने अवलंबलेली वस्तू सूचींची प्रत्यक्ष पडताळणी करण्याची कार्यपद्धती ही कंपनीचा आकार व व्यवहाराचे स्वरूप यानुसार योग्य व पुरेशी आहे. | वस्तुस्थिती |
| | क) | आमची वस्तूसूचीच्या अहवालाची तपासणी व प्रत्यक्ष पडताळीचा अहवाल या आधारे आमचे मत झाले आहे की, कंपनी वस्तूसूचीचे अभिलेख व्यवस्थित जतन करीत आहे. कोळशा व्यतिरिक्त अन्य कोणत्याही बाबतीत प्रत्यक्ष विसंगती दिसून आलेली नाही. कोळशाच्या बाबतीतील विसंगतीचे लेखामध्ये योग्य ते समायोजन करण्यात आलेले आहे. | वस्तुस्थिती |
| ३) | अ) | आम्हास दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणे यावरून दिसून येते की, सदर वर्षात कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३०१ अंतर्गत ठेवलेल्या अभिलेखातील समाविष्ट होणाऱ्या कोणत्याही कंपन्या, फर्म्स किंवा इतर संस्था / व्यक्ती यांना कोणतेही कर्ज मंजूर केलेले नाही. म्हणून सदर उपकलम नुसार वरील आदेशाच्या परिच्छेद ४ कलम (३) यातील उपकलम 'ए ते डी' नुसार कोणताही अहवाल देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. | वस्तुस्थिती |
| | ब) | आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावरून दिसून येते की, सदर वर्षात कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३०१ अंतर्गत ठेवलेल्या अभिलेखात समाविष्ट होणाऱ्या कोणत्याही कंपन्या, फर्म्स आणि इतर संस्था / व्यक्ती यांचेकडून कोणतीही प्रतिभूत किंवा अप्रतिभूत कर्जे घेतले नाहीत. म्हणून सदर उपकलमानुसार वरील आदेशाच्या ४ थ्या परिच्छेदाच्या कलम ३ च्या उपकलम इ ते जी नुसार कोणताही अहवाल देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. | वस्तुस्थिती |

| | | |
|---|---|---|
| ४) | आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावरून कंपनीचे आकारमान व तिच्या व्यवहारांचे स्वरूप याला सुसंगत अशी वस्तूस्थिती व स्थीरमत्ता यांची खरेदी तसेच माल व सेवांची विक्री यासाठी पुरेशा अंतर्गत नियंत्रण प्रणाली कंपनीकडे आहे. मात्र वस्तू माल व स्थीरमत्ता यांच्या खरेदीच्या संबंधीत अंतर्गत नियंत्रण व्यवस्था अधिक बळकट करण्यास वाव आहे. याशिवाय विविध प्रकारच्या चालू मत्ता व चालू दायित्त्वे यांच्या संस्थानुसार आणि वयानुसार तपशील गोळा करणे व त्याची देखभाल करणे यात काहीशी दुर्बलता असल्याचे आमचे निरिक्षण आहे.<br><br>*कोळशाच्या खरेदी संदर्भात कंपनीस कमी दर्जाचा / गुणवत्तेत उणीव असलेला कोळसा पुरविल्याबद्दल बरीच गाऱ्हाणी व्यवस्थापनाकडे आली. व्यवस्थापनाचा असा दृष्टीकोन आहे की, कोळसा खरेदी अंतर्गत नियंत्रणाचा आढावा घेतला पाहिजे व ती अधिक कडक केली पाहिजेत. म्हणून अशा तक्रारींच्या आधारे तसेच अंर्तगत नियंत्रण अधिक कडक करण्यासाठी व्यवस्थापनाने कंपनीला पुरवठा होणाऱ्या कोळशाच्या तपासणीसाठी अंतर्गत तिऱ्हाईत निरिक्षण*<br><br>*संस्था नियुक्त केली. सद्यस्थितीत या संस्थेचा अहवाल प्राप्त व्हायचा असल्याने या पद्धतीतील उणीवा दूर करून ती बळकट करण्यासाठी व्यवस्थापनाने केलेली उपाय योजना पुरेशा प्रभावी आहेत किंवा कसे यावर अभिप्राय देणे सध्या शक्य नाही.* | अंतर्गत गाऱ्हाण्यांच्या आधारे व्यवस्थापनाने कंपनीला पुरविलेल्या कोळशाची गुणवत्ता तपासण्याची कार्यवाही यापुर्वीच सुरू केली आहे. परिणामी चांगल्या दर्जाच्या कोळशाचा वापर केला जात आहे. |
| ५) | आम्ही केलेले लेखापुस्तकांचे परिक्षण व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे या आधारे कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३०१ अनुसार ठेवण्यात येणाऱ्या नोंदवहीत ज्याची नोंदणी करणे आवश्यक आहे असा कोणताही व्यवहार केलेला नाही. | वस्तुस्थिती |
| ६) | आमच्या मते व आम्हास दिलेला माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनी अधिनियम १९५६ चे कलम ५८ए आणि ५८एए तसेच कंपनीज् (ठेवींचा स्वीकार) नियमावली १९७५ यातील अर्थाच्या अंतर्गत कंपनीने जनतेकडून कोणत्याही ठेवी स्वीकारलेल्या नाहीत. आम्हास दिलेल्या माहितीनुसार कंपनी लॉ बोर्ड, नॅशनल कंपनी लॉ ट्रायब्यूनल, आर.बी. आय. आणि अन्य कोणतेही न्यायालय किंवा न्यायमंडळ यांनी कंपनीच्या विरोधात कोणताही आदेश काढलेला नाही. | वस्तुस्थिती |

| | | |
|---|---|---|
| ७) | कंपनीने आपले मुख्यालय आणि अन्य जागी अंतर्गत लेखापरिक्षण करण्यासाठी सनदी लेखापालच्या बाहेरच्या संस्थां / फर्म्सची नियुक्ती केली आहे. *मात्र त्यांचे अहवाल वेळेवर मिळालेले नाहीत.* आमच्या या मतांच्या अधीन राहून आणि आम्हास दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीमध्ये प्रचलीत असलेली अंतर्गत लेखापरिक्षण प्रणाली ही पुरेशी असून कंपनीचे आकारमान व व्यवहाराचे स्वरुप यांच्याशी सूसंगत आहे. | वित्तीय वर्ष २०१०-२०११ मधील अंतर्गत लेखा परिक्षण करणे व त्याचा अहवाल सादर करणे यासाठी लागणारा विलंब विचारात घेवून, वर्ष २०११-२०१२ चे अंतर्गत लेखा परिक्षणाचे वेळापत्रकात सुधारणा करण्यात आली व ते आता दर महा तत्वावर करण्यात येते. त्याचा अहवाल दर ३ महीन्यांनी सादर करण्यात येईल म्हणून सदर लेखा परिक्षणात आढळलेल्या बाबी पुढील वर्षात उद्‌भणार नाहीत. |
| ८) | केंद्र सरकारने खर्चाच्या नोंदी ठेवण्यासाठी कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २०९ (१) (डी) या कलमाखाली विहीत केलेल्या नियमावलीनुसार कंपनीने ठेवलेल्या लेखा पुस्तकाचे आम्ही स्थूल मानाने अवलोकन केले. मात्र सदर अभिलेख अचूक आणि परिपूर्ण असल्याच्या निश्चितीसाठी आम्ही तपशीलावर परिक्षण केलेले नाही. | वस्तुस्थिती |
| ९) | अ) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार, कंपनी योग्य त्या प्राधिकाऱ्यांकडे द्यावयाची संशयविरहीत सांविधिक देणी जमा करण्याचे काम सर्वसामान्यपणे नियमीत करीत आहे. यामधे भविष्यनिर्वाह निधी, गुंतवणूकदार शिक्षण व रक्षण निधी, कर्मचाऱ्यांचा राज्य विमा, आयकर, निधी कर, संपत्ती कर, सेवा कर, सीमा शूल्क, उत्पादन शूल्क, अधिकारी उपकर आणि अन्य लागू असणारी सांविधिक देणी यांचा समावेश आहे.<br><br>आम्हास दिलेला माहिती व स्पष्टीकरणे यानुसार ज्यांच्याबद्दल वाद नाहीत अशी आयकर, विक्री कर, संपत्ती कर, सेवा कर, सीमाशूल्क, उत्पादन शूल्क, उपकर इ. देणी त्यांना देय असलेल्या तारखेपासून सहा महिन्यापेक्षा जास्त काळासाठी व ताळेबंदाच्या तारखेस शिल्लक नव्हती. | वस्तुस्थिती |

<table>
<tr>
<td></td>
<td>ब) कंपनीच्या अभिलेखानुसार खालील बाबी वगळता अन्य कोणतीही देणी म्हणजे आयकर / विक्री कर / संपत्ती कर / सेवा कर / सीमा शूल्क / उत्पादन शूल्क / उपकर ही कोणत्याही वादाच्या कारणास्तव जमा करण्याची राहिलेली नाहीत.
<table>
<tr><th>थकित रकमेचे स्वरुप</th><th>भरणा न केलेली रक्कम</th><th>जेथे वाद प्रलंबित आहे तो मंच</th></tr>
<tr><td>उत्पादन शूल्क</td><td>₹२.४३ कोटी</td><td>आयुक्त केंद्रीय उत्पादन शूल्क</td></tr>
<tr><td>वर्षे २००६-०७ साठी आयकर कायदा १९६१ च्या कलम २७१ (सी) अनुसार दंड</td><td>₹११३ कोटी</td><td>आयुक्त (अपील) मुंबई</td></tr>
<tr><td>सेवाकरापोटी कलम १९४ सी अंतर्गत स्रोतापाशी कापलेला आयकर</td><td>₹८.९५ लक्ष</td><td>आय.टी.ए.टी. पुणे शाखा</td></tr>
</table>
</td>
<td>वस्तुस्थिती</td>
</tr>
<tr>
<td>१०)</td>
<td>वित्तिय वर्षाच्या अखेरीस कंपनीकडे कोणतेही संचित तोटे नाहीत. कंपनीच्या लेखा पुस्तकांनुसार, वित्तीय वर्षात व नजीकच्या मागील वर्षात कंपनीला कोणताही तोटा झालेला नाही.</td>
<td>वस्तुस्थिती</td>
</tr>
<tr>
<td>११.</td>
<td>आमची लेखापरिक्षणाची पद्धती व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे या आधारे आमचे असे मत आहे की, कंपनीने कोणतीही वित्तीय संस्था, बँक किंवा ऋणपत्रधारक (डिबेंचर होल्डर) यांना पूनर्देय असलेली देणी देण्याचे खंडीत केलेले नाही.</td>
<td>वस्तुस्थिती</td>
</tr>
<tr>
<td>१२.</td>
<td>आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने कोणासही भाग भांडवल, ऋणपत्रे किंवा अन्य प्रतिभूती गहाण ठेवून कर्ज किंवा अग्रीमे दिलेली नाहीत.</td>
<td>वस्तुस्थिती</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| १३. | आमच्या मते तसेच आम्हास असलेला सर्वोतपरी माहिती आणि आम्हास दिलेले स्पष्टीकरण यानुसार ही कंपनी एखादी चीट फंड कंपनी नाही किंवा एखादी एकमेकांस लाभकारी निधी सोसायटी (संस्था) नाही. म्हणून आमच्या मते उपरनिर्दिष्ट आदेशातील परिच्छेद ४ मधील कलम (१३) यातील तरतूदी या कंपनीस लागू होत नाहीत. | वस्तुस्थिती |
| १४) | कंपनीचे अभिलेख आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार सदर कंपनी शेअर्स, सिक्युरीटीज, डीबेंचर्स आणि इतर गुंतवणूकी यांनी व्यवहार किंवा व्यापार करीत नाही. म्हणून उपरनिर्दिष्ट आदेशातील परिच्छेद ४ मधील कलम (१४) यातील तरतूदी या कंपनीस लागू होत नाहीत. | वस्तुस्थिती |
| १५) | कंपनीचे अभिलेख आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार या कंपनीने इतरांनी घेतलेल्या कोणत्याही कर्जासाठी कोणतीही बँक किंवा वित्तीय संस्था यांना हमी दिलेली नाही. | वस्तुस्थिती |
| १६) | आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने मुदत कर्जे ज्या हेतूसाठी मिळविली त्यासाठीच वापरली असे समग्र आढाव्याच्या आधारे दिसून आले. | वस्तुस्थिती |
| १७) | आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे आणि कंपनीच्या ताळेबंदाचे समग्र परिक्षण केल्यावर आम्ही अहवाल देतो की, कंपनीने अल्प मुदतीसाठी उभारलेल्या निधीचा वापर दीर्घ मुदतीच्या गुंतवणूकींसाठी केलेला नाही. | वस्तुस्थिती |
| १८) | या वित्तीय वर्षात कंपनीने कायद्याच्या कलम ३०१ अंतर्गत ठेवलेल्या नोंदवहीत समावेश केलेल्या व्यक्ती / संस्था किंवा कंपन्या यांना कोणत्याही शेअर्स प्राधान्याने वितरण केलेले नाही. | वस्तुस्थिती |
| १९) | कंपनीने कोणतीही ऋणपत्रे दिलेली नाहीत, म्हणून हे कलम लागू होत नाही. | वस्तुस्थिती |
| २०) | सदर कंपनीने या लेखापरिक्षणाच्या कालावधीत जनतेकडून कोणताही सार्वजनिक निधी घेतलेला नाही. म्हणून उपारनिर्दिष्ट आदेशाच्या परिच्छेद ४ मधील कलम (२०) यातील तरतूदी या कंपनीस लागू होत नाहीत. | वस्तुस्थिती |
| २१) | लेखा पुस्तकांचे सदर परिक्षण आम्ही सर्वसाधारणमध्ये स्वीकारल्या जाणाऱ्या लेखापरिक्षण पद्धतीनुसार करताना, आम्हाला या वित्तीय वर्षात, कंपनीवर किंवा कंपनीकडून कोणताही लबाडी केल्याचे दिसून आलेले नाही. यामध्ये कंपनीच्या दक्षता विभागातंर्गत प्रकरणे / भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे कार्यालय यांच्या प्रकरणांचाही समावेश आहे. | वस्तुस्थिती |

# महानियंत्रक व महालेखा परिक्षक यांचे भाष्य

**भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा, कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ६१९ (४) यानुसार महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. मुंबई यांच्या दि. ३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या वर्षातील लेखांवर अभिप्राय:**

**महराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित,** मुंबई या कंपनीचे दि. ३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या वर्षाची वित्तीय विवरण पत्रे कंपनी अधिनियम १९५६ च्या अंतर्गत वित्तीय अहवालच्या विहीत आकृतीबंधाप्रमाणे तयार करणे ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ६१९(२) नुसार सांविधिक लेखापरिक्षकाची नियुक्ती केलेली आहे. या वित्तिय विविरण पत्रांवर कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २२७ नुसार सदर लेखापरिक्षकांनी, त्यांची व्यावसायिक संस्था दि. इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटट्स ऑफ इंडिया यांनी विहित केलेल्या लेखापरिक्षणाच्या व आश्वासक मानकांशी सुसंगत अशा रितीने विवरणपत्राचे स्वतंत्र लेखापरिक्षण करून त्यावर अभिप्राय देणे ही त्यांची जबाबदारी आहे. त्यांनी ती पार पाडल्याचे त्यांच्या लेखा परिक्षण अहवालात दि. १६ सप्टेंबर २०११ नमूद केलले आहे.

मी, भारताचे लेखा नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्यावतीने, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित मुंबई, या कंपनीच्या दि.३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तिय विवरणपत्राचे, कंपनी अधिनियम १९५६ याच्या कलम ६१९(३) (बी) अनुसार पूरक लेखा परिक्षण केले. हे पूरक लेखा परिक्षण स्वतंत्रपणे व सांविधिक लेखापाल यांच्याकडील कामाची कागदपत्रे प्राप्त न करता करण्यात आले असून ते प्रामुख्याने सांविधिक लेखापरिक्षक व कंपनीचे कर्मचारी यांच्याकडे विचारणा करणे आणि काही निवडक लेखा दस्त ऐवजाचे परिक्षण करणे या मर्यादेत करण्यात आलेले आहे. या माझ्या पूरक लेखापरिक्षणाच्या आधारे माझ्या लक्षात आलेल्या व ज्या माझ्या मते वित्तीय विवरणपत्रे व संबंधित लेखा परिक्षणाचा अहवाल समजून घेण्यास साह्य करतील त्या बाबी मी कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ६१९(४) अंतर्गत ठळकपणे दर्शवित आहे.

**अ) वित्तीय स्थितीवर अभिप्राय**

**ताळेबंद**

**निधीचा विनियोग**

**१. कर्जाऊ रकमेच्या व्याजावर स्त्रोतांपाशी आयकर कापून घेणे**

मु.म.प्रा.वि.प्रा. (एमएमआरडीए) यांना ०१.०४.२०१० ते १०.०५.२०१० या कालावधीतील

ठेवेवर व्याजापोटी दिलेल्या ₹६.८९ लाख या रकमेच्या स्त्रोतांपाशी कापलेला कराचा (१०.३ टक्के दराने) समावेश नाही सदर मु.म.प्र.वि.प्रा. (एमएमआरडीए) या संस्थेस कर स्त्रोतांपाशी कपात करण्यापासूनची सूट दि.११.०५.२०१० पासूनच फक्त दिलेला आहे. त्यामुळे त्या आधीच्या कालावधीसाठी स्त्रोतांपाशी कर कपात करावयास पाहिजे होती. अशी स्त्रोतापाशी कपात केलेली नसल्याने ₹६.८९ लाख इतक्या रकमेची सांविधिक आकाराची वसूली होण्यात अपयश आलेले आहे.

सांविधिक लेखा परिक्षक यांनी उपरोक्त बाबीचा उल्लेख त्यांच्या लेखा परिक्षण अहवालात केलेला नाही.

**भारताचे लेखानियंत्रक व महालेखापरिक्षक**
**यांचेसाठी व त्यांच्यावतीने**

**महालेखापाल**
**(वाणिज्य लेखापरिक्षण)**

स्थळ : मुंबई
दिनांक : ३०.१२.२०११

# वित्तीय वर्ष २०१०-११ साठी लेखानियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्या अंतीम अभिप्रायास महानिर्मिती कंपनीचे उत्तर

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित**
**आर्थिक वर्ष २००९-१० साठी हिशेब मांडणीवर सरकारी हिशेब तपासनीसांच्या शेऱ्यांचा खुलासा**

| शासकीय लेखापरिक्षकाचा अभिप्राय वित्तीय स्थितीवर अभिप्राय | महानिर्मिती कंपनीचे उत्तर | संविधिक लेखापरिक्षकाचा शेरा |
|---|---|---|
| **अ) ताळेबंद निधीचा विनीयोग**<br>१. कर्जाऊ रकमेच्या दिलेल्या व्याजाचा आयकर स्त्रोतापाशी कापून घेणे मु.म.प्रा.वि.प्रा. (एमएमआरडीए) यांना ०१.०४.२०१० ते १०.०५.२०१० या कालावधीतील ठेवेवर व्याजापोटी दिलेल्या ₹६.८९ लाख या रकमेच्या स्त्रोतांपाशी कापलेला कराचा (१०.३ टक्के दराने) समावेश नाही सदर मु.म.प्र.वि.प्रा. (एमएमआरडीए) या संस्थेस कर स्त्रोतांपाशी कपात करण्यापासूनची सूट दि.११.०५.२०१० पासूनच फक्त दिलेला आहे. त्यामुळे त्या आधीच्या कालावधीसाठी स्त्रोतांपाशी कर कपात करावयास पाहिजे होती. अशी स्त्रोतापाशी कपात केलेली नसल्याने ₹६.८९ लाख इतक्या रकमेची सांविधिक आकाराची वसूली होण्यात अपयश आलेले आहे. | कलम १९४-ए यातील अटी नुसार कर हा असे उत्पन्न ते पैसे घेणाऱ्याकडे जमा करताना किंवा पैसे अदा करण्याच्या वेळी त्यानुसार द्यावयाचा असतो. सदर प्रकरणी व्याजाचे उपार्जन/देणे तिमाहीला करायची होती. कंपनीने उपार्जन व देणे या दोन्हीची नोंद जुन २०१० मधे केली. उर्पाजन/देणे यावेळी कंपनीकडे अशा व्याजापोटी निरंक कर दराचे प्रमाणपत्र होते. त्यानुसार, कंपनीच्या मते अशा व्याजावर कर कपात करण्याची आवश्यकता नव्हती. | व्यवस्थापनाने दिलेल्या उत्तरानुसार आपणास योग्य वाटेल की सदर कंपनी एम.एम.आर.डी.ए. यांच्या कर्जाच्या व्याजातून स्त्रोतांपाशी कपात १ एप्रिल २०१० ते १० मे २०१० या कालावधीसाठी करण्यास पात्र नव्हती. त्यामुळे येथे विलंब झाल्याचा प्रश्न उद्भवत नाही आणि म्हणून लेखापरिक्षकांनी कंपनी (लेखापरिक्षक अहवाल) आदेश २००३ नुसार त्याचा नोंद अहवाल दिला नाही.<br>उपरिनिर्दिष्ट नमूद केलेल्या बाबीस धक्का न देता सांगण्यात येते की, आमच्या दि.१६ सप्टेंबर २०११ रोजीच्या अहवालातील परिच्छेद २ यात म्हटल्याप्रमाणे सर्वसाधारण स्वीकृत लेखापरिक्षण मानके यातील वित्तीय विवरण पत्रातील रकमा व प्रकटने यांचे प्रायोगिक तत्त्वावर परिक्षण करणे अंतर्भूत आहे.<br>यादृष्टीने वित्तीय वर्षात कंपनीने नोंदलेल्या प्रत्येक व सर्व व्यवहारांची नोंद लेखापरिक्षकांनी परिक्षण करताना करावी अशी अपेक्षा नाही व तसे करणेसुद्धा शक्य नाही. याशिवाय लेखापरिक्षण करतांना प्रत्यक्ष व्यवहार्याची संकल्पनासुद्धा मनात धरावी लागते. यामुळे आमच्या अहवालाच्या रूपात काही फरक करण्याची आवश्यकता आम्हाला वाटत नाही |

| | | |
|---|---|---|
| सांविधिक लेखा परिक्षक यांनी उपरोक्त बाबीचा उल्लेख त्यांच्या लेखा परिक्षण अहवालात केलेला नाही. | | उपरोक्त दोन परिच्छेदात नमूद केलेल्या बाबींना धक्का न लावता आम्ही मत देतो की, कंपनी (लेखापरिक्षक अहवाल) आदेश २००३ च्या कलम ४ मधील उपकलम (९) (ए) याची व्याप्ती वित्तीय वर्षाच्या अखेरच्या तारखेला ६ महिन्यापासून पेक्षा जास्त काळ देय असणाऱ्या सांविधिक थकबाकी पुरती असते. या कारणामुळे सदर रक्कम ही कंपनी नोंदवहीत 'थकबाकी' म्हणून लेखापरिक्षकांच्या अहवालाच्या जोडपत्रासाठी दाखवायला हवी होती. आम्ही सादर करतो की, सदर उपकलमाची व्याप्ती ही जी रक्कम जमा करायची राहिली आहे त्याकरिता असते. जर संबंधित प्राधिकाऱ्यांनी अशा रकमेची मागणी केली नसेल तर ती देय आहे असे मान्य केले नसेल तर ती थकबाकी आहे असे म्हणता येणार नाही. अशाप्रकारे सदर रक्कमेची थकबाकी म्हणून मान्यता नसल्याने त्याविषयी लेखापरिक्षकांनी अहवाल देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.. |

# लेखा परिक्षकांचा अहवाल

## महाराष्ट्र राज्य वीज निमिती कंपनी लिमिटेडच्या सर्व सदस्यांना

१. आम्ही, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कं. लि. ची दि. ३१ मार्च २०११ रोजी असलेला ताळेबंद, तसेच त्यादिवशी संपलेल्या वर्षाचा नफा-तोटा लेखा आणि सदर वर्षाच्या तेथे नमूद केलेल्या विस्तारीत तारखेपर्यंतचे रोकडता प्रवाह विवरण पत्र ही लेखा परिक्षण केलेली कागदपत्रे सोबत जोडली आहेत. ही वित्तीय विवरणपत्रे सादर करणे कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. या विवरणपत्रांचे आम्ही केलेल्या लेखापरिक्षणाच्या आधारे आमचे अभिप्राय व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे.

२. आम्ही आमचे लेखापरीक्षण भारतात सर्वसाधारणपणे स्विकारलेल्या लेखा परिक्षणांच्या मानकांप्रमाणे केले. आम्ही आमच्या लेखापरिक्षणाचा आराखडा तयार करणे व त्यानुसार लेखापरिक्षण करून ही वित्तीय लेखापरिक्षणे कोणत्याही प्रत्यक्ष गैर विवरणांपासून मुक्त असल्याचे समंजसपणे आश्वासन मिळविणे ही या मानकाची गरज आहे. लेखापरिक्षणात प्रायोगिक तत्त्वावर परिक्षण करणे, आणि वित्तिय विवरणपत्रातील रकमा व त्यांचे प्रकटीकरण यांना पुष्टी देणारे पुरावे दाखविणे यांचा समावेश होतो. तसेच लेखांमध्ये वापर केलेल्या लेखातत्त्वांचे व व्यवस्थापनाने केलेल्या महत्त्वांच्या अंदाजांचे मूल्यांकन करणे तसेच सर्वकंश वित्तिय सादरीकरणाचे मूल्यमापन करणे या कार्यवाहीचा अंतर्भाव लेखापरिक्षणात करण्यात येतो. आमच्या लेखापरिक्षणास आम्ही व्यक्त केलेल्या अभिप्रायांस सूज्ञ व संमजस आधार पुरविला आहे असा आमचा विश्वास आहे.

३. भारताच्या केंद्र सरकारने कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २२७ च्या उपकलम (४ए) यातील शर्तीनुसार वितरीत केलेल्या कंपनीचे (लेखापरिक्षण अहवाल आदेश २००३ कंपनीज (ऑडीटर्स रिपोर्ट) (ॲमेंडमेंट) ऑर्डर २००४) यानुसार आम्ही सदर आदेशाच्या परिच्छेद ४ व ५ यात विनिर्देशित केलेल्या विषयांसंबंधी विवरण पत्र जोडत आहोत.

४. वरील जोडपत्रातील आमच्या अभिप्रायासह आम्ही अहवाल देतो की -

१) आमच्या लेखा परिक्षणासाठीच्या उद्दिष्टांसाठी आमचे सर्वोत्तम ज्ञान व विश्वास यानुसार आवश्यक वाटणारी सर्व माहिती व स्पष्टीकरणे आम्ही मिळविली आहेत.

२) आमच्या मते, सदर कंपनीने लेखांसाठी कायद्यांप्रमाणे आवश्यक असणारी सर्व लेखा नोंद पुस्तके योग्यप्रकारे तयार केली आहेत व आम्ही त्या पुस्ताकांचे परिक्षण केले, त्याप्रमाणे ती योग्य प्रकारे ठेवली आहेत.

३) या अहवालांशी संबंधित असलेला ताळेबंद, नफा व तोटा पत्रक आणि रोकडता प्रवाह विवरण पत्र या लेखा पुस्तकांशी सहमत आहोत.

४) अधिसुचना क्र. जी.एस.आर.८२९ (इ) दि. २१-१०-२००३, यानुसार शासकीय कंपन्यांना कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २७४ (१) (जी) यातील तरतूदींतून सूट दिली आहे.

५) कंपनीची (लेखा मानके) नियमावली २००६ अंतर्गत 'लेखा मानके १९ भाडेपट्टी करार' अन्वये भाडे कराराबाबत प्रगटन करणे गरजेचे आहे तथापी विविध जल विद्युत निर्मिती केंद्राबाबत महाराष्ट्र शासनाला केलेल्या भाडेपट्टीच्या कराराची अमंलबजावणी प्रलंबित आहे. प्रलंबित असलेले सदर प्रगटन केलेले नाही. याबाबत अनुसुची १५ मधील टिप क्र. २१ (डी) कडे लक्ष वेधण्यात येते.

६) आमच्या मते या अहवालासंबंधीचे सदर ताळेबंद, नफा व तोटा यांचा लेखा आणि रोकडता प्रवाह ही विवरण पत्रे कंपनी अधिनियम १९५६ यातील कलम २११ च्या उपकलम (३सी) यात संदर्भ दिलेल्या लेखा मानकांच्या आवश्यकता पूर्ण करतात.

*७) कंपनीची दि. ०६ जून २००५ रोजीची मत्ता व दायित्वे यातील शिल्लक महाराष्ट्र विद्युत सुधारणा योजना २००५ अन्वये हस्तांतरीत करण्यात आलेल्या आहेत. आम्हाला देण्यात आलेल्या माहितीप्रमाणे या शिल्लकी म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनी लिमिटेड या कंपनीने स्वीकारल्या असून त्या सदर कंपनीस अद्याप स्वाधीन करावयाच्या आहेत. तसेच अहवाल अधिक माहिती देण्यात आली की, अद्याप अंतीम हस्तांतरण योजना महाराष्ट्र शासनाकडून अधिसूचित व्हायची आहे. जर अशा शिल्लकीमध्ये काही फरक असेल तर त्याचा प्रभाव कंपनीच्या वित्तीय विवरणपत्रांवर होऊ शकेल. तसेच आम्ही अनुसूची १५ मधील टिपा क्र.२ याकडे लक्ष वेधतो. त्यात महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. कडील यापूर्वीच्या वर्षांचे कर्जाचे दायित्व त्यावरील व्याज याबाबतच्या योजनेतील अंशतः सुधारणा म.रा.वि. मं. सूत्रधारी कंपनी लि. ने मान्यता दिल्याप्रमाणे आहे.*

*८) अनुसूची १५ मधील टिपा १६ (ए) यात नमूद केल्याप्रमाणे, किरकोळ ऋणको कडील शिल्लक, कर्ज व अग्रीमे, ठेवी, उपकंत्राटदार यांचेकडील साहित्य, किरकोळ पतदार - यामधे ठेवून घेतलेला पैसा, साहित्याच्या पुरवठ्यांचे दायित्त्व, आंतर गट कंपन्यांच्या शिल्लकी ही समाविष्ट आहेत. तसेच ग्राहकांकडील अग्रीम आणि कोळसा कंपन्यांनी दिलेले अग्रीम व त्याच्या तरतुदी या सर्व बाबी संबंधित संस्था यांच्याकडून जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे कायम होण्याच्या किंवा उपकंपन्याच्या अहवालांशी मेळ घालण्याच्या अधीन असेल असे कायम करणे व मेळ घालण्याचे काम पूर्ण करणे प्रलंबित असल्यामुळे त्याचे परिणामरूप समायोजन करता येणे शक्य नव्हते. या कारणामुळे कंपनीच्या शिल्लकीच्या स्थितीवर आणि फायद्यावर जर काही परिणामरूप प्रभाव पडणार असेल तर, त्याबाबत कोणताही अभिप्राय देण्यास आम्ही असमर्थ आहोत.*

*९) अनुसूची १५ च्या टिपा क्र. १६ (बी) यात म्हटल्याप्रमाणे, कोळसा पुरवठादारांना दिलेल्या ₹२७९३.०६ कोटी एवढ्या अग्रीम रकमेचा समावेश 'कर्ज व अग्रीमे' यात करण्यात आलेला आहे. सदर अग्रीमांमुळे, कंपनीने कोळश्याच्या पुरवठ्यासाठी ₹२६५९.०५ कोटी एवढ्या रकमेच्या*

*दायित्त्वासाठी तरतूद केली आहे. देयकांची अंतीम मंजुरी प्रलंबित असल्यामुळे कंपनीने सदर दिलेल्या अग्रीमासाठीचे दायित्त्वापोटी ₹२६५९.०५ कोटी इतक्या रकमेची तरतूद कोळशाच्या पुरवठ्यासाठी केली आहे. यामुळे कंपनीची संबंधित मत्ता व दायित्त्व याचे अतिरिक्त विवरण झाले आहे. या अतिरिक्त विवरणाचा कंपनीच्या नफ्यावर पडणाऱ्या प्रभावाची निश्चिती करण्यात आलेली नाही.*

*१०) ही कंपनी सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योजक विकास अधिनियम २००६ यातील तरतूदीनुसार पुरवठादारांचा शोध करून घेण्याच्या प्रक्रीयेमध्ये आहे. म्हणून त्यानुसार आवश्यक ती प्रकटने केलेली नाहीत.*

११) उपरिनिर्विष्ट परिच्छेद ४ ((६) ते (१०)) यातील आमच्या अभिप्रयांच्या अधीन राहून, आम्ही मत देतो की, आमच्या सर्वोत्तम माहितीनुसार आणि आम्हास दिलेल्या स्पष्टीकरणांनुसार, सदर अहवाल, त्यावर दिलेल्या टिपांसोबत सहवाचन केल्याप्रमाणे, कंपनी अधिनियम १९५६ याच्या आवश्यकतेनुसार, त्यासाठी हव्या असलेल्या स्वरूपाप्रमाणे माहिती देतात आणि भारतात स्वीकारल्या जाणाऱ्या लेखाच्या तत्त्वांनुसार सत्य व योग्य दृश्य सादर करतात.

अ) **ताळेबंदासंबंधी** - कंपनीच्या व्यवहाराच्या दि. ३१ मार्च २०११ रोजी असणाऱ्या स्थितीनुसार आहे.

ब) **नफा व तोटा यांच्या लेखासंबंधी** - सदर दिनांकास संपलेल्या दिवशी असणारा नफा दर्शवितात.

क) **रोकडता प्रवाह विवरण पत्रा संबंधी** - सदर दिनांकास संपलेल्या वर्षासाठीचे रोकडता प्रवाह दर्शवितात.

**सी.व्ही.के. अँड असोशिएटस्**
सनदी लेखापाल
**एफआरएनः १०१७४५ डब्ल्यू**

**अशोक के. प्रधान**
भागीदार
**एम.नं. ३२१५६**

**के.एस.अय्यर अँड कंपनी**
सनदी लेखापाल
**एफआरएनः १००१८६ डब्ल्यू**

**राजेश एस. जोशी**
भागीदार
**एम.नं. ३८५२६**

**जी.एम.कापडीया अँड कं.**
सनदी लेखापाल
**एफआरएनः १०४७६७ डब्ल्यू**

**राजन आर. अशर**
भागीदार
**एम.नं. ४८२४३**

स्थळ : मुंबई
दिनांक : १६ सप्टेंबर २०११

# आमच्या समान दिनांकाच्या अहवालाच्या परिच्छेद ३ यामध्ये संदर्भ असलेले जोडपत्र.

१. अ) या कंपनीच्या स्थिर मत्तेचा प्रत्यक्ष पडताळणी या वर्षात व्यवस्थापनाने एका बाह्य सनदी लेखापालांच्या संस्थेच्या मदतीने करुन घेतली. त्याच्या अहवालाच्या आधारे आवश्यक ते समायोजन मुख्यालय येथील लेखांच्या पुस्तकात करण्यात आले. *मात्र स्थीरमत्ताच्या संबंधित जागी असलेल्या नोंदीचे अद्यावत करणे प्रगती पथावर आहे.*

ब) आम्हाला देण्यात आलेल्या माहितीनुसार कंपनीचे स्थीरमत्तेची प्रत्यक्ष पडताळणी तीन वर्षांनी एकदा करण्याचे धोरण आहे. आमच्या मते हे व्यवहार्य असून कंपनीचे आकारमान आणि व्यवसायाचे स्वरूप याच्याशी सुसंगत आहे. उपरोक्त परिच्छेद १ अ मध्ये नमूद केल्यानुसार कंपनीने यावर्षी स्थीरमत्तेची प्रत्यक्ष पडताळणीचे काम पार पाडले.

क) लेखा परिक्षणाच्या वर्षात कंपनीने स्थीर मत्तेच्या मोठ्या भागांची विक्री किंवा विल्हेवाट लावली नाही.

२. अ) व्यवस्थपनाने वस्तू सूचींची प्रत्यक्ष पडताळणी योग्य काळाच्या अंतराने केलेली आहे.

ब) आमच्या मते आणि आम्हाला दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावरून व्यवस्थापनाने अवलंबलेली वस्तू सूचींची प्रत्यक्ष पडताळणी करण्याची कार्यपद्धती ही कंपनीचा आकार व व्यवहाराचे स्वरूप यानुसार योग्य व पुरेशी आहे.

क) आमची वस्तूसूचीच्या अहवालाची तपासणी व प्रत्यक्ष पडताळीचा अहवाल या आधारे आमचे मत झाले आहे की, कंपनी वस्तूसूचीचे अभिलेख व्यवस्थित जतन करीत आहे. कोळशा व्यतिरिक्त अन्य कोणत्याही बाबतीत प्रत्यक्ष विसंगती दिसून आलेली नाही. कोळशाच्या बाबतीतील विसंगतीचे लेखामध्ये योग्य ते समायोजन करण्यात आलेले आहे.

३. अ) आम्हास दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणे यावरून दिसून येते की, सदर वर्षात कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३०१ अंतर्गत ठेवलेल्या अभिलेखातील समाविष्ट होणाऱ्या कोणत्याही कंपन्या, फर्म्स किंवा इतर संस्था / व्यक्ती यांना कोणतेही कर्ज मंजूर केलेले नाही. म्हणून सदर उपकलम नुसार वरील आदेशाच्या परिच्छेद ४ कलम (३) यातील उपकलम 'ए ते डी' नुसार कोणताही अहवाल देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

ब) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावरून दिसून येते की, सदर वर्षात कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३०१ अंतर्गत ठेवलेल्या अभिलेखात समाविष्ट होणाऱ्या कोणत्याही कंपन्या, फर्म्स आणि इतर संस्था / व्यक्ती यांचेकडून कोणतीही प्रतिभूत किंवा अप्रतिभूत कर्जे घेतले नाहीत. म्हणून सदर उपकलमानुसार वरील आदेशाच्या ४ थ्या परिच्छेदाच्या कलम ३ च्या उपकलम इ ते जी नुसार कोणताही अहवाल देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

४. आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावरून कंपनीचे आकारमान व तिच्या व्यवहारांचे स्वरूप याला सुसंगत अशी वस्तूस्थिती व स्थीरमत्ता यांची खरेदी तसेच माल व सेवांची विक्री यासाठी पुरेशा अंतर्गत नियंत्रण प्रणाली कंपनीकडे आहे. मात्र वस्तू माल व स्थीरमत्ता यांच्या खरेदीच्या संबंधीत अंतर्गत नियंत्रण व्यवस्था अधिक बळकट करण्यास वाव आहे. याशिवाय विविध प्रकारच्या चालू मत्ता व चालू दायित्वे यांच्या संस्थानुसार आणि वयानुसार तपशील गोळा करणे व त्याची देखभाल करणे यात काहीशी दुर्बलता असल्याचे आमचे निरिक्षण आहे.

*कोळशाच्या खरेदी संदर्भात कंपनीस कमी दर्जाचा / गुणवत्तेत उणीव असलेला कोळसा पुरविल्याबद्दल बरीच गाऱ्हाणी व्यवस्थापनाकडे आली. व्यवस्थापनाचा असा दृष्टीकोन आहे की, कोळसा खरेदी अंतर्गत नियंत्रणाचा आढावा घेतला पाहिजे व ती अधिक कडक केली पाहिजेत. म्हणून अशा तक्रारींच्या आधारे तसेच अंर्तगत नियंत्रण अधिक कडक करण्यासाठी व्यवस्थापनाने कंपनीला पुरवठा होणाऱ्या कोळशाच्या तपासणीसाठी अंतर्गत तिऱ्हाईत निरिक्षण संस्था नियुक्त केली. सद्यस्थितीत या संस्थेचा अहवाल प्राप्त व्हायचा असल्याने या पद्धतीतील उणीवा दूर करून ती बळकट करण्यासाठी व्यवस्थापनाने केलेली उपाय योजना पुरेशा प्रभावी आहेत किंवा कसे यावर अभिप्राय देणे सध्या शक्य नाही.*

५. आम्ही केलेले लेखापुस्तकांचे परिक्षण व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे या आधारे कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३०१ अनुसार ठेवण्यात येणाऱ्या नोंदवहीत ज्याची नोंदणी करणे आवश्यक आहे असा कोणताही व्यवहार केलेला नाही.

६. आमच्या मते व आम्हास दिलेला माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनी अधिनियम १९५६ चे कलम ५८ए आणि ५८एए तसेच कंपनीज् (ठेवींचा स्वीकार) नियमावली १९७५ यातील अर्थाच्या अंतर्गत कंपनीने जनतेकडून कोणत्याही ठेवी स्वीकारलेल्या नाहीत. आम्हास दिलेल्या माहितीनुसार कंपनी लॉ बोर्ड, नॅशनल कंपनी लॉ ट्रायब्यूनल, आर.बी.आय. आणि अन्य कोणतेही न्यायालय किंवा न्यायमंडळ यांनी कंपनीच्या विरोधात कोणताही आदेश काढलेला नाही.

७. कंपनीने आपले मुख्यालय आणि अन्य जागी अंतर्गत लेखापरिक्षण करण्यासाठी सनदी लेखापालच्या बाहेरच्या संस्थां / फर्म्सची नियुक्ती केली आहे. *मात्र त्यांचे अहवाल वेळेवर मिळालेले नाहीत.* आमच्या या मतांच्या

अधीन राहून आणि आम्हास दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीमध्ये प्रचलीत असलेली अंतर्गत लेखापरिक्षण प्रणाली ही पुरेशी असून कंपनीचे आकारमान व व्यवहाराचे स्वरुप यांच्याशी सूसंगत आहे.

८. केंद्र सरकारने खर्चांच्या नोंदी ठेवण्यासाठी कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २०९ (१) (डी) या कलमाखाली विहीत केलेल्या नियमावलीनुसार कंपनीने ठेवलेल्या लेखा पुस्तकाचे आम्ही स्थूल मानाने अवलोकन केले. मात्र सदर अभिलेख अचूक आणि परिपूर्ण असल्याच्या निश्चितीसाठी आम्ही तपशीलावर परिक्षण केलेले नाही.

९. अ) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार, कंपनी योग्य त्या प्राधिकाऱ्यांकडे द्यावयाची संशयविरहीत सांविधिक देणी जमा करण्याचे काम सर्वसामान्यपणे नियमीत करीत आहे. यामधे भविष्यनिर्वाह निधी, गुंतवणूकदार शिक्षण व रक्षण निधी, कर्मचाऱ्यांचा राज्य विमा, आयकर, निधी कर, संपत्ती कर, सेवा कर, सीमा शूल्क, उत्पादन शूल्क, अधिकारी उपकर आणि अन्य लागू असणारी सांविधिक देणी यांचा समावेश आहे.

आम्हास दिलेला माहिती व स्पष्टीकरणे यानुसार ज्यांच्याबद्दल वाद नाहीत अशी आयकर, विक्री कर, संपत्ती कर, सेवा कर, सीमाशूल्क, उत्पादन शूल्क, उपकर इ. देणी त्यांना देय असलेल्या तारखेपासून सहा महिन्यापेक्षा जास्त काळासाठी व ताळेबंदाच्या तारखेस शिल्लक नव्हती.

ब) कंपनीच्या अभिलेखानुसार खालील बाबी वगळता अन्य कोणतीही देणी म्हणजे आयकर / विक्री कर / संपत्ती कर / सेवा कर / सीमा शूल्क / उत्पादन शूल्क / उपकर ही कोणत्याही वादाच्या कारणास्तव जमा करण्याची राहिलेली नाहीत.

| थकित रकमेचे स्वरुप | भरणा न केलेली रक्कम | जेथे वाद प्रलंबित आहे तो मंच |
|---|---|---|
| उत्पादन शूल्क | ₹२.४३ कोटी | आयुक्त केंद्रीय उत्पादन शूल्क |
| वर्षे २००६-०७ साठी आयकर कायदा १९६१ च्या कलम २७१ (सी) अनुसार दंड | ₹११३ कोटी | आयुक्त (अपील) मुंबई |
| सेवाकरापोटी कलम १९४ सी अंतर्गत स्त्रोतापाशी कापलेला आयकर | ₹८.९५ लक्ष | आय.टी.ए.टी. पुणे शाखा |

१०. वित्तिय वर्षाच्या अखेरीस कंपनीकडे कोणतेही संचित तोटे नाहीत. कंपनीच्या लेखा पुस्तकांनुसार, वित्तीय वर्षात व नजीकच्या मागील वर्षात कंपनीला कोणताही तोटा झालेला नाही.

११. आमची लेखापरिक्षणाची पद्धती व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे या आधारे आमचे असे मत आहे की, कंपनीने कोणतीही वित्तीय संस्था, बँक किंवा ऋणपत्रधारक (डिबेंचर होल्डर) यांना पूनर्देय असलेली देणी देण्याचे खंडीत केलेले नाही.

१२. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने कोणासही भाग भांडवल, ऋणपत्रे किंवा अन्य प्रतिभूती गहाण ठेवून कर्ज किंवा अग्रीमे दिलेली नाहीत.

१३. आमच्या मते तसेच आम्हास असलेला सर्वोतपरी माहिती आणि आम्हास दिलेले स्पष्टीकरण यानुसार ही कंपनी एखादी चीट फंड कंपनी नाही किंवा एखादी एकमेकांस लाभकारी निधी सोसायटी (संस्था) नाही. म्हणून आमच्या मते उपरनिर्दिष्ट आदेशातील परिच्छेद ४ मधील कलम (१३) यातील तरतूदी या कंपनीस लागू होत नाहीत.

१४. कंपनीचे अभिलेख आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार सदर कंपनी शेअर्स, सिक्युरीटीज, डीबेंचर्स आणि इतर गुंतवणूकी यांनी व्यवहार किंवा व्यापार करीत नाही. म्हणून उपरनिर्दिष्ट आदेशातील परिच्छेद ४ मधील कलम (१४) यातील तरतूदी या कंपनीस लागू होत नाहीत.

१५. कंपनीचे अभिलेख आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार या कंपनीने इतरांनी घेतलेल्या कोणत्याही कर्जासाठी कोणतीही बँक किंवा वित्तीय संस्था यांना हमी दिलेली नाही.

१६. आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने मुदत कर्जे ज्या हेतूसाठी मिळविली त्यासाठीच वापरली असे समग्र आढाव्याच्या आधारे दिसून आले.

१७. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे आणि कंपनीच्या ताळेबंदाचे समग्र परिक्षण केल्यावर आम्ही अहवाल देतो की, कंपनीने अल्प मुदतीसाठी उभारलेल्या निधीचा वापर दीर्घ मुदतीच्या गुंतवणूकींसाठी केलेला नाही.

१८. या वित्तीय वर्षात कंपनीने कायद्याच्या कलम ३०१ अंतर्गत ठेवलेल्या नोंदवहीत समावेश केलेल्या व्यक्ती / संस्था किंवा कंपन्या यांना कोणत्याही शेअर्स प्राधान्याने वितरण केलेले नाही.

१९. कंपनीने कोणतीही ऋणपत्रे दिलेली नाहीत, म्हणून हे कलम लागू होत नाही.

२०. सदर कंपनीने या लेखापरिक्षणाच्या कालावधीत जनतेकडून कोणताही सार्वजनिक निधी घेतलेला नाही. म्हणून उपारनिर्दिष्ट आदेशाच्या परिच्छेद ४ मधील कलम (२०) यातील तरतूदी या कंपनीस लागू होत नाहीत.

२१. लेखा पुस्तकांचे सदर परिक्षण आम्ही सर्वसाधारणमध्ये स्वीकारल्या जाणाऱ्या लेखापरिक्षण पद्धतीनुसार करताना, आम्हाला या वित्तीय वर्षात, कंपनीवर किंवा कंपनीकडून कोणताही लबाडी केल्याचे दिसून आलेले नाही. यामध्ये कंपनीच्या दक्षता विभागातंर्गत प्रकरणे / भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे कार्यालय यांच्या प्रकरणांचाही समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| **सी.व्ही.के. अँड असोशिएटस्** | **के.एस.अय्यर अँड कंपनी** | **जी.एम.कापडीया अँड कं.** |
| सनदी लेखापाल | सनदी लेखापाल | सनदी लेखापाल |
| **एफआरएनः १०१७४५ डब्ल्यू** | **एफआरएनः १००१८६ डब्ल्यू** | **एफआरएनः १०४७६७ डब्ल्यू** |
| **अशोक के. प्रधान** | **राजेश एस. जोशी** | **राजन आर. अशर** |
| भागीदार | भागीदार | भागीदार |
| **एम.नं. ३२१५६** | **एम.नं. ३८५२६** | **एम.नं. ४८२४३** |

स्थळ : मुंबई
दिनांक : १६ सप्टेंबर २०११

# ३१ मार्च २०११ रोजीचे ताळेबंद पत्रक

| | | अनुसूची क्र. | ३१ मार्च २०११ ₹ | ३१ मार्च २०१० ₹ |
|---|---|---|---|---|
| **अ.** | **निधी स्त्रोत** | | | |
| १. | भागधारकांचा निधी | | | |
| | अ. भाग भांडवल | १ | २५,०००,५००,००० | २५,०००,५००,००० |
| | ब. भाग भांडवल निलंबित हिशेब (नोंद क्र.५(१)) | | ६३३,६३३,५३७ | ६३३,६३३,५३७ |
| | क. भाग भांडवल निधी वाटप प्रलंबित (नोंद क्र.५(२)) | | २२,३३१,३६७,००० | १६,३१२,६६७,००० |
| | ड. राखीव आणि आधिक्य | २ | ९,७२१,९१९,१७१ | ६,६२७,३५१,८१९ |
| २. | कर्ज निधी | | | |
| | अ. सुरक्षित कर्जे | ३ | ११७,२८५,१७१,०६२ | ९३,१०४,६१४,१४२ |
| | ब. सुरक्षित न केलेली कर्जे | ४ | ४६,४४४,४९०,५०२ | ३६,७७५,३०३,६०० |
| ३. | प्रलंबित कर दायित्व (निव्वळ) | | ८,१८९,२४१,८०९ | ५,००८,०७९,४८३ |
| | **एकूण** | | **२२९,६०६,३२३,०८१** | **१८३,४६२,१४९,५८१** |
| **ब.** | **निधी वापर विवरण** | | | |
| १. | स्थीर मत्ता | | | |
| | अ. एकत्रित | ५ | १६२,७२१,८३३,३०७ | १३४,२५०,०९७,५२९ |
| | ब. वजा : घसारा | | ७५,६१९,०९७,५३३ | ७४,६२१,२६९,९७९ |
| | वजा - जुन्या मत्तासाठी तरतूद | | १०४,१२१,४५५ | ३९,४८८,४९४ |
| | क. निव्वळ गठ्ठा निधी | | ८६,९९८,६१४,३१९ | ५९,५८९,३३९,०५६ |
| | ड. १) प्रगतीपथावरील कामांचा भांडवली खर्च | | ११९,३९०,१९२,५४४ | १०३,५२८,५९९,८३९ |
| | २) कंपनीशी संबंधीत नसलेली प्रगतीपथावरील कामांचा भांडवली खर्च | | २२,४२१,३०८ | ३,४७४,०२४ |
| | वजा - निरुपयोगी कामाची तरतुद | | ११४,०९६,६०६ | - |
| | प्रगतीपथावरील कामाचा भांडवली खर्च (निव्वळ) | | ११९,२९८,५१७,२४६ | १०३,५३२,०७३,८६३ |
| | इ. सक्रीय वापरातून निवृत्त केलेली व विक्रीसाठी काढलेली | | १,०९५,१२२,६३२ | ३१५,५९५ |
| २. | गुंतवणुक | ६ | १,६००,१०० | १,१००,१०० |
| ३. | चालू मत्ता, कर्ज व अग्रीमे | ७ | | |
| | अ. वस्तू सूची | | १२,७३३,६७७,६७७ | १०,८७८,९०२,९०५ |
| | ब. किरकोळ येणी | | ५०,६४३,३५१,२३५ | ३२,४०८,५७७,६५३ |
| | क. रोकड व बँक शिल्लक | | ४३४,१३४,०९७ | २,१६२,१११,२६० |
| | ड. कर्जे व अग्रीम | | ३९,३६९,७८५,८७० | ६४,२०७,४४४,४९६ |
| | (अ) | | १०३,१८०,९४८,८७९ | १०९,६५७,०३६,३१४ |
| | वजा : चालू दायित्वे व तरतूदी | | | |
| | अ. चालू दायित्व | ८ | ७१,९४१,४३६,३८२ | ८२,९५८,६४५,६३१ |
| | ब. तरतूदी | ९ | ९,०२७,०४३,७१३ | ६,३५९,०६९,७१६ |
| | (ब) | | ८०,९६८,४८०,०९५ | ८९,३१७,७१५,३४७ |
| | निव्वळ चालू मत्ता (अ)-(ब) | | २२,२१२,४६८,७८४ | २०,३३९,३२०,९६७ |
| | **एकूण** | | **२२९,६०६,३२३,०८१** | **१८३,४६२,१४९,५८१** |
| | **लेखासंबंधी टीप -** | **१५** | | |

सोबत जोडलेल्या आमच्या अहवालानुसार
**सी.व्ही.के. आणि असोसिएटस् करिता**
सनदी लेखापरीक्षक
(एफआरएन - १०१७४५ डब्ल्यू)

(ए. के.प्रधान)
भागीदार (मेंबरशिप क्रमांक ३२१५६)

**के. एस. अय्यर आणि कंपनीकरिता**
सनदी लेखापरीक्षक
(एफआरएन - १००१८६ डब्ल्यू)

राजेश एस. जोशी
भागीदार (मेंबरशिप क्रमांक ३८५२६)

**जी. एम. कपाडीया आणि कंपनीकरिता**
सनदी लेखापरीक्षक
(एफआरएन - १०४७६७ डब्ल्यू)

(राजन अशर)
भागीदार (मेंबरशिप क्रमांक ४८२४३)
मुंबई, १६ सप्टेंबर २०११

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित**

जी.जे.गिरासे
संचालक (वित्त)

सुब्रत रथो
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

एस.के. लाबडे
मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

राहुल दुबे
कंपनी सचिव

# नफा-तोटा विवरण पत्र ३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या वर्षाकरिता

| | अनुसूची क्र. | ३१ मार्च २०११ ₹ | ३१ मार्च २०१० ₹ |
|---|---|---|---|
| **उत्पन्न** | | | |
| वीज विक्रीतून मिळालेला निधी | | १२१,१६२,३२३,२३३ | ११०,८४५,१३१,८६३ |
| वजा : विजेवरील कर | | १२,२४२,३५८ | १२,६२५,३१२ |
| | | १२१,१५०,०८०,८७५ | ११०,८३२,५०६,५५१ |
| महसूल अर्थसहाय्य व अनुदान | | १४,८०६,५६० | |
| इतर उत्पन्न | १० | १,०३७,०१४,९२१ | १,०३२,८८९,३२३ |
| | | १२२,२०१,९०२,३५६ | १११,८६५,३९५,८७४ |
| **खर्च** | | | |
| इंधनाची किंमत | | ८२,८१७,३१६,३३२ | ८३,१३०,२०७,७५१ |
| निर्मिती, प्रशासकीय व इतर खर्च | ११ | १२,२३३,७७७,१३२ | ११,३२४,१३९,०९८ |
| कर्मचारी मूल्य | १२ | ८,७०५,५९९,३३२ | ५,५६६,८६७,९९४ |
| घसारा / कर्जफेडीसाठी तरतूद (अनुसूची १५ मधील नोंद १९ (१) पहावी) | | ३,९८१,२६६,८०३ | ३,००९,४२०,५६४ |
| व्याज आणि वित्तीय आकार | १३ | ६,५७४,३३१,४२३ | ४,६९८,८१३,५०६ |
| मागील वर्षाची (जमा) / (आकार) नक्त | १४ | (११०,६०४,०६७) | १९१,५८७,८०३ |
| | | ११४,२०१,६८६,९५५ | १०७,९२१,०३६,७१६ |
| **कर पूर्व निव्वळ नफा** | | **८,०००,२१५,४०१** | **३,९४४,३५९,१५८** |
| वजा : करासाठी तरतूद | | | |
| चालू कर भरण्यासाठी | | १,७२४,०००,००० | ७४१,०००,००० |
| संपत्ति कर भरण्यासाठी | | ४८५,७२३ | ५३१,७५७ |
| स्थगित कर भरण्यासाठी | | ३,१८१,१६२,३२६ | १,१६८,४८२,८५८ |
| **निव्वळ नफा करोत्तर** | | **३,०९४,५६७,३५२** | **२,०३३,९८४,५४३** |
| जमा मागील वर्षाची पुढे आणलेली शिल्लक | | ६,६२७,३५१,८१९ | ४,५८८,९९२,२७७ |
| विमोचन राखीवतेकडे / कडून हस्तांतरीत झालेली | | - | (४,३७५,०००) |
| **शिल्लक दाखवलेली ताळेबंद तक्त्यावर** | | **९,७२१,९१९,१७१** | **६,६२७,३५१,८१९** |
| **प्रतिसमभाग उत्पन्न (₹)** | | | |
| प्रतिसमभाग मूलभूत मिळकत | | ०.६८ | ०.५५ |
| प्रतिसमभाग सौम्य केलेली मिळकत | | ०.६८ | ०.५५ |
| **हिशेबावरील टीप** | १५ | | |

सोबत जोडलेल्या आमच्या अहवालानुसार
**सी.व्ही.के. आणि असोसिएट्स् करिता**
सनदी लेखापरीक्षक
(एफआरएन - १०१७४५ डब्ल्यू)

(ए. के.प्रधान)
भागीदार (मेंबरशिप क्रमांक ३२१५६)

**के. एस. अय्यर आणि कंपनीकरिता**
सनदी लेखापरीक्षक
(एफआरएन - १००१८६ डब्ल्यू)

राजेश एस. जोशी
भागीदार (मेंबरशिप क्रमांक ३८५२६)

**जी. एम. कपाडीया आणि कंपनीकरिता**
सनदी लेखापरीक्षक
(एफआरएन - १०४७६७ डब्ल्यू)

(राजन अशर)
भागीदार (मेंबरशिप क्रमांक ४८२४३)
मुंबई, १६ सप्टेंबर २०११

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित**

जी.जे.गिरासे
संचालक (वित्त)

सुब्रत रथो
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

एस.के. लाबडे
मुख्य महाव्यवस्थापक (लेखा)

राहुल दुबे
कंपनी सचिव

## ताळेबंद पत्रकाचा भाग असणाऱ्या सुची

| | ३१/०३/२०११ रोजीचे ₹ | ३१/०३/२०१० रोजीचे ₹ |
|---|---|---|
| **अनुसूची १ - भाग भांडवल** | | |
| **अधिकृत** | | |
| ५,०००,०००,००० (गतवर्षी ५,०००,०००,०००) समभाग प्रत्येकी ₹१० किंमतीचा | ५०,०००,०००,००० | ५०,०००,०००,००० |
| **प्रचलित, अभिदत्त आणि भरणा झालेले** | | |
| २,५००,०५०,००० (गतवर्ष २,५००,०५०,०००) समभाग प्रत्येकी ₹१० किंमतीचा पूर्णपणे भरलेले (उपरोल्लेखित एकुण समभागापैकी २,५००,०००,००० भाग हे म.रा.वी.म. सुत्रधारी कं. मं. तर उर्वरीत ५०,००० समभाग महाराष्ट्र सरकारचा नामनिर्देशित संस्थांचे आहेत. | २५,०००,५००,००० | २५,०००,५००,००० |
| **एकूण** | **२५,०००,५००,०००** | **२५,०००,५००,०००** |
| | | |
| **अनुसूची २ - राखीव आणि आधिक्य** | | |
| (१) ऋणपत्र विमोचन राखीव | | |
| आरंभीची शिल्लक | - | ४,३७५,००० |
| अधिक : नफा-तोटा विनियोजित खात्यातून वर्षभरात हस्तांतरीत झालेले | - | (४,३७५,०००) |
| (२) नफा - तोटा तत्त्व्यानुसार दाखविलेली शिल्लक | ९,७२१,९१९,१७१ | ६,६२७,३५१,८१९ |
| **एकूण** | **९,७२१,९१९,१७१** | **६,६२७,३५१,८१९** |

| | ३१/०३/२०११ रोजी ₹ | ३१/०३/२०१० रोजी ₹ |
|---|---|---|
| **अनुसूची ३ - सुरक्षित कर्जे** | | |
| **मुदत कर्जे** | | |
| बँकाकडून | | |
| लघु मुदतीचे कर्जे (एका वर्षात परत करावयाची रक्कम निरंक, (गतवर्षी मुदतीचे कर्ज ₹३०० करोड)) | निरंक | ३,०००,०००,००० |
| मध्यम व दीर्घ मुदतीचे कर्जे (एका वर्षात परत करावयाची रक्कम ₹१९.५५, (गतवर्षी ₹४२.३४ करोड)) | १,१०१,८३८,९४० | १,४२६,३२०,४८१ |
| व्यवसायीक भांडवलीसाठी कर्ज (बँक ओव्हरड्राफ्ट) | ११,३३१,९५७,२५६ | ११,३५२,७७१,७८० |
| इतरांकडून | | |
| वीज वित्तीय महामंडळाकडून (एका वर्षात परत करावयाची रक्कम ₹४९७.५२ करोड, (गतवर्षी ₹३२५.७६ करोड)) | ५२,०३६,१९६,३६१ | ४६,३५१,५४३,७८७ |
| ग्रामीण विद्युतीकरण महामंडळ (एका वर्षात परत करावयाची रक्कम ₹३३५.३१ करोड आणि मागील वर्षी रक्कम - ₹ निरंक) | ५२,८१५,१७८,५०५ | ३०,९७३,९७८,०९४ |
| **एकूण** (वरील कर्जाच्या सुरक्षिततेच्या सखोल माहितीसाठी कृपया टिप ६(अ) व ६(क) पहा) | **११७,२८५,१७१,०६२** | **९३,१०४,६१४,१४२** |
| **अनुसूची ४ - असुरक्षित कर्जे** | | |
| पीएफसी कर्ज महाराष्ट्र सरकारच्या हमीवर मिळलेले | ६,७८४,६१४,००० | ८,७२७,३०२,००० |
| बँकांकडून - कमी कालावधांची कर्जे (एका वर्षात परत करावयाची रक्कम ₹२९५५ करोड आणि गतवर्षातील ₹७१६ करोड) | २९,५५०,०००,००० | १९,५००,०००,००० |
| मुदत ठेव एमएमआरडीए ची (एका वर्षात परत करावयाची रक्कम ₹१०० करोड आणि गतवर्षातील ₹ निरंक) | १,०००,०००,००० | १,०००,०००,००० |
| बँकांकडून विशेष प्रकल्पाचे कमी मुदतीचे कर्ज (एका वर्षात परत करावयाची रक्कम ₹७३७ करोड आणि गतवर्षातील ₹५६५ करोड) | ७,३७०,०००,००० | ५,६५०,०००,००० |
| राज्यसरकारकडून घेतलेली मुदत कर्जे (एका वर्षात परत करावयाची रक्कम ₹४७.४४ करोड आणि गतवर्षातील ₹१५.८१ करोड) | १,७३९,८७६,५०२ | १,८९८,००१,६०० |
| **एकूण** (टिप ६(ब) आणि ६(क) पहा) | **४६,४४४,४९०,५०२** | **३६,७७५,३०३,६००** |

# ताळेबंद पत्रेक भागाच्या अनुसूची रचना

## अनुसूची ५ - स्थावर मालमत्ता

(रक्कम ₹ मध्ये)

| मालमत्ता | ऐक गठ्ठा (एकूण किंमत) | | | | घसारा / अमूर्तीकरण | | | | | निरुपयोगी झालेल्या सामानासाठी तरतूद | | निव्वळ गठ्ठा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १-४-२०१० रोजी | वाढ / समायोजन | वजा / समायोजन | ३१/३/२०११ रोजी | १-४-२०१० रोजी | वर्षभरासाठी घसारा / अमूर्तीकरण | पूर्वीच्या कालावधीचा घसारा | वजा / समायोजन ₹ | ३१/३/२०११ रोजी | ३१/३/२०११ रोजी | ३१/३/२०१० रोजी | ३१.०३.२०११ रोजी | ३१.०३.२०१० रोजी |
| **मूर्त मालमत्ता** | | | | | | | | | | | | | |
| जमीन (विकास खर्च धरून) | | | | | | | | | | | | | |
| मुक्त | ७३३,६९२,३८३ | ४१२,६४०,८६९ | २२७,००२ | १,१४६,१०६,२५० | - | - | | - | - | | | १,१४६,१०६,२५० | ७३३,६९२,३८३ |
| भाडेपट्टीची | ५५१,५५५,७६९ | | | ५५१,५५५,७६९ | ३२,४२२,२३१ | ९,१९२,७४० | | | ४१,६१४,९७१ | | | ५०९,९४०,७९८ | ५१९,१३३,५३८ |
| इमारत | | | | | | | | | | | | | |
| कारखाना इमारत | ७,८४७,२७०,५२७ | ४,५८६,६७४ | ४४५,८१७,५२२ | ७,४०६,०३९,६७९ | ४,३१९,२६६,६२५ | १६२,४८६,२८२ | ३९०,३४२ | ३५५,५४८,०१९ | ४,१२६,५९५,२३० | ६,०४३,२२० | ३,७९८,१२२ | ३,२७३,४०१,२२९ | ३,५२४,२०५,७८० |
| इतर | ३,२२२,६८५,३९६ | ९७५,९३३,५१३ | १३१,५४४,६७१ | ४,०६७,०७४,२३८ | १,०९९,६८६,०६० | ७२,७३८,०५३ | १४४,६१९ | ७१४,१६८ | १,१७१,८५४,५६४ | | | २,८९५,२१९,६७४ | २,१२२,९९९,३३६ |
| जलविद्युत सयंत्र | १०,२५४,०७३,१३४ | ३,३४३,३४७,४५९ | १५४,०९१,०५७ | १३,४४३,३२९,५३६ | ५,०३३,९११,३५१ | २९२,४३८,७५७ | ८,०३४,९८३ | ६७,६०६,२३८ | ५,२६६,७७८,८५३ | ९७७,८०२ | | ८,१७५,५७२,८८१ | ५,२२०,१६१,७८३ |
| इतर बांधकामे | | | | | | | | | | | | | |
| रेल्वे सायडींग | २,८३४,८१८,२८० | ६१२,३०२,६३९ | ३२,१९१,१९८ | ३,४१४,९२९,७२१ | ६५४,३८८,०८९ | ५४,३९९,४२१ | - | ८,२२८,५६८ | ७००,५५८,९४२ | | | २,७१४,३७०,७७९ | २,१८०,४३०,१९१ |
| रस्ते व इतर | ३,८७०,१४६,८५२ | ४७२,३००,६२८ | (१,३४९,६८४,५३१) | ५,६९२,१३२,०११ | १,१८५,४२४,६३५ | ९१,८८७,५९४ | २,८९८,१३४ | (९५१,९८४,६८५) | २,२३२,१९५,०४८ | ४१,८४६ | | ३,४५९,८९५,११७ | २,६८४,७२२,२१७ |
| संयत्र, मशीन व सामान | १०१,४४१,५३६,११८ | २६,९३७,९७४,२१४ | ५,१६४,५७९,८०४ | १२३,२१४,९३०,५२८ | ६०,६९९,७६३,१३९ | ३,१८४,१५४,०४९ | (२३३,८८८,८७९) | ३,२२२,३०६,३३९ | ६०,४२७,७२१,९७० | १४,७०६,५२० | ३५,४४७,८८६ | ६२,६९२,५०२,०३८ | ४०,७०६,३२५,०९३ |
| लाईन्स व केबल्स | १,९७६,२७२,४७६ | १५६,२८७,५९६ | १९,८४८,००३ | २,११२,७१२,०६९ | १,१३१,२३८,६२२ | ५३,८२९,९०४ | ४४०,३२९ | २४,३०१,५९८ | १,१६१,२०७,२५७ | ४,५३१ | | ९५१,५००,२८१ | ८४५,०३३,८५४ |
| वाहने | १९७,१८७,३४१ | १०,४७०,२४२ | ४३,०७१,७३५ | १६४,५८५,८४८ | १४१,०११,६२५ | १५,४००,४७९ | ७३९ | ४३,३९९,३३७ | ११३,०१३,५०६ | १,२३२,१६४ | २४२,४८६ | ५०,३४०,१७८ | ५५,९३३,२३० |
| फर्निचर व इतर सामान | १८९,२४६,५१२ | ११५,९६३,५८६ | १६६,०३५ | ३०५,०४४,०६३ | १०८,१६५,५५३ | १०,५३०,२६५ | (२३०,४९६) | ३,५५५,९९४ | ११४,९०९,३२८ | ११६,६३४ | | १९०,०१८,१०१ | ८१,०८०,९५९ |
| कार्यालयीन साहित्य | २३१,९६७,५६५ | २८,७४४,१६० | (४१६,९७०) | २६१,१२८,६९५ | १०८,०४९,२०२ | १२,४२८,३४६ | (१७७,१४४) | ४,०६४,६५८ | ११६,२३५,७४६ | ५४३,०५२ | | १४४,३४९,८९७ | १२३,९१८,३६३ |
| कंपनीची मालकी नसलेला भांडवली खर्च / मालमत्ता | ८५३,३९७,१८८ | | (१३,४६२,२५१) | ८६६,८५९,४३९ | ९५,८३३,१८५ | ३०,५९९,२५१ | - | (३,२४९,१८४) | १२९,६८१,६२० | ४४५,६८६ | | ७३६,७२२,१३३ | ७५७,५६४,००३ |
| **अमूर्त मालमत्ता** | | | | | | | | | | | | | |
| पाणी, वीज मिळण्याचा हक्क | ९,९८७,९०७ | | - | ९,९८७,९०७ | ५,७२०,१६५ | १,०६६,९३५ | - | - | ६,७८७,१०० | | | ३,२००,८०७ | ४,२६७,७४२ |
| सॉफ्टवेअर परवाना | ३६,२६०,०८० | ३३,०३४,४७५ | ३,८७७,००१ | ६५,४१७,५५४ | ६,३८९,६०० | ३,५५३,७९८ | - | | ९,९४३,३९८ | | | ५५,४७४,१५६ | २९,८७०,४८० |
| एकूण | १३४,२५०,०९७,५२८ | ३३,१०३,५८६,०५५ | ४,६३१,८५०,२७६ | १६२,७२१,८३३,३०७ | ७४,६२१,२७०,०८२ | ३,९१४,७०५,८७४ | (२२२,३८७,३७३) | २,७७४,४९१,०५० | ७५,६१९,०९७,५३३ | १०४,१२१,४५५ | ३९,४८८,४९४ | ८६,९९८,६१४,३१९ | ५९,५८९,३३९,०५६ |
| **गेल्या वर्षाचे आकडे (पुनर्गठित)** | **१३२,७००,८०९,५८८** | **१,७६३,१२९,६९८** | **२१३,८४१,७५७** | **१३४,२५०,०९७,५२९** | **७१,७१४,९८७,५०१** | **३,०२१,०११,१९९** | **७१,८५५,४१२** | **१८६,५८४,१३३** | **७४,६२१,२६९,९७९** | | | **५९,५८९,३३९,०५६** | **६०,९८५,८२२,०८७** |

वजा/समायोजन यामध्ये बाह्य संस्थेंनी केलेल्या प्रत्यक्ष पडताळणीचे समायोजन समाविष्ट करण्यात आले आहे.

| | ३१.०३.२०११ रोजीचे ₹ | ३१.०३.२०१० रोजीचे ₹ |
|---|---|---|
| **अनुसूची ६ - गुंतवणूक (मूळ किंमत, उदधृत केलेली)** | | |
| **व्यापारी गुंतवणूक - दीर्घ मुदतीची** | | |
| सहभाग सहाय्यक कंपन्यांचे | | |
| ५०,००० (गतवर्षी ५०,०००) समभाग धुळे थर्मल पॉवर कं. मर्या. यांचे प्रत्येकी ₹१०/- किंमतीच पूर्ण पैसे भरलेले | ५००,००० | ५००,००० |
| ५०,००० (गतवर्षी निरंक) समभाग धोपावे कोस्टल पॉवर कं.म. यांचे प्रत्येकी ₹१०/- किंमतीच पूर्ण पैसे भरलेले | ५००,००० | - |
| समभाग संयुक्त उपक्रम कंपन्यांमध्ये | | |
| ३०,००० (गतवर्षी ३०,०००) समभाग यू.सी.एम. कोळसा कं. लि. यांच प्रत्येकी ₹१०/- किंमतीच पूर्ण पैसे भरलेले | ३००,००० | ३००,००० |
| ३०, ००० (गतवर्षी ३०,०००) समभाग महागुज कॉलरिज लि. यांचे प्रत्येकी ₹१०/- किंमतीच पूर्ण पैसे भरलेले | ३००,००० | ३००,००० |
| **अव्यावसायिक गुंतवणूक - दीर्घ मुदतीची** | | |
| १० (गतवर्षी १०) समभाग कोल्हापूर जिल्हा सहकारी बँक यांचे प्रत्येकी ₹१०/- किंमतीच पूर्ण पैसे भरलेले | १०० | १०० |
| **एकूण** | **१,६००,१००** | **१,१००,१००** |

| | | |
|---|---|---|
| **अनुसूची ७ - प्रचलित संपत्ती, कर्जे व अग्रीम रकमा** | | |
| **प्रचलीत मालमत्ता** | | |
| अ) भांडार यादी (व्यवस्थापनाने मूल्यांकित करुन प्रमाणित केलेली) | | |
| कोळसा व इंधन | ५,६७५,९२६,६५१ | ४,५९०,८११,९८५ |
| भांडार व सुटे भाग | ७,८८२,४९७,५७० | ७,०५६,९३२,४२६ |
| येऊ घातलेले सामान | ३००,५८७,२६९ | ४४४,५२९,९६४ |
| वजा : भांडारातून निरुपयोगी झालेल्या सामानाची तरतूद | १,१२५,३३३,८१३ | १,२१३,३७१,४७० |
| **एकूण** | **१२,७३३,६७७,६७७** | **१०,८७८,९०२,९०५** |
| ब) किरेकोळ देणेकरी | | |
| (असुरक्षित तथापि चांगल्या समजल्या जाणाऱ्या) | | |
| ६ महिन्याहून अधिक काळ येणे असलेली | ४,३३७,४३४,१५४ | १,०६६,६२७,९७७ |

| | | |
|---|---|---|
| इतर | ४६,३०५,९१७,०८१ | ३१,३४१,९४९,६७६ |
| **एकूण** | **५०,६४३,३५१,२३५** | **३२,४०८,५७७,६५३** |
| क) रोकड व बँक शिल्लक | | |
| १. हाती असलेली रोकड व मुद्रांक | २,४३९,४९४ | २,७५५,१३५ |
| २. शेडयूल बँकाकडे असलेले चालू खात्यावरील पैसे | ४२८,९३१,०३५ | २,१११,९३८,२१८ |
| ३. येऊ घातलेली येणी | २,७६३,५६८ | ४७,४१७,९०७ |
| **एकूण** | **४३४,१३४,०९७** | **२,१६२,१११,२६०** |
| **कर्जे व अग्रिम रकमा** (असुरक्षित तथापि चांगल्या समजल्या जाणाऱ्या केवळ तशा ठरवल्यावाचून) | | |
| १. अग्रीम रकमा व कर्ज दुय्यम कंपन्यांना | १४९,२७५,१८० | १४६,२७८,०१९ |
| २. वसूल होण्याजोग्या अग्रीम रकमा रोकड किंवा साधनाने आवश्यक मोल मिळवण्यासाठी | १,६४०,६२१,०३९ | १,४५२,८६२,०३२ |
| ३. अग्रीम रकमा संचलन व देखभाल पुरवठयासाठी | १,६८९,६२२,५७६ | १,१४३,४३१,३५२ |
| ४. अग्रीम रकमा कोळसा पुरवठयासाठी / इंधनासाठी | २८,६७९,३४८,३२६ | ५५,७५४,२४५,११० |
| ५. कर्मचारी वर्गाला दिलेल्या अग्रीम रकमा | २९९,७९१,८८० | २३९,७९२,५३१ |
| ६. ठेवी | ४,६१०,८२९,३७३ | ३,०५०,३३१,९९९ |
| ७. एक्साईज / कस्टम अधिकाऱ्यांकडून येणे | ५,००४,०८२ | ८,०३०,३५० |
| ८. आगाऊ दिलेली खर्चाची रक्कम | ७६,५५७,२०८ | १५७,९२३,९९९ |
| ९. येणे शक्य असलेले दावे व इतर चालू मालमत्ता | २,२३६,३६७,५०४ | २,३१२,०९६,४४१ |
| | **३९,३८७,४१७,१६८** | **६४,२६४,९९१,८३३** |
| वजा : संशयित कर्जासाठी तरतूद | | |
| १. कोळशासाठी / इंधनासाठी | ८,०७२,६६० | ४७,९८८,६९९ |
| २. पुरवठा करणाऱ्यांना अग्रीम रक्कम | ९५७,४८४ | ९५७,४८४ |
| ३. मालकी हक्क मिळणारे व इतर प्रचलीत मालमत्ता | ६,३८९,१३९ | ६,३८९,१३९ |
| ४. किरकोळ येणी | २,२१२,०१५ | २,२१२,०१५ |
| | १७,६३१,२९८ | ५७,५४७,३३७ |
| | ३९,३६९,७८५,८७० | ६४,२०७,४४४,४९६ |
| **एकूण** | **१०३,१८०,९४८,८७९** | **१०९,६५७,०३६,३१४** |

| अनुसूची ८ - चालू देयक / देणी | ३१.०३.२०११ रोजीचे ₹ | ३१.०३.२०१० रोजीचे ₹ |
|---|---|---|
| १. किरकोळ घनको | | |
| भांडवली खर्चाकरता | | |
| सुक्ष्म, लहान व मध्यम दर्जाच्या उद्योजकांकरिता (अनुसूची १५ मधील नोंद क्र.१७ पहावी) | - | - |
| इतरांना देय | २,१८७,५२८,०५९ | १,७६५,४५६,५१५ |
| माल व सेवा यासाठी | | |
| सूक्ष्म, लहान व मध्यम उद्योजकांकरिता (अनुसूची १५ मधील नोंद क्र.१७ पहा) | - | - |
| इतरांना देय | ३३,२०१,३३८,९२७ | ५७,३८३,१२४,८३७ |
| २. कंत्राटदार, ग्राहक व इतरांच्या अनामत व ठेवून घेतलेल्या रकमा | २१,९६१,५०१,१५१ | १४,१३८,६७२,०१७ |
| ३. इतर दायित्वे | १३,०५९,६७८,२०७ | ८,३१४,४५७,४०४ |
| ४. उपस्थित व्याज पण कर्जावर देय नसलेले | १,५३१,३९०,०३८ | १,३५६,९३४,८५८ |
| **एकूण** | **७१,९४१,४३६,३८२** | **८२,९५८,६४५,६३१** |

| अनुसूची ९ - तरतुद | | |
|---|---|---|
| उपदानासाठी तरतुद | ४,३३१,७८६,९३२ | ३,५२६,३४६,२५१ |
| रजा रोखीकरणासाठी तरतूद | ३,२०९,९१४,६१८ | २,३८३,३५८,८६८ |
| आयकर फी तरतूद | ४,२९२,३७०,८१४ | २,५८८,७४१,६५६ |
| वजा : अग्रीम कर जमा (आय स्त्रोतातुन वजा केलेला कर धरुन) | २,८११,३१४,८७१ | २,१४३,७०९,३१३ |
| | १,४८१,०५५,९४३ | ४४५,०३२,३४३ |
| उपांत लाभावरील कर | ४०,७६९,८०५ | ४०,७६९,८०५ |
| वजा : अग्रीम भरलेला कर | ३६,९६९,३०८ | ३६,९६९,३०८ |
| | ३,८००,४९७ | ३,८००,४९७ |
| संपत्ती कर | ४८५,७२३ | ५३१,७५७ |
| **एकूण** | **९,०२७,०४३,७१३** | **६,३५९,०६९,७१६** |

| अनुसूची १० - इतर उत्पन्न | २०१०-११ ₹ | २००९-१० ₹ |
|---|---|---|
| व्याजावरील उत्पन्न (मुळ देयकातून कापलेला आयकर ₹ १०७३७८ (गतसाल ₹ ७६,७१५)) | ५,५२१,८१९ | ७,५४३,३४९ |
| भाडे, भाडयाने आकार इ. वरील उत्पन्न | ५०,२०८,०८८ | ४३,४४०,४०६ |
| साठा व टाकाऊ मालमत्ता विक्रीतून मिळालेला लाभ | ४३४,७९८,७५० | ५४९,७५०,६६९ |
| निविदा अर्ज विक्री | २१,५१९,१७१ | १२,७९२,६६० |
| इतर प्राप्ती | ३७०,७९४,४३५ | ४१९,३६२,२३९ |
| परकीय चलनातील फरकामुळे प्राप्ती (निव्वळ) | १५४,१७२,६५८ | |
| | **१,०३७,०१४,९२१** | **१,०३२,८८९,३२३** |

| अनुसूची ११ - निर्मिती, प्रशासन व इतर खर्च | २०१०-११ ₹ | २००९-१० ₹ |
|---|---|---|
| वंगण, इतर वापर झालेले साहित्य, स्थानिक पुरवठा | ३०६,७५७,७१७ | ७८६,९४३,८६७ |
| पाणी पट्टी | १,११४,२२४,०८५ | १,७७८,६६०,३२६ |
| भाडे | ११९,३८१,८७२ | १२१,९०६,८६९ |
| भाडेपट्टी | ३,०९३,४४१,७५७ | २,३७५,०४२,९०३ |
| दुरुस्ती व देखभाल | | |
| प्रकल्प व यंत्रसामुग्री | ५,८५९,३०९,६६३ | ४,७०६,०५६,४१८ |
| इमारत | १२५,८७७,०४२ | ९१,२८८,१०७ |
| इतर | ४७३,८१०,५२२ | ५३२,१३७,५१२ |
| विम्याचे आकार | ५०,७५६,५५० | ४०,३९०,४७७ |
| दर व कर | १२१,२४९,२१३ | १४७,८१०,०३१ |
| कायदा व इतर व्यावसायिक खर्च | ४३,५२९,६०६ | ४४,८६७,८०६ |
| लेखा परिक्षकांचे परिश्रमिक | ४,२४३,१८९ | १,९८६,९४५ |
| दलालाचे अडत | ५५,३३३,३८४ | ५३,५१४,४८९ |
| इतर प्रशासकीय खर्च | ८१९,६७१,४४३ | ६८५,७१७,६६४ |
| स्थीर टाकाऊ मत्ता विक्रीतील तोटा | २६२,०१४,४४८ | ३५,८३७,१८५ |
| परकीय चलनाच्या फरकामुळे झालेला तोटा (निव्वळ) | - | १०४,६२१,५७६ |
| | १२,४४९,६००,४९१ | ११,५०६,७८२,१७५ |

| | | |
|---|---|---|
| वजा : देखभाल व दुरुस्ती खर्चाचे भांडवलीकरण (निव्वळ) | ९,८९६,७१५ | १४,२३६,१०४ |
| प्रशासकीय खर्चाचे भांडवलीकरण (निव्वळ) (अनुसूची १५ मधील नोंद १९ (४) पहावी) | २०५,९२६,६४४ | १६८,४०६,९७३ |
| | **१२,२३३,७७७,१३२** | **११,३२४,१३९,०९८** |

## अनुसूजे १२ - कर्मचारी खर्च

| | २०१०-११ ₹ | २००९-१० ₹ |
|---|---|---|
| पगार, भत्ता, बोनस, इ. | ५,९१०,६६२,४४१ | ४,८११,६२०,७३० |
| कर्मचारी कल्याण खर्च | ८१,०११,२५९ | ६५,८९१,९७४ |
| इतर कर्मचारी खर्च | १०२,८४२,१०२ | ७०,७७५,६१८ |
| रजा रोखीकरण योजना | १,२१३,६६९,७२० | ४०६,६८०,४५७ |
| उपदान | १,२९४,०७८,८९६ | ४७९,७४०,५३८ |
| भविष्य निर्वाह निधी व इतर निधीतील वर्गणी | ६६६,२९४,१०१ | ५०८,००६,५४९ |
| नियोजित मालमत्ता खर्चातील तुटीसाठी केलेली तरतूद | - | (१७८,६००,०००) |
| | ९,२६८,५५८,५१९ | ६,१६४,११५,८६६ |
| वजा: कर्मचारी खर्चाचे भांडवलीकरण (निव्वळ) (अनुसूची १५ मधील नोंद १९(३) पहावी) | ५६२,९५९,१८७ | ५९७,२४७,८७२ |
| | **८,७०५,५९९,३३२** | **५,५६६,८६७,९९४** |

## अनुसूची १३ - व्याज व वित्त आकार

| | २०१०-११ ₹ | २००९-१० ₹ |
|---|---|---|
| **व्याज खालीलप्रमाणे** | | |
| राज्य शासनाची कर्जे | २०१,६०१,१६४ | २३७,९६९,९३७ |
| कर्जरोखे | - | २३१,१५३ |
| इतर कर्जे / स्थगित उधारी | १३,२२२,९९०,०२४ | ९,७३३,०३२,८२१ |
| खेळत्या भांडवलासाठी उसनवारी | ८१५,३५८,३३८ | ६५४,०१७,६६८ |
| ग्राहकांच्या सुरक्षित ठेवी | २०,४३७ | २२,२७२ |
| **वित्त खर्च** | | |
| शासकीय हमीसाठी शुल्क / आकार | १५८,११६,७३१ | १९६,८७७,६०१ |

| | | |
|---|---|---|
| निधी उभारणीचा खर्च | - | ५०१,१०३ |
| इतर आकार | २३,०१३,११२ | १२८,८८७,०५४ |
| | १४,४२१,०९९,८०६ | १०,९५१,५३९,६०९ |
| वजा : व्याज व वित्त खर्चाचे भांडवलीकरण (निव्वळ) (अनुसूची १५ मधील नोंद १९(२) पहा) | ७,८४६,७६८,३८३ | ६,२५२,७२६,१०३ |
| | **६,५७४,३३१,४२३** | **४,६९८,८१३,५०६** |

## अनुसूची १४ - पूर्वकालीन जमा / आकार (निव्वळ)

| | | |
|---|---|---|
| **उत्पन्न** | | |
| इतर उत्पन्न | ३३,६६०,४७६ | १६,५६४,१६७ |
| गतकालीन देयकांसाठी समायोजन (गेल्या वर्षासंबंधी) | ३,१६८ | (१०,२२३,१६१) |
| इतर अतिरिक्त तरतूदी गतकालीन | १,९१०,९२८ | १०२,५१० |
| कोळसा / वायू संबंधित लाभ | ४८९,४५४ | १३,६१६,००० |
| ग्राहकांकडून प्राप्त | - | १२७,९९७,८९८ |
| | ३६,०६४,०२६ | १४८,०५७,४१४ |
| **खर्च** | | |
| इंधनासंबंधी लाभ / तोटा | ३,०५०,०२९ | ४,५११,१३७ |
| अतिरिक्त / कमी तरतूद घसाऱ्यासाठी | (२२२,३८७,३७३) | ७१,८५५,४१२ |
| व्याज व वित्त खर्च (निव्वळ) | २,०९६,९०१ | १,३१६,८०६ |
| प्रवर्तनाचे खर्च | १४१,१२६,७२२ | ८६,८७८,५३३ |
| कर्मचारी खर्च | (७,३९९,०७१) | २८,०७३,३१६ |
| इतर प्रशासकीय खर्च | २,७३२,६०४ | ७,९३०,५६६ |
| सामानासंबंधी खर्च | ६,२४०,१४७ | १३९,०७९,४४७ |
| | (७४,५४०,०४१) | ३३९,६४५,२१७ |
| | **(११०,६०४,०६७)** | **(१९१,५८७,८०३)** |

# अनुसूची - १५ : लेखांबाबत टिपा

## १) ३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या वर्षासाठी महत्त्वाच्या लेखा धोरणांचे विवरण पत्रक

### ए) वित्तीय विवरणपत्रे तयार करण्याचे आधारतत्त्व

सदर कंपनी ही कंपनी अधिनियम १९५६ च्या तरतुदीनुसार नोंदणी केलेली एक सार्वजनिक - मर्यादित (पब्लिक लिमिटेड) कंपनी आहे. कंपनी विद्युत अधिनियम २००३ या कायद्याने शासित आहे. जेव्हा कंपनी अधिनियम १९५६ यातील तरतूदींशी विद्युत अधिनियम २००३ व त्या संबंधीच्या नियमावली याच्या तरतूदीशी विसंगत होतील तेव्हा विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १७४ मधील अटींनुसार विद्युत अधिनियम २००३ मधील तरतूदी अभिभावी होतील.

सदर लेखा चालू असणारी संस्था या संकल्पनेच्या आधारे व ऐतिहासिक खर्च विषयक संकेतानुसार तयार करण्यात आले आहेत. सर्वसाधारण स्वीकृत लेखांची तत्त्वे (जी.ए.ए.पी.) आणि अधिसूचना क्र.जी.एस.आर. ७३९ (इ), दि.७ डिसेंबर २००६ याप्रमाणे कंपन्यांची (लेखा मानके) नियमावली २००६ यात दिलेली लेखा मानके, यातील सर्व प्रत्यक्ष स्वरुपांची पूर्ती करण्याच्या हेतूने, सदर कंपनी आपले लेखा तयार करीत असते.

मत्ता व दायित्त्वे यांची निर्मिती लागू असणाऱ्या विद्युत कायद्यांप्रमाणे करण्यात आली असून त्या योग्य त्या लेखाशीर्षांच्या खाली दर्शविण्यात आल्या आहेत.

### बी) अंदाजाचा वापर

सर्वसाधारण स्वीकृत लेखा तत्त्वांच्या शिस्तीनुसार वित्तीय विवरणपणे तयार करताना, त्यांच्या तारखांना नोंदलेल्या मत्ता व दायित्त्वे यांच्या रकमांवर परिणाम करतील असे अंदाज व गृहीतके करावी लागतात. प्रत्यक्ष निकाल आणि अंदाज यातील फरक, ज्या काळातील निकाल माहिती झाले / प्रत्यक्षात दिसून आले, त्यानुसार मान्य केले जातात.

### सी) स्थीर मत्ता

१) स्थीर मत्तांची लेखा पुस्तकांत नोंदणी केली जाते व त्या वार्षिक लेखात ऐतिहासिक खर्च म्हणून जाहिर केल्या जातात. स्थीरमत्ता या संपादन करण्याचा खर्च किंवा बांधकाम खर्च वजा संचित घसारा याप्रमाणे नमूद केल्या जातात.

२) संपादनाच्या खर्चामध्ये वाहतूक आकार, शूल्के आणि कर (करांचे प्राधिकारी यांचेकडून नंतर पूनःप्राप्य आहेत ते वगळून) वसूली, उधारीचा खर्च, आणि सदर मत्ता तिच्या उद्देशित वापरासाठी तयार करण्यासाठी द्यावे लागणारे सर्व खर्च समाविष्ट आहेत.

३) नवे प्रकल्प / विस्तार यांच्यासाठीच्या स्थीर मत्तांच्या प्रकरणी, असे प्रकल्प / विस्तार कार्यान्वित होण्याच्या तारखेपर्यंतचे द्यावे लागणारे संबंधित खर्च आणि व्याजाचे खर्च यांचे भांडवलीकरण करण्यात येते.

४) कंपनीने, स्वतःच्या मालकीचा हक्क नसणाऱ्या स्थीर मत्तांच्या निर्मितीसाठी केलेला खर्च, हा जो पर्यंत अशा मत्तांचे उभारण्याचे काम चालू आहे तो पर्यंत 'प्रगतीपथावरील भांडवल कामे' अशा विभिन्न बाबीप्रमाणे दर्शविला जातो व त्यानंतर तो स्थीर मत्तांच्या यादीत अलगपणे जाहीर केला जातो.

५) ज्या प्रकरणी अनामत रकमा / कामाचे कंत्राट याप्रमाणे भांडवलीप्रमाणे प्रगतीपथावर असतात आणि कंत्राटदारांच्या देयकाच्या चुकती करण्याबाबत अंतिमीकरण झाले नसेल, अशा कामाचे भांडवलीकरण हंगामी तत्त्वावर व ज्यावर्षी अंतिमरित्या हिशेब पूर्ण केला जातो त्या वर्षीच्या समायोजनाच्या अधीन राहून केले जाते.

६) भांडवली कंत्राटाच्या किंमतीतील फरकासंबंधीचे दावे असल्यास, ते कंपनीने स्वीकारल्यानंतर त्यांच्या लेखा नोंदी केल्या जातात.

७) कंपनीने प्रकल्प व नियोजित युनीटस् यांच्यावर कालावधीत केलेला खर्च हा संबंधित प्रगतीपथावरील भांडवली कामे यांच्या लेखांमध्ये संचित अर्थवृद्धीच्या आधारे संविभाजित केला जातो.

८) प्रकल्प / वीज निर्मितीकडे प्रायोगिक तत्त्वावर चालविण्यासाठी केलेला खर्च आणि त्यातून मिळालेला महसूल / उत्पन्न यांचे भांडवलीकरण केले जाते.

९) एखाद्या प्रकल्पाच्या मंजुरीसाठी तो शोधणे, त्याचे सर्वेक्षण करणे व सुसाध्यतेविषयी अभ्यास करणे यावर केलेला खर्च, हा सदर प्रकल्पावर अंतीम फेटाळण्याबाबत निर्णय होईपर्यंत किंवा तीन वर्षे यापैकी जे आधी असेल तोपर्यंत 'प्रगती पथावरील भांडवली कामे' यातील अलग बाब म्हणून दर्शविण्यात येतो. जर असा अभ्यास फेटाळण्यात आला तर तो खर्च फेटाळण्यात आलेल्या वर्षी महसूलात दर्शविण्यात येतो.

१०) लेखा पुस्ताकांमध्ये 'स्थीरमत्ता' दर्शविताना जर त्यासाठी काही शासकीय अनुदाने मंजूर झाली असतील तर त्या अनुदानाच्या नकत प्राप्तीनुसार दर्शविण्यात येतात.

११) ज्या स्थीर मत्तेची व्यक्तिश: किंमत ₹५,०००/- पर्यंत असेल त्यांची खरेदी वर्षात पूर्णपणे मूल्य घट लावण्यात येते.

१२) अमूर्त मत्ताच्या बाबतीत, जर अशा मत्ताचे भविष्यात आर्थिक फायदे कंपनीकडे प्रवाहीत होणार असतील, तर त्यांचे किंमतीप्रमाणे भांडवलीकरण केले जाते.

## डी) कर्ज खर्च

पात्र मत्तांच्या संपादनासाठी किंवा बांधकामासाठी लागणाऱ्या कर्ज खर्चाचे भांडवलीकरण अशा मत्ताच्या खर्चाचा भाग म्हणून केले जाते. पात्र होणारी मत्ता म्हणजे अशी मत्ता, जिच्या उद्देशित उपयोगासाठी ती तयार होण्यास पूरेसा अवधी लागत असतो. अशा भांडवली मत्तांचे संपादन किंवा बांधकाम यासाठी ज्यांच्या वापर झालेला नाही असे कर्ज खर्च ज्या काळात घेण्यात आले त्या काळातील खर्च म्हणून मान्य केले जातात.

## इ) मत्ता - कमी करणे

कंपनी, ताळेबंदाच्या तारखेपर्यंत प्रत्येक स्थीर मत्ताचे तसेच ''रोकडता निर्मित्तीचे घटक'' (कॅश जनरेटींग युनीटस् (सीजीयु)) यात समाविष्ट होणाऱ्या मत्तांच्या गटांचे जर त्या कमी करण्याच्या दृष्टीने, आवश्यक असतील तर तसे मूल्यमापन करते. जर अशा मत्ता चालू ठेवण्याचा खर्च त्यांच्या विक्री मुल्यापेक्षा जास्त असेल तर त्या कमी करण्यासाठी तरतूद केली जाते.

## एफ) यंत्रे व अन्य सुटे भाग

१) कारखाना व यंत्रे यासोबत प्रापण केलेले यंत्राचे सुटे भाग, यांचा उपयोग अनियमीत असल्याचे अपेक्षित असते. या सुट्या भगाची किंमत माहिती असेल तर त्याचे वेगळे भांडवलीकरण केले जाते. जर अशा सुट्या भागांची किंमत माहित नसेल तर त्याचे भांडवलीकरण संबंधित कारखान्यासोबत केले जाते.

२) यंत्राच्यानंतर प्रापण केलेल्या सुट्या भागांचे सुद्धा भांडवलीकरण केले जाते.

३) संबंधित कारखाना व यंत्रणा यांच्या उर्वरित उपयुक्त आयुष्यासाठी यंत्रसामुग्रीच्या सुट्या भागांची संपूर्ण मूल्य घट करण्यात येते.

४) यंत्रसामग्रीच्या सुट्याभागाचे कमी केलेले मूल्य हे ज्या वर्षात सदर सुट्या भागांचा वापर झाला त्यावर्षातील महसूलात आकारले जाते.

५) इतर सुटे भाग ''भांडार माल व सुटे भाग'' असे समजून ते वस्तुसूचीचा भाग होतात. त्याचे

मूल्यांकन किंमतीप्रमाणे किंवा निव्वळ वास्तव किंमत यापैकी जी कमी असेल त्याप्रमाणे करून आणि जेव्हा दिला जाईल तेव्हा खर्च केल्याचे मानले जाते.

**जी) घसारा / कर्जफेडीची तरतूद**

**१) स्थीर मत्ता :**

केंद्रिय वीज नियामक आयोग (सीईआरसी) यांनी दि.६ जून २००६ रोजी जाहिर केलेल्या दर धोरणास अनुसरून अधिसूचित केलेल्या दराप्रमाणे, कंपनी सरल रेषीय पद्धतीने, मत्तेच्या किंमतीच्या ९० टक्के या मर्यादेपर्यंत घसाऱ्याची तरतूद करते.

मत्तांमध्ये भर घालणे / वगळणे यावरील घसाऱ्यासाठी पूर्व निश्चित दराच्या आधारे, ज्या महिन्यात मत्ता वापरासाठी / विल्हेवाटीसाठी उपलब्ध झाली असेल त्या महिन्यापासून / पर्यंत तरतूद केली जाते.

जेव्हा एखाद्या मत्तेचे आयुष्य आणि / किंवा कार्यक्षमता ही नुतनीकरण व आधुनिकीकरण यामुळे वाढली असेल तेव्हा त्यासाठीचा खर्च व त्याच्या कर्ज फेड न झालेल्या घसारा योग्य रक्कमेसह तांत्रिक मूल्यमापनानंतर निश्चित केलेल्या सुधारीत उपयुक्त आयुष्यासाठी आकारली जाते.

भाडेपट्ट्यामध्ये धारण केलेल्या जमिनीसाठीची कर्ज फेडीची तरतूद ही भाडेपट्टीच्या मुदतीसाठी केली जाते.

**२) अमूर्त मत्ता :**

अमूर्त मत्ताच्या कर्जफेडीची तरतूद त्यांच्या अंदाजित उपयुक्त आयुष्यासाठी करताना, सॉफ्टवेअरसाठी हे आयुष्य दहा वर्षापेक्षा जास्त धरले जात नाही. इतर अमूर्त मत्तांसाठी जोपर्यंत त्यांच्याकडून पुरेसे आर्थिक लाभ निर्माण केले जातील अशा कालावधीसाठी कर्जफेडीची तरतूद केली जाते.

**३) विविध श्रेणीतील मत्तांसाठींचे घसाऱ्याच्या हिशेबाचे दर असे आहेत :**

| | |
|---|---|
| हायड्रॉलीक कामे | १.८० टक्के ते ३.६० टक्के |
| इमारत व अन्य स्थापत्य कामे | १.८० टक्के ते ३.६० टक्के |
| कारखाना व यंत्रसामुग्री | २.५७ टक्के ते १८ टक्के |
| पारेषण तारा, केबल नेटवर्क इ. | २.५७ टक्के ते ६ टक्के |

| | |
|---|---|
| फर्निचर, फिक्सचर्स आणि कार्यालयीन साधने | ६.०० टक्के |
| वाहने | १८.०० टक्के |

**एच) वस्तूसुची**

साहित्याचा साठा, भांडारवस्तू, सुटे भाग यांचे मूल्यांकन कमीत कमी किंमत किंवा निव्वळ वास्तव मूल्य याप्रमाणे केले जाते. आणि किंमत ही वेटेड ॲव्हरेज कॉस्ट पद्धतीनुसार निश्चित केली जाते. किंमतीमध्ये खरेदीची किंमत (परत मिळू शकणाऱ्या मूल्याधिष्टीत कराच्या नक्त इतकी) आणि या वस्तू सध्याच्या त्यांच्या जागेवर आणण्यासाठी व स्थितीत ठेवण्यासाठी केलेले इतर खर्च, यांचा समावेश आहे.

वापरण्यास अयोग्य ठरलेल्या व न चालणाऱ्या, जुन्या वस्तू व सुटेभाग कोणते आहेत हे आढावा घेऊन ठरविण्यात येते व त्याबाबत लेखांमध्ये तरतूद करण्यात येते.

**आय) उत्पन्न मान्यता**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (एमईआरसी) यांनी मंजूर केलेल्या दर पत्रकाच्या आधारे लेखांकन केलेली इंधन समायोजन आकारासह विजेची विक्री तसेच बिनादेयकाचे लेखा कालावधीच्या अखेरीपर्यंत उपार्जन केलेले उत्पन्न यांचा उत्पन्नात समावेश होतो.

इतर उत्पन्न उपार्जन तत्त्वावर मान्य केले जाते. भंगाराचा विक्री व नाकारलेल्या कोळसा यांची जेव्हा कराराने विक्री केली जाते तेव्हा त्यांचा लेखा नोंदला जातो. परिसमापनातील नुकसानाबद्दलची वसूली ज्यावर्षी प्रत्यक्ष स्थीरमत्तेत जमा होते / समायोजन केले जाते तेव्हा अशा वसूलीस उत्पन्न म्हणून मान्यता देण्यात येते.

**जे) गुंतवणूकी**

दीर्घ मुदतीच्या गुंतवणूकी, त्यांचे मूल्य, तिच्या तात्पूरती व्यतिरिक्त इतर घटीसाठी तरतूद केली असल्यास ती वजा करून किंमतीनुसार धरल्या जातात.

**के) परकीय चलनातील व्यवहार**

परकीय चलनातील व्यवहारास प्रारंभी अहवालाच्या चलनात मान्यता देण्यात येते. त्यासाठी परकीय चलनाच्या रकमेस अहवालाचे चलन व संबंधित परकीय चलन यांच्यात व्यवहाराच्या दिवशी असलेला विनिमय दर लावण्यात येतो.

पैसे देण्याचा दिवस व व्यवहाराचा दिवस यातील विनिमयाच्या दरात फरक झाल्यामुळे होणारा लाभ आणि तोटा हा सदर वर्षाच्या नफा-तोटा लेखांमध्ये स्थलांतरीत करण्यात येतो.

ताळेबंदाच्या तारखेस परकीय चलनातील नाणे विषयक बाबींचे अहवाल लेखन अखेरची तारीख वापरून केले जाते. जर काही लाभ किंवा तोटा असल्यास त्याला सदर वर्षाच्या नफ-तोटा लेखांमधे मान्यता देण्यात येते.

**एल) कर्मचारी लाभ**

**१) अल्प मुदतीचे कर्मचारी लाभ**

ही कंपनी कर्मचाऱ्यांनी दिलेल्या सेवेबद्दल त्यांना कपात न करता देय असलेले अल्प मुदतीचे कर्मचारी लाभ यास दायित्त्व (उपार्जित खर्च) म्हणून मान्यता देते. ती देतांना आधी रक्कम दिली असल्यास ती कापून घेतली जाते.

**२) नोकरी नंतरचे लाभ**

**व्याख्या केलेल्या वर्गणीच्या योजना**

व्याख्या केलेल्या वर्गणींच्या योजनांमध्ये नोकरी नंतरच्या लाभाच्या योजना समाविष्ट असतात. कंपनी अशा योजनांची निश्चित केलेली वर्गणी - दायित्त्व म्हणून मान्य करते (उपार्जित खर्च). ती देताना जर आधी वर्गणी दिली असेल तर ती कापून घेतली जाते. व्याख्या केलेल्या वर्गणीच्या योजनेसाठी कंपनीची वर्गणी / योगदान त्यांच्या संबंधित वित्तीय वर्षाच्या नफा-तोटा मान्यता देण्यात येते.

**व्याख्या केलेल्या लाभ योजना**

**उपदान व रजा रोखीकरण**

निवृत्तीनंतर उपदान व रजा रोखीकरण यांच्या 'उपार्जन दायित्त्वाची' तरतूद ही वर्षाच्या अखेरीस विमा गणीतीशास्त्राने निश्चित केलेल्या दायित्त्वाच्या आधारे करण्यात येते.

**भविष्य निर्वाह निधी लाभ**

कंपनी भविष्य निर्वाह निधीसाठी पूर्व निश्चित दराने निश्चित वर्गणी व त्यासोबत कर्मचाऱ्यांची वर्गणी याचा एका वेगळ्या विश्वस्त संस्थेकडे भरणा करते. ही विश्वस्त संस्था इतर काही गट कंपन्यांच्या निधीचेही व्यवस्थापन करीत असते. त्यामुळे ती बहूसंख्य मालक व्याख्यांकित लाभ योजना आहे. हा निधी परवानगी प्राप्त प्रतिभूतींमध्ये गुंतवला जातो. सदर निधीतील

कालावधीसाठी केलेली वर्गणी ही खर्च म्हणून मान्य करण्यात येते व ती नफा व तोटा लेखात आकारली जाते.

व्याख्यांकित लाभ पुरविण्याचा खर्च (प्रोजेक्टेड युनीट क्रेडीड) प्रक्षेपित घटक पत पद्धती व त्यासोबत विमा गणितानुसार मूल्याकंन वापरून प्रत्येक ताळेबंदाच्या तारखेला निश्चित केला जातो. मागील काळातील सेवाखर्च हा पूर्वी निहीत (vested) केलेल्या लाभांच्या मर्यादेपर्यंत त्वरीत मान्य केला जातो. अन्यथा त्यांच्या कर्जेफेडीची तरतूद, जोपर्यंत दुरूस्त केलेले लाभ निहीत होत नाहीत तेवढ्या सरासरी कालावधीसाठी, सरल-रेषा आधारे केली जाते.

ताळेबंदातील मान्य केलेली व्याख्यांकित लाभांची बंधने ही अशा बंधनांची मान्य न केलेले लाभ आणि हानी तसेच मान्य न केलेले सेवा खर्च यांच्याप्रमाणे समायोजन केलेल्या सध्याच्या मुल्यांप्रमाणे व लागू असल्यास योजित मत्तांच्या रास्त मूल्यानुसार घट करून त्यानंतर केली जातात.

कोणतीही व्याख्यांकित लाभ मत्ता (अशा हिशेबानंतर ऋणात्मक व्याख्यांकित लाभ असा निष्कर्ष असलेली) पूर्वी मान्य न केलेला सेवा खर्च अधिक उपलब्ध निधीचे सध्याचे मूल्य आणि योजनेतील घट याप्रमाणे मान्य केली जाते.

**एम) भाडेपट्टी**

**वित्तिय भाडेपट्टी**

महाराष्ट्र विद्युत सुधारणा योजना २००५ (हस्तांतरण योजना) यानुसार वित्तीय भाडेपट्टीने संपादित केलेल्या मत्तांच्या संदर्भात भाड्यांच्या आकारणीचे जशी व जेव्हा उपार्जन होईल तेव्हा ती नफा व तोटा लेखांमध्ये आकारला जाते.

दि.५ जून २००५ नंतर संपादित केलेल्या मत्तांचे वर्गीकरण ‘वित्तीय भाडेपट्टी’ असे करण्यात येते. ज्या मत्ताच्या मालकी हक्काच्या सर्व जोखिमा व प्राप्ती कंपनीकडे असते, त्यांचे भाडेपट्टीच्या सुरुवातीलाच भांडवलीकरण रास्त मूल्यापेक्षा कमी स्तरावर किंवा किमान भाडेपट्टीच्या भरण्याच्या सध्याच्या मूल्यांकन करून त्या समान रकमे इतक्या दायित्त्वाची निर्मिती केली जाते. भरलेले भाडे याचे वाटप दायित्त्व व व्याजखर्च याच्यात केले जाते. त्यातून प्रत्येक मुदतीसाठीच्या थकीत दायित्त्वावर स्थीर मुदतीचा व्याज दर मिळविला जातो.

**प्रवर्ती भाडेपट्टी**

ज्या भत्ताच्या सर्व जोखीमा व लाभ भाड्याने देण्यास प्रभावीरित्या राखून ठेवलेल्या असतात त्यांचे वर्गीकरण ‘प्रवृत्ती भाडेपट्ट्यां’ असे केले जाते. प्रवृर्ती भाड्यांतर्गत भरलेल्या पैशाची मान्यता खर्च म्हणून सरळ रेषा आधार तत्त्वानुसार केला जाते.

**एन) कर**

**१) प्राप्तीकर**

वर्षातील करपात्र उत्पन्नासंदर्भात परवानगी योग्य कर सूट, कपाती / अमान्यबाबी इ. विचारात घेऊन चालू कर हा प्राप्तीकर अधिनियम १९६१ च्या तरतुदीनुसार निश्चित केला जातो.

**२) स्थगीत कर**

स्थगीत कर हा कालानुरुप फरकांप्रमाणे मान्य केला जातो. यात करपात्र उत्पन्न आणि लेखांमधील उत्पन्न यातील फरक जास्त कालावधीत निर्माण होतो आणि तो अन्य एखाद्या किंवा त्याहून जास्त कालावधीत त्या उलट होण्यास पात्र असतो. लेखा मानक २२ ''प्राप्ती वरील कराची लेखा नोंद करणे'' यानुसार कराचा दर व कायदे सुज्ञपणे लावण्याच्या अधीन राहून, तो ताळेबंदाच्या तारखेला मान्य केला जातो.

अशोषित घसारा किंवा पुढे चालू असलेले तोटे याबाबत भविष्यात त्याची वस्तूतः वसुलीची निश्चिती असलेल्या मर्यादेइतपतच स्थगीत कर मत्तांना मान्यता देण्यात येते. इतर स्थगीत मत्तांची मान्यता, त्याच्या भविष्यातील निश्चित वसुलीच्या मर्यादेत करण्यात येते.

**ओ) पूर्वकालीन बाबी व असाधारण बाबी**

या आधीच्या वर्षातील वित्तीय विवरणपत्रातील चुका किंवा गाळल्या गेलेल्या बाबींचे समायोजन ''मागील काळातील'' या लेखांमध्ये करण्यात येते.

**पी) तरतुदी, आकस्मिक दायित्त्वे आणि आकस्मिक भत्ता**

मापनातील मोठ्या प्रमाणातील अंदाजे न केलेल्या तरतुदी जर मागील घटनांमुळे सद्यस्थितीत बंधनकारक असतील तर आणि जर संसाधनाचे बाह्यगमन होणार असेल तर, केले जाते. आकस्मिक दायित्त्वांना मान्यता दिली जात नाही. परंतु त्या टिपांमध्ये उघड केल्या जातात. आकस्मिक दायित्त्वांचा वित्तीय परिणाम हा ज्या दिवशी वित्तीय विवरणपत्रांना मंजुरी दिली जाते त्या दिवशी उपलब्ध असलेल्या माहितीवर आधारीत असतो. आकस्मिक मत्तांना मान्यता दिली जात नाही आणि त्या वित्तीय विवरणपत्रात प्रकट केल्या जात नाहीत.

**क्यू) शासकीय अनुदान धोरण**

विशिष्ट स्थीर मत्ताशी संबंधित शासकीय अनुदाने अशा स्थीर मत्ताच्या ठोक मूल्यांमधून वजा

केल्या जातात. उत्पन्नाशी संबंधित शासकीय अनुदानांचा लेखा, कार्यपद्धतीच्या आधारे त्यास अनुरूप असणाऱ्या मुदतींसाठी व त्याचा भरपाई करण्याच्या हेतुसाठी लागणारा खर्च या सोबत, नफा व तोटा विवरणपत्रात केला जातो.

## २) पूनर्रचना योजना

दि.०६ जून २००५ रोजीच्या कंपनीच्या मत्ता व दायित्त्वे यांच्यात महाराष्ट्र विद्युत सुधारणा हस्तांतरण योजना २००५, (हस्तांतरण योजना) अंतर्गत हस्तांतरीत झालेल्या शिल्लकीचा समावेश आहे. त्यानुसार या शिल्लकींना म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी लि. यांनी मंजुरी दिली आहे. अंतिम हस्तांतरण योजना अद्याप महाराष्ट्र शासनांकडून अधिसूचीत व्हायची आहे. त्याचा प्रभाव कंपनीच्या वित्तीय विवरणपत्रांवर होऊ शकेल.

पूर्वीच्या म.रा.वि.मं. या संस्थेने घेतलेल्या कर्जाचे अस्तित्त्वात आलेल्या वारसदार कंपन्यामध्ये वाटप हस्तांतरण योजनेचा एक भाग म्हणून करताना मधल्या काळात काही कर्जांची व्यवस्था महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने (महापारेषण) केली होती. या कर्जाचे वाटप (महानिर्मिती) कंपनीकडे झाले व त्यास सूत्रधारी कंपनीने मंजुरीही दिली होती. त्या अनुषंगाने खालील रकमा महापारेषण कंपनीला देण्यात आल्या आहेत. योजनेची अंतीम अधिसूचना प्रलंबित असल्याने राखीव / भाग भांडवल निलंबन लेखा यात कोणताही आघात दिलेला नाही. आणि त्याचे समायोजन महावितरणची प्राप्त होण्याजोगी / द्यावयाची शिल्लक असे केले आहे.

| **तपशील** | **रक्कम (₹ मध्ये)** |
|---|---|
| ग्रा.वि.म.च्या कर्जाची परतफेड | ७,५०,०००,००० |
| आय्.एफ.सी.आय् ला अपरिवर्तनीय ऋणपत्रांची परतफेड | ९२४,८११,३५० |
| बी.इ.एस.टी.ला अपरिवर्तनीय ऋणपत्रांची परतफेड | १३,१२५,००० |
| **मुद्दलाची एकूण परतफेड (अ)** | **१,६८७,९३६,३५०** |
| इंडीयन बँकेस अल्प मुदतीच्या कर्जाचे व्याज देणे (२००६-०७ साठी) | ६७१,८७१ |
| इंडीयन बँकेस अल्प मुदतीच्या कर्जाचे व्याज देणे (२००५-०६ साठी) | ३८,५७९,०७४ |
| बी.इ.एस.टी. ला अपरिवर्तनीय ऋणपत्रांवर व्याज देणे (२००६-०७ साठी) | २,१९१,७०९ |

| | |
|---|---|
| बी.इ.एस.टी. ला अपरिवर्तनीय ऋणपत्रांवर व्याज देणे (२००५-०६ साठी) | ३,९३३,८५८ |
| ग्रा.वि.म.ला कर्जावरील व्याज देणे (२००५-०६ साठी) | १६,९५३,१२५ |
| आय.एफ.सी.आय. ला अपरिवर्तनीय ऋणपत्रांवर व्याज देणे (२००५-०६ साठी) | ८९,६८८,९०३ |
| **एकूण व्याजाच्या रकमेची परतफेड (ब)** | **१५२,०१८,५४०** |
| **महापारेषण कं.लि. ला दिलेली एकूण रक्कम (अ + ब)** | **१,८३९,९५४,८९०** |

## ३) भांडवली बांधिलकी

भांडवली लेखांमध्ये कार्यवाही करण्यास बाबी असलेली कंत्राटाची व करारांची अंदाजे व तरतूद न केलेली रक्कम ₹१२,५७०.७२ कोटी आहे. (मागील वर्षी ₹१२,२८२.३४ कोटी).

## ४) आकस्मिक दायित्त्वे (तरतूद न केलेली)

(व्यक्तीश: मूल्य रु. दहा लाख पेक्षा जास्त असलेली)

| अनु. क्रमांक | तपशील | २०१०-११ | २००९-१० |
|---|---|---|---|
| अ | कर्ज म्हणून अभिस्वीकृत न केलेले दावे | ३३७,७०,३५,३४७ | ३३९,०८,००,५१३ |
| ब | वादग्रस्त शुल्के / कर मागण्या | १२२,६७,८८,१३८ | २८,०७,१४,५७० |
| क | (जेव्ही) संयुक्त साहस (महागूज कोलरीज) | १३,८९,७५,००० | १३,८९,७५,००० |

**टिपा :** वादग्रस्त शुल्के व कर मागण्यां यामधील दर्शविलेल्या ₹१,२२,६७,८८,१३८ या रकमेत प्राप्ती कर विभागाचा आदेश दि.३१.०३.२०११ यात लावलेली दंडाची रक्कम ₹११३,५१,४६,१३७ समाविष्ट आहे. आयकर अधिनियमाच्या कलम २७१ (१) (सी) यानुसार दिलेला सदर आदेश निर्धारण वर्ष २००६-२००७ आहे. महानिर्मिती कंपनीने या दंडाच्या आदेशावर आयुक्त (प्राप्तीकर अपील) यांचेकडे अपील केलेले आहे.

## ५) भाग भांडवल

### १) भाग निलंबित लेखा

पूर्वीच्या विद्युत मंडळाची पूनर्रचना करण्याच्या हेतूने केलेल्या पूर्वीचा हस्तांतरण योजनेच्या अनुषंगाने महानिर्मिती कंपनीच्या वाटयास भाग भांडवल म्हणून ₹२५,६३३,६३३,५३७/- एवढा निधी मिळाला. योजनेप्रमाणे कंपनीला सदर रकमेचे समभाग (इक्विटी शेअर्स) मराविमं. सुत्रधारी कंपनीस देणे आहे. त्यानुसार मराविमं. सुत्रधारी कंपनीस ₹२५,०००,०००,०००/- इतक्या रकमेचे भाग (शेअर्स) वर्ष २००८-०९ देण्यात आले. आणि ₹६३,३६,३३,५३७/- एवढी रक्कम भाग भांडवल निलंबित लेखा यामध्ये दर्शविण्यात आली. मात्र सदर हस्तांतरण योजनेचे अंतिमीकरण महाराष्ट्र शासनांकडून अद्याप व्हायचे आहे. त्याच्या मान्यतेनंतर अंतीम शिल्लक रकमेच्या भागाचे वाटप केले जाईल.

### २) भाग अर्ज लेखा

